CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | सोमवार, २३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३५४ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



व्यक्तिगत स्वार्थपूर्तीऐवजी सामाजिक स्वार्थपूर्तीचा विचार स्थिर झाल्याबरोबर, क्षुद्र स्वार्थाचे रूपांतर उदात्त स्वार्थात होते. उदात्त स्वार्थात समाजकल्याणाला पोषक असे जीवन घडत असता व्यक्तिगत जीवनाला समाजाचा आयाम प्रकट होतो व जीवन उदात्त होते.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## विनम्र अभिवादन



संत गाडगेबाबा यांची आज जयंती

# दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

- **तामिळनाडूतून तोयबाच्या सहा जणांना अटक**
- **आयएसआय-बांगलादेशी दहशतवादी संघटनांसोबत संबंध**

**दिल्ली पोलिसांची कारवाई**

◆ **नवी दिल्ली, २२ फेब्रुवारी**

दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने दमदार कामगिरी करीत मोठा दहशतवादी हल्ला घडविण्याचा कट उधळला आहे. पोलिसांनी तामिळनाडूत कारवाई करीत सहा संशयितांना अटक केली. पाकिस्तानची कुटिल गुप्तचर यंत्रणा आयएसआय आणि बांगलादेशी दहशतवादी संघटनांच्या इशाऱ्यावर मोठा दहशतवादी हल्ला घडविण्याचा आरोप त्यांच्यावर आहे. अटक केलेले अतिरेकी लष्कर-ए-तोयबाचे असल्याचे सांगितले जाते.

सर्व आरोपींना दिल्लीला आणले जाणार आहे. अटक केलेल्या सहा संशयितांमध्ये एका बांगलादेशीचा समावेश आहे. त्यांच्याकडून आक्षेपार्ह सामग्री जप्त करण्यात आली. याची



तपासणी सुरू आहे. यापूर्वी पोलिसांनी पश्चिम बंगालमधून दोन जणांना अटक केली होती.

गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीनंतर दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने ही कारवाई केली. अटक केलेले संशयित भारतात मोठा हल्ला घडवून आणण्याच्या तयारीत होते, असे प्रारंभिक तपासातून निष्पन्न झाले आहे. त्यांचा संबंध आयएसआयसोबत असल्याचा संशय असून दीर्घकाळापासून भारतातील दहशतवादी कृत्यांमध्ये या संघटनेचा हात असल्याचे निष्पन्न झाले आहे. या व्यतिरिक्त बांगलादेशी दहशतवादी संघटनांच्या भूमिकेची चौकशी केली जात आहे.

अटक केलेले बांगलादेशी आपली ओळख लपवून ठेवण्यासाठी बनावट आधारचा वापर करीत होते. या मॉड्युलचा संबंध लष्कर-ए-तोयबासोबत आहे. त्यांचा सूत्रधार मूळचा काश्मिरी असून सध्या तो बांगलादेशात राहतो.

**‘फ्री काश्मीर’च्या फलकांमुळे अडकले**

अलिकडच्या काळात राष्ट्रीय राजधानी परिसरातील १० ठिकाणांवर ‘फ्री काश्मीर’चा प्रक्षोभक मजकूर असलेले भित्तीफलक आढळले होते. तिथूनच पोलिसांनी चौकशीची सूत्रे फिरवली. (वृत्तसंस्था)

### अटक केलेल्यांची नावे

मिझानपूर रहमान, मोहम्मद शाबात, उमर, मोहम्मद लिटन, मोहम्मद शाहिद आणि मोहम्मद उज्जल अशी अटक केलेल्या अतिरेक्यांची नावे आहेत. तामिळनाडूच्या तिरुप्पूर जिल्ह्यातील कापड कारखान्यांमधून त्यांना अटक करण्यात आली. इतर दोघांना पश्चिम बंगालमधून अटक केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

### हाफीजच्या संपर्कात होता शब्बीर शाह

दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने उद्ध्वस्त केलेल्या बांगलादेशी मॉड्युलबद्दल महत्त्वपूर्ण माहिती दिली. या मॉड्युलचा सूत्रधार शब्बीर शाह लष्कर-ए-तोयबाचा प्रमुख हाफीज सईदच्या थेट संपर्कात असल्याची माहिती या आठ अतिरेक्यांना अटक केल्यानंतर मिळाली.

# शिकवणी वर्गाच्या संचालकासह दोघांना अटक

**पेपर फुटीचे प्रकरण**

## पोलिसांच्या सतर्कतेने ‘स्कॅम’ उघडकीस

◆ **नागपूर, २२ फेब्रुवारी**

सदरमधील सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर बारावीच्या परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थिनींकडे मोबाईल आढळून आल्यानंतर राज्यातील पहिले पेपर फुटीचे प्रकरण समोर आले. या प्रकरणात एका ट्युशन क्लासेसच्या संचालकासह दोघांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यांना चार दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. निशिकांत मून (वय ४५, रा. मानकापूर) आणि फरहान अख्तर (वय २०, रा. कामगारनगर) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

आरोपी निशिकांत मून हा एका ट्युशन क्लासेसचा संचालक असून त्याच्याकडे फरहान हा शिक्षक म्हणून काम करतो. निशिकांत मून याने शिक्षण विभागातील काहींना हाताशी धरून बारावीचे पेपर ‘लिक’ केल्याची शक्यता आहे. तसेच शिक्षक फरहान याने व्हॉट्सॲपवर आलेल्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे सोडवलेली आहेत. दोघांचेही मोबाईल जप्त करण्यात आले असून त्यांनी मोबाईलचा सर्व डाटा डिलीट केला आहे. त्यामुळे फॉरेंसिक लॅबमधून तपास केल्यानंतर पेपर लिक बाबत ठोस माहिती पोलिसांच्या हाती लागणार आहे. दोघांनाही नागपुरातून अटक केली असून (पान ५ वर)

### कोट्यवधीचे घबाड निघेल बाहेर

नागपूर विभागात १ लाख ६० हजार २९२ विद्यार्थी बारावीची परीक्षात देत आहेत. तर फक्त नागपूर शहर आणि ग्रामीण भागातील एकूण ६५ हजार ४९९ विद्यार्थी बारावीची परीक्षा देत आहेत. पेपरफुटीच्या प्रकरणात एका ट्युशन क्लासेसचा संचालक निशिकांतसह अन्य संचालकांचा समावेश आहे. त्यामुळे या घोटाळ्यात हजारो विद्यार्थ्यांचा समावेश असून एका पेपरचे प्रतिविद्यार्थी २५ हजार रुपयांप्रमाणे घेण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे पोलिसांच्या तपासात कोट्यवधींचे घबाड बाहेर निघण्याची शक्यता आहे.

# ‘जैश’चे तीन अतिरेकी ठार

## कमांडर सैफुल्लाहचा समावेश

◆ **जम्मू, २२ फेब्रुवारी**



जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात रविवारी झालेल्या भीषण चकमकीत सुरक्षा दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदच्या तीन अतिरेक्यांचा खातमा केला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

भीषण गोळीबारादरम्यान अतिरेकी लपलेल्या मातीच्या घराला आग लागली. त्यामुळे त्यांचे मृतदेह ओळखण्याच्या पलीकडे होते. सुरक्षा यंत्रणांच्या प्राथमिक अंदाजानुसार मृतांपैकी एक जैश-ए-मोहम्मदचा कुख्यात कमांडर सैफुल्लाह आहे. जवळपास पाच वर्षांपूर्वी त्याने जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरी केली होती. तेव्हापासून तो या प्रदेशात सक्रिय होता. सुरक्षा दलांवर झालेल्या अनेक प्राणघातक हल्ल्यांचा तो सूत्रधार होता. जुलै २०२४ मध्ये चार जवानांचा मृत्यू झाला होता. सैफुल्लाह यापूर्वी अनेक चकमकींमधून वाचला होता.

तिसऱ्या दहशतवाद्याचा मृतदेह आणि एक शस्त्र सायंकाळी अतिरेक्यांच्या नष्ट झालेल्या लपण्याच्या ठिकाणाहून सापडले. तत्पूर्वी, नॉर्दर्न आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी अतिरेक्यांचा खात्मा करण्यासाठी व्हाईट नाईट कॉर्प्सच्या जवानांनी केलेल्या वेगवान आणि अचूक कारवाईबद्दल त्यांचे कौतुक केले.

**शस्त्रास्त्रे जप्त**

चतरू पट्ट्यातील पासरकूटच्या सामान्य भागात त्राशी-१ ऑपरेशनदरम्यान अतिरेक्यांना ठार करण्यात आले आणि दारुगोळ्यासह दोन एके-४७ रायफली जप्त करण्यात आल्या. दहशतवाद्यांचा माग काढण्यासाठी आणि त्यांना ठार करण्यासाठी ऑपरेशन त्राशी-१ अंतर्गत किश्तवाड प्रदेशात एक संयुक्त मोहीम सुरू केली, असे लष्कराने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून

## ६ मार्चला अर्थसंकल्प सादर होणार

◆ **मुंबई, २२ फेब्रुवारी**

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्या, सोमवारी दि. २३ फेब्रुवारीपासून सुरू होत असून, ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. या अधिवेशनात विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा रंगण्याची शक्यता असून, विरोधी पक्षनेता नियुक्तीच्या विषयावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष होण्याचे संकेत आहेत.



**सरकारच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार**
(पान ५ वर)

पहिल्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरुवात होईल. त्यानंतर आभार प्रस्तावावर चर्चा केली जाईल. ६ मार्च रोजी मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मांडतील. या अर्थसंकल्पाकडून शेतकरी, महिला, युवक, उद्योग क्षेत्र आणि पायाभूत सुविधांसाठी मोठ्या घोषणा होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, राज्यातील दुष्काळस्थिती, शेतकरी कर्जमाफी, बेरोजगारी, आरक्षणाचा प्रश्न, महागाई, कायदा-सुव्यवस्था, भ्रष्टाचार अशा विविध मुद्द्यांवर विरोधक सरकारला घेरण्याच्या तयारीत आहेत. तर सत्ताधारी पक्ष विकासकामे, गुंतवणूक आणि कल्याणकारी योजनांचा लेखाजोखा मांडणार आहेत. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### ट्रम्पच्या रिसॉर्टमध्ये घुसण्याचा प्रयत्न, तरुण ठार

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मार-ए-लागो रिसॉर्टमध्ये घुसणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाला सुरक्षा जवानांनी गोळी मारली. यामध्ये त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.राष्ट्राध्यक्षांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या सीक्रेट सर्व्हिसने सांगितले की, एक व्यक्ती सुरक्षा क्षेत्रात बेकायदेशीरपणे प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होता. तो आत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असताना जवानाने त्याच्यावर गोळीबार केला. त्या व्यक्तीकडे बंदुकीसारखे शस्त्र आणि इंधनाची कॅन होती. घटनेच्यावेळी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये होते. ते सहसा आठवड्याचे शेवटचे दिवस मार-ए-लागो येथे घालवतात. मृताची ओळख अद्याप जाहीर झालेली नाही. तपास सुरू आहे.अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीकडून जप्त केलेल्या बंदुकीचा आणि लाल इंधनाच्या कॅनचा फोटो प्रसिद्ध केला.

### शरद पवार पुन्हा रुबी हॉलमध्ये दाखल

**पुणे :** शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे त्यांना अशक्तपणा जाणवत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती पुन्हा बिघडली आहे. त्यामुळे पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे त्यांना दाखल करण्यात आले आहे.

# दक्षिण आफ्रिकेने भारताला ७६ धावांनी नमविले

## टी-२० वर्ल्डकपमध्ये १२ सामन्यांनंतर भारताचा पराभव



**तभा वृत्तसंस्था,**
**अहमदाबाद, दि. २२ फेब्रुवारी-**

टी-२० विश्वचषकाच्या तिसऱ्या सुपर ८ सामन्यात गतविजेत्या भारताला दक्षिण आफ्रिकेकडून ७६ धावांनी पराभव पत्करावा लागला. टी-२० विश्वचषकात सलग १२ सामने जिंकल्यानंतर भारताला पहिल्यांदा पराभव पत्करावा लागला.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम वर झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांनी २० षटकांत ७ बाद १८७ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने ३५ चेंडूत ६३ धावांची शानदार अर्धशतकी खेळी केली. डेवाल्ड ब्रेव्हिसने ४५ धावा तर ट्रिस्टन स्टब्सने २४ चेंडूत नाबाद ४४ धावा केल्या. भारताच्या जसप्रीत बुमराहने ३ आणि अर्शदीप सिंगने २ गडी बाद केले.

प्रत्युत्तरात भारतीय संघ १८.५ षटकांत १११ धावांवर आटोपला. सलामीचे ईशान किशन (०) व अभिषेक शर्मा (१५) लवकर बाद झाल्यानंतर मधल्या फळीतील शिवम दुबे ४२ तर सुर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी १८ धावा करीत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मार्को यान्सनने (४) व केशव महाराजने (३) या जोडीने भारताचे तळाचे फलंदाज लवकर बाद केले. कॉर्बिन बॉशने २ तर एडेन मार्करामने १ गडी बाद केला.

# ‘एआय समिट’मध्ये भारताच्या सामर्थ्याचे दर्शन

## दक्षता महत्त्वाची; ‘मन की बात’मध्ये पंतप्रधानांचा संवाद



◆ **नवी दिल्ली, २२ फेब्रुवारी**

‘मन की बात’मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ च्या यशाचा उल्लेख केला. ते म्हणाले, ही आतापर्यंतची सर्वात मोठी एआय परिषद होती. ज्यामध्ये जगभरातील नेते, टेक सीईओ, नवोन्मेषक आणि स्टार्टअप सहभागी झाले होते. या माध्यमातून जगाला भारताच्या सामर्थ्याचे दर्शन घडले आहे.

ही परिषद एआयच्या भविष्याला आकार देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. देशाला संबोधित करताना ते पुढे म्हणाले, ‘मन की बात’ हे देशाचे आणि त्याच्या नागरिकांचे यश दाखविण्यासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ आहे. या समिटमध्ये अनेक देशांनी ही कामगिरी पाहिली. भविष्यात जग एआयच्या शक्तीचा कसा वापर करेल यासाठी, ही शिखर परिषद एक टर्निंग पॉइंट ठरली, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी एआय आणि तांत्रिक प्रगतीवर चर्चा केली. तसेच माजी मुख्यमंत्री जयललिता यांना श्रद्धांजली वाहिली.

**केवायसी संदेशांबाबत काळजी नको**

जेव्हा तुम्हाला बँकेकडून केवायसी अपडेट किंवा री-केवायसी करण्याची विनंती करणारा संदेश येतो तेव्हा अनेकांना प्रश्न पडतो की, जर आपण हे आधीच ते केले असेल तर ते पुन्हा का करायचे. परंतु, ही प्रक्रिया ग्राहकांच्या पैशांच्या आणि बँक खात्यांच्या सुरक्षिततेसाठी आहे, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### सणासुदीत परदेशी वस्तूंचा वापर टाळा

पंतप्रधान मोदी यांनी ‘मन की बात’मध्ये नागरिकांना रमजान आणि होळीनिमित्त ‘व्होकल फॉर लोकल’चा अवलंब करण्याचे आवाहन करत स्वदेशी उत्पादने खरेदी करण्याचा आणि परदेशी वस्तू टाळण्याचा सल्ला दिला. असे केल्यास स्थानिक व्यवसाय, रोजगार आणि स्वावलंबी भारत मोहीम मजबूत होईल, असेही ते म्हणाले.

### गुणपत्रिका तुमचे मूल्य ठरवत नाही

पंतप्रधान मोदी विद्यार्थ्यांना संबोधित करताना पुढे म्हणाले, परीक्षेदरम्यान शंका येणे स्वाभाविक आहे. परंतु, विद्यार्थ्यांनो घाबरण्याची गरज नाही. प्रत्येक पिढीने हे अनुभवले आहे. तुम्ही एकटे नाहीत. एखाद्याचे मूल्य त्यांच्या गुणपत्रिकांवरून ठरवले जात नाही. विद्यार्थ्यांनी शाळेत जे शिकवण्यात आले त्याबाबत आत्मविश्वासाने लिहा आणि कठीण प्रश्नांना भारावून जाऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.



## महत्वाचे...



## तोळणूर येथे १२० नागरिकांची आरोग्य तपासणी; पाटील प्रतिष्ठानचा उपक्रम

**अक्कलकोट, दि. २२ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील तोडून येथे लोकनेते कैलासवासी वहीदपाशा पिरजादे पाटील प्रतिष्ठानतर्फे आरोग्य तपासणी शिबिर व वंचितांना चादर वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते वहीदपाशा पिरजादे पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पीरपाशा पिरजादे पाटील यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी शंभर गरजू वंचितांना चादरींचे वाटप करण्यात आले. तसेच १२० रुग्णांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. अशोक राठोड, डॉ. निखिल क्षीरसागर, डॉ. नीरज जाधव, डॉ. बाबासाहेब सुलतानपुरे कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष रब्बा, सुरेखा पाटील, संतोष राठोड, रतन राठोड, डॉक्टर शैलजा माळी, डॉक्टर सुचिता जवळकर, डॉक्टर प्रणिता लोकापुरे, सिद्धाराम गांगोंडा, शिवानंद बिराजदार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास शितल जाधव, ललिता चिंचुरे, मनीषा सलगर, उज्वला फडतरे, विनोद ढंगे, शिवानंद चितली, गंगाराम राठोड, लक्ष्मण कोळी, सिद्धाराम सबाळ, ईरण्णा कांगळे, गणेश कांबळे, गुगी नबीलाल श्रीशैल रब्बा उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीशैल रब्बा, आभार विश्वनाथ चव्हाण यांनी मानले.



## शिवजयंती निमित्त सरबत वाटप

**मंगळवेढा, दि. २२ फेब्रवारी-**

थोर मराठा कै. अण्णासाहेब पाटील क्रीडा युवक सामाजिक व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने शिवजयंती निमित्त सरबत वाटप करण्यात आला. यावेळी प्रथम मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस व थोर मराठा कै अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत सरबत वाटप कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरगिड्डे, पोलीस उपनिरीक्षक आरती कनेरे, संस्थापक अध्यक्ष गोपाळ भगरे, मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भगरे, राजेंद्र कुमार जाधव, बसवेश्वर घाडगे, भारत ढोणे, अरविंद माने, गोरख पोळ, मच्छिंद्र पोळ, बाळकृष्ण कोंडूभैरी, महेश वठारे, शिवाजी कोंडूभैरी, विक्रम नागणे,अशोक घाडगे, तायाप्पा कोंडूभैरी, समाधान नागणे, सागर कोंडूभैरी, दत्तात्रय जाधव, दत्तात्रय आवताडे, रघुवीर पोळ, स्वप्नील भगरे, मयुर ताड, सुधीर भगरे, आनंद माने, सिद्धेश्वर भगरे, विठ्ठल ताटे, पो. हवालदार बसवराज कोष्टी, निवृत्ती कदम उपस्थित होते.




## सेंट्रल बँकेतर्फे कृषी कर्ज जनजागृती शिबीर

**टेंभुर्णी, दि. २२ फेब्रुवारी-**

सेंट्रल बँक ऑफ इंडिया टेंभुर्णी शाखा, माळीनगर शाखा, पंढरपूर शाखा आणि वांगी शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने येथील करमाळा रोड, रॉयल प्लाय, टेंभुर्णी येथे कृषी कर्ज जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर प्रादेशिक व्यवस्थापक अचिंत कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. तसेच केडी एक्स्पोर्टरचे संचालक किरण डोके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माधुरी लोंढे, तानाजी काशीद, मनीषा गायकवाड, किशोर पराडे उपस्थित होते. याप्रसंगी रॉयल ॲग्रो कोल्ड स्टोरेज आणि ज्योतिर्लिंग ऑटोमोटिव्ह यांना डीडी हस्तांतरित करण्यात आले. तसेच जयवंत कोल्ड स्टोरेज यांना मंजुरी पत्र देण्यात आले. यावेळी अहिल्या देवकाते, राहुल कुशवाह, मोहम्मद शेख, अभिषेक नंदन उपस्थित होते.




## एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंगचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**बार्शी, दि. २२ फेब्रुवारी-**

येथील एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये दि. १५ ते २१ फेब्रुवारी दरम्यान क्रीडा सप्ताह, विविध कलागुणदर्शन, स्नेहसंमेलन तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केले गेले होते. या विविध कलागुणदर्शनाच्या सप्ताहात मिसमॅच डे, बॉलीवूड डे, ट्रॅडिशनल डे इत्यादी कार्यक्रम साजरे करण्यात आले. क्रीडा सप्ताहामध्ये क्रिकेट, चेस, कॅरम, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो इत्यादी क्रीडा प्रकार घेण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नागेश अक्कलकोटे, विरोधी पक्षनेता बार्शी नगरपरिषद व बार्शी ग्रामीणचे पोलीस इन्स्पेक्टर डी. आर. ढेरे उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे, सर्व विभागप्रमुख, डीन, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच क्रीडा समन्वयक प्रा. चेतन आध्ये व प्रा. दीपाली माळी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांनी महाविद्यालयाचे वार्षिक अहवाल वाचन केले. तसेच भविष्यामध्ये अशाच पद्धतीने सांघिक कार्य करण्याचे सूतोवाच केले. वार्षिक संमेलन यशस्वी होण्यासाठी कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. प्रसाद प्रतापे, प्रा. सुषमा मुळे व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन प्रा. साक्षी पारखे यांनी तर आभार विनायक मांडवे यांनी मानले.

# आयटी पार्कसह वस्त्रोद्योगालाही बूस्टर डोस

## सोलापूरच्या उद्योगविकासाला मिळणार दुहेरी गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

सोलापूरच्या पारंपरिक वस्त्रोद्योगाला इचलकरंजीच्या धर्तीवर विशेष सवलती देण्याबाबत राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उच्चस्तरीय बैठक आयोजित केली जाणार असल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. आयटी पार्क उभारणीच्या निर्णयासोबतच वस्त्रोद्योगासाठी सवलतींची हालचाल सुरू झाल्याने सोलापूरच्या औद्योगिक क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.



सोलापूरचा वस्त्रोद्योग हा शहराच्या अर्थकारणाचा कणा मानला जातो. चादरी, टॉवेल, सूतगिरण्या आणि लघुउद्योगांच्या माध्यमातून हजारो कामगारांना रोजगार मिळतो. मात्र वाढते उत्पादनखर्च, स्पर्धात्मक बाजारपेठ आणि तांत्रिक आधुनिकीकरणाचा अभाव यांसारख्या अडचणींमुळे उद्योगाला मागील काही वर्षांत फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर इचलकरंजीप्रमाणे सवलती देण्याचा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे.

इचलकरंजी येथे वस्त्रोद्योगासाठी वीजदर सवलत, भांडवली अनुदान, व्याज सवलत आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर सोलापूरलाही सवलती मिळाल्यास स्थानिक उद्योगांना स्पर्धात्मक ताकद मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. गोरे यांनी सांगितले की, उद्योग प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभाग यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून ठोस निर्णय घेतला जाईल.

दरम्यान, सोलापुरात प्रस्तावित आयटी पार्कमुळे शहराच्या औद्योगिक विकासाला नवे परिमाण मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनानुसार आयटी पार्क उभारणीची प्रक्रिया वेगात सुरू असून, यामुळे सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. आयटी उद्योग आणि पारंपरिक वस्त्रोद्योग यांचा समतोल विकास साधण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे संकेत मिळत आहेत.

आयटी पार्कमुळे तरुणांना स्थानिक पातळीवरच करिअरच्या संधी उपलब्ध होतील. आतापर्यंत पुणे, मुंबई किंवा हैदराबादकडे स्थलांतर करणाऱ्या युवकांना सोलापुरातच रोजगाराच्या संधी मिळू शकतील. दुसरीकडे, वस्त्रोद्योगाला सवलती मिळाल्यास पारंपरिक उद्योगाला नवसंजीवनी मिळेल आणि बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या युनिट्सना उभारी मिळू शकते.

**आता लक्ष अधिवेशनादरम्यान होणाऱ्या बैठकीकडे**

वस्त्रोद्योगासाठी नेमक्या कोणत्या सवलती जाहीर होणार, आयटी पार्कची अंमलबजावणी कितपत वेगाने होणार आणि उद्योगांना प्रत्यक्ष लाभ कधी मिळणार, याबाबत सोलापूरकर उत्सुक आहेत. आयटी पार्क आणि वस्त्रोद्योग सवलती या दोन्ही निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी झाली, तर सोलापूरच्या औद्योगिक प्रगतीला नवे वळण मिळेल, यात शंका नाही.

**दुहेरी संगम झाल्यास सर्वांगीण विकास शक्य**

औद्योगिक तज्ज्ञांच्या मते, सोलापूरसारख्या शहरासाठी दुहेरी धोरण आवश्यक आहे. एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञानाधारित आयटी क्षेत्राचा विस्तार आणि दुसऱ्या बाजूला पारंपरिक उद्योगांचे संरक्षण व आधुनिकीकरण या दोन्हींचा संगम झाल्यासच सर्वांगीण विकास शक्य आहे. सरकारच्या पुढाकारामुळे गुंतवणूक वाढेल, पूरक उद्योग निर्माण होतील आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल.

## सहस्त्रार्जुन विद्यामंदिरमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**



सहस्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिरमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सो. स. क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे सदस्य सुरेश रामकृष्णसा बिद्री लाभले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून वि. मं.ट्रस्टचे सदस्य संजीव हिरालाल रंगरेज उपस्थित होते. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबुरावसा दत्तात्रयसा भूमकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा माने यांनी केले.

आदर्श विद्यार्थी म्हणून इ. ४ थी (शिवनेरी)मधील विद्यार्थी मंजुनाथ पंगुडवाले व आदर्श विद्यार्थिनी म्हणून माहिरा शेख या विद्यार्थ्यांना कै.मोहनलाल माणिकचंद सोनिमिंडे व कै. कमलाबाई सोनिमिंडे यांच्या स्मरणार्थ ऋषभ ट्रेडर्सकडून सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वि.मं. ट्रस्टचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजूसा भूमकर, सचिव गजाननसा गोयल, विद्या गोयल, मुख्याध्यापिका मंजुषा माने, मुख्याध्यापक मोरेश्वर काटवे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार उपस्थित होते.सूत्रसंचालन सहशिक्षक सोमण्णा मलकारी यांनी केले व आभार सहशिक्षिका ऐश्वर्या हुळळे यांनी मानले. इयत्ता चौथी मध्ये शिकत असलेली संस्कृती जाधव या विद्यार्थिनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त माझ्या मनातील छत्रपती शिवराय यांच्यावरील भाषण सादर केले. यावेळी बिद्री यांनी रोख ५०१ रुपये बक्षीस देऊन तिचा गौरव केला.

## सात मार्चला महात्मा बसवेश्वर विचार व कार्य या विषयावर परिषद

### शंकरराव मोहिते महाविद्यालयात आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २२ फेब्रुवारी-**

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात वतीने दि. ७ मार्च रोजी महात्मा बसवेश्वर विचार व कार्य या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, महात्मा बसवेश्वर अध्यासन व शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी दिली.

या परिषदेचे उद्घाटन शनिवार दिनांक ७ मार्च रोजी सकाळी १०:०० वाजता होणार असून प्रमुख उद्घाटक म्हणून कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, तर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या परिषदेमध्ये बीजभाषक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक गजानन धरणे हे उपस्थित राहणार आहेत. दुसऱ्या सत्रात कलबुर्गी येथील सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटक मधील महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्याचे अभ्यासक डॉ.बी.बी.पुजारी हे साधनव्यक्ती म्हणून आपले विचार व्यक्त करणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रकांत चव्हाण उपस्थित राहणार आहेत. तिसऱ्या सत्रात शोधनिबंधाचे वाचन होणार असून अध्यक्षस्थानी इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, डॉ . विष्णू वाघमारे तसेच डॉ. शिवाजीराव वाघमोडे भूषविणार आहेत.परिषदेसाठी संशोधकांनी महात्मा बसवेश्वर यांचे विचार व कार्य या विषयावरील आपले शोधनिबंध smmhistory1970gmail.com या ई-मेलवर दि.२७ फेब्रुवारी पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत, असे आवाहन इतिहास विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. संजय वाघमारे व डॉ. सज्जन पवार यांनी केले आहे.

## श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघातर्फे शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

सोलापूर येथील दक्षिण कसबा येथे श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघातर्फे नुकतीच शिवजयंती साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे व्याख्याते बाळासाहेब पोळ व वल्लभ करकमकर यांच्या हस्ते करण्यात आले.

पोळ यांचा शिवचरित्रातून काय शिकाल । हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. दीड तास त्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या रंजक व्याख्यानाने त्यांनी आपल्या तीनशे वर्षापूर्वीच्या कालखंडात घेऊन गेले. त्याचे व्याख्यान शिवचरित्रावर प्रबोधनात्मक वर्णन केले. पहिल्या प्रथम अध्यक्ष श्रीवल्लभकरकमकर यांनी व्याख्याते पोळ यांचा परिचय करुन दिला. शेवटी प्रा. अनिल अघोर यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक रामकृष्ण अघोर, प्रा. अशोक म्हमाणे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी दुरुगकर व कुलकर्णी, अरविंद जगताप, महाराष्ट्र बँकेतील वैद्य उपस्थित होते.

# पंढरपुरात ॲबस्ट्रॅक्ट आर्टचे अनावरण

## शहराच्या सौंदर्यात पडली भर; भाविक अन् पर्यटकांसाठी आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ फेब्रुवारी-**



प्रगत पंढरपूर, सुंदर पंढरपूर हे ब्रीद समोर ठेवून शहराच्या सुशोभीकरणासाठी क्रेडाई पंढरपूरने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. क्रेडाईतर्फे पंढरीतील पंत चौक आणि गजानन महाराज मठ परिसरात उभारण्यात आलेल्या आधुनिक संकल्पनेवर आधारित ॲबस्ट्रॅक्ट आर्ट शिल्पांचे अनावरण माजी आमदार प्रशांत परिचारक, सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे, सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रशांत परिचारक म्हणाले, शहराच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी आणि सौंदर्यासाठी क्रेडाईने उचललेले हे पाऊल खरोखरच कौतुकास्पद आहे. अशा जागतिक दर्जाच्या कलाकृतींमुळे पंढरीच्या वैभवात भर पडली असून,भाविक आणि पर्यकांसाठी हे एक नवीन आकर्षण ठरेल. याप्रसंगी क्रेडाई पंढरपूरचे अध्यक्ष आशिष शहा व सचिव शशिकांत सुतार यांनी क्रेडाईच्या सामाजिक बांधिलकीबद्दल माहिती दिली.शहराच्या विकासात आणि सुशोभीकरणात क्रेडाई नेहमीच अग्रेसर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या सौंदर्याकरण प्रकल्पासाठी निशिगंधा बँक यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभले आहे. तसेच, पालवी संस्थेतर्फे घाटे परिवार यांच्या विशेष सहकार्यातून आणि स्मृतिप्रीत्यर्थ ही नयनरम्य शिल्पे साकारण्यात आली आहेत.




## स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त ३३९ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ फेब्रुवारी-**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३३९ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन सोलापूरच्या वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रा.डॉ चंद्रकांत चव्हाण यांच्या हस्ते झाले. शिबिरासाठी श्री स्वामी समर्थ ब्लड सेंटर, पंढरपूर, डॉ. हेगडेवार रक्त केंद्र, सोलापूर व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व डॉ वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर या रक्तपेढ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी चव्हाण, संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या नेतृत्वाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, प्रा. अविनाश मोटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके यांनी परिश्रम घेतले.

## जेईई परीक्षेत बाकलीवाल टयुटोरियल्सचे सहा जण ९९ पर्सेंटाईलच्या पार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

यंदाच्या जेईई मेन्स परीक्षेत बाकलीवाल ट्युटोरियल्सने उत्कृष्ट निकाल देत शैक्षणिक क्षेत्रात आपली छाप अधिक मजबूत केली आहे. संस्थेच्या तब्बल ६ विद्यार्थ्यांनी ९९ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले असल्याची माहिती देण्यात आली. यामध्ये अर्हान वारेकर (९९.७६), दिग्विजय हजारे (९९.७६), दृष्टी बाफना (९९.५५), यशवर्धन राजमाने (९९.३३), पुष्कर पेशवे (९९.०५) आणि आयुष लिगाडे (९९.०३) यांनी ९९ पर्सेंटाइलचा टप्पा ओलांडला. याशिवाय १५ विद्यार्थी ९८, २७ विद्यार्थी ९७, तर ३६ विद्यार्थी ९५ पर्सेंटाइलच्या पुढे आहेत. नियमित 'टेस्ट सिरीज', सविस्तर ॲनालिसिस आणि कन्सेप्ट क्लॅरिटी यामुळेच हे यश मिळाल्याची भावना यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. केवळ अभ्यास नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये योग्य दृष्टिकोन आणि स्पर्धात्मक विचारसरणी विकसित करण्यावर आमचा भर असतो. सोलापूरच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर सक्षम बनवणे हे आमचे ध्येय आहे, असा विश्वास बाकलीवाल ट्युटोरियल्सचे सोलापूर हेड सिन्हा यांनी व्यक्त केला. पालकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल संस्थेने कृतज्ञता व्यक्त केली




## शिवजयंतीनिमित्त रानमसलेत विविध शालेय स्पर्धा उपक्रम

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिराअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त रानमसले, ता. उत्तर सोलापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावित्री कन्या प्रशाला तसेच श्री ब्रम्हगायत्री विद्यामंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालय या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विविध शालेय स्पर्धा उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांत शिवस्वराज्य संकल्पना, गडकिल्ले संवर्धन, शिवचरित्र, शिवकालीन कृषिव्यवस्था, छत्रपती शिवाजी महाराज, माझे गाव, माझी शाळा आदी विषयांवर चित्रकला व निबंध स्पर्धांचा समावेश होता. प्रारंभी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच मनोहर क्षिरसागर, उपसरपंच रमेश सुतार, मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील, प्राचार्य महादेव गवळी, प्राचार्य नितीन गायकवाड, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर उपस्थित होते. यावेळी विविध शालेय स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. निबंध स्पर्धेत स्वराली शिंदे, शिवन्या गरड व प्रांजली साळुंखे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला तर चित्रकला स्पर्धेत आसावरी पवार, श्रद्धा गरड व आर्यन अंकुश यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच गायन स्पर्धेत निवेदिता गजघाटे, समिक्षा वाघमारे व सई शितोळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. धावणे स्पर्धेत योगिराज सुरवसे, ऋतुजा सुरवसे व उस्मान शेख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला तर लिंबू चमचा स्पर्धेत ऋतुजा सुरवसे, रिद्धी गरड व शोएब मुजावर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. निबंध स्पर्धेत आकाश साबळे, गायत्री गरड व रेणुका वाघमारे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. तसेच चित्रकला स्पर्धेत विकास जगताप, स्वराज मोरे व आरुषी भोसले यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. निबंध स्पर्धेत श्रावणी गरड, पार्थ दीक्षित व दुर्वा गरड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच चित्रकला स्पर्धेत मयुरी गरड, आदिती देशमुख व ऋतुराज गरड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पाकिस्तानचा अफगाणवर हवाई हल्ला

**पक्तिका-नांगरहार प्रांतात ड्रोनचा मारा** | **२२ नागरिकांचा मृत्यू**

**५० जखमी, मशीदही उद्ध्वस्त**



◆ **काबूल, २२ फेब्रुवारी**

अफगाणिस्तानच्या पक्तिका आणि नांगरहार प्रांतातील खोग्यानी जिल्ह्यात रविवारी पहाटे पाकिस्तानी वायुदलाने सात ठिकाणी हल्ले चढविले. यात एक मशीद उद्ध्वस्त झाली. यात २२ नागरिकांचा मृत्यू आणि ५० पेक्षा अधिक जखमी झाले. मृतकांपैकी १७ लोक एकाच कुटुंबातील आहे.

पाकिस्तानी लष्कराने निवेदन जारी करून हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. पाकिस्तानात अलीकडेच झालेल्या आत्मघाती हल्ल्याचा सूड घेण्यासाठी कारवाई केली. तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान अर्थात् टीटीपी आणि त्याच्याशी संबंधित गटांच्या सात अड्ड्यांना लक्ष्य करण्यात आले. पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, सीमावर्ती भागात इस्लामिक स्टेट अर्थात् इसिसशी संबंधित गटाच्या लपण्याच्या ठिकाणांवरही हल्ला करण्यात आला. निवासी इमारतींवर हल्ल्याचा आरोप त्यांनी फेटाळला. तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीउल्लाह मुजाहिद यांनी म्हटले की, पाकिस्तानी वायुदलाने नांगरहार आणि पक्तिका प्रांतातील सात ठिकाणी आमच्या नागरिकांवर बॉम्बहल्ला केला, ज्यामध्ये महिला आणि मुलांसह २२ लोक मारले गेले आणि ५० पेक्षा अधिक जखमी झाले. हल्ल्यात अनेक धार्मिक स्थळांचे नुकसान झाले. पाकिस्तानची कारवाई दहशतवादी हल्ला आहे आणि याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेने पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यावर चिंता व्यक्त केली आहे. *(वृत्तसंस्था)*

### अनेक नागरिक ढिगाऱ्याखाली अडकले

पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यात अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या, रविवारी सकाळपासून बचाव कार्य सुरू असून, अजूनही अनेक नागरिक ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याने दिली. बेहसुद जिल्ह्यात एका नागरिकाच्या घराला लक्ष्य केले, ज्यामुळे कुटुंबातील २३ सदस्य ढिगाऱ्याखाली गाडले गेले. आतापर्यंत १७ जणांना बाहेर काढण्यात आले.

### निष्पापांच्या मृत्यूचा सूड घेणार



**तालिबानी सरकारचे प्रवक्ते जबीउल्लाह मुजाहिद म्हणाले, पाकिस्तानने नापाक कृत्य केले, ज्यामध्ये निष्पाप लोक मारले गेले आहेत. पाकिस्तानी जनरल अशा कृत्यांमध्ये सहभागी होऊन देशात त्यांची प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत. आम्ही लवकरच ताकदीने हल्ल्याला प्रत्युत्तर देऊ आणि निष्पाप नागरिकांच्या मृत्यूचा सूड घेऊ.**

### दोन्ही देशांत पुन्हा उफाळणार संघर्ष

२०२१ मध्ये तालिबानने काबूलवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यापासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू झाला. अलिकडच्या काही महिन्यांत झालेल्या प्राणघातक सीमा संघर्षांमुळे दोन्ही देशांमधील संबंध बिघडले आहेत, अफगाणिस्तानातील तालिबान सरकारवर दहशतवाद्यांना आश्रय देण्याचा आरोप पाकिस्तानने केला. पाकिस्तानच्या हल्ल्यामुळे दोन्ही देशांत पुन्हा संघर्ष उफाळण्याची शक्यता आहे.

# इराण जागतिक दबावापुढे कदापि झुकणार नाही

**राष्ट्राध्यक्ष पेझेश्किंयान यांचा इशारा** | **अमेरिकेला प्रत्युत्तर देण्यास सज्ज**



◆ **तेहरान, २२ फेब्रुवारी**

जगातील शक्ती आपल्यावर दबाव आणण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे, परंतु कितीही अडचणीला सामोरे जावे लागले तरीही झुकणार नाही. अमेरिकेने बळाचा वापर केल्यास प्रत्युत्तर देण्यास सज्ज असल्याचा इशारा इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी दिला.

सरकारी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पेझेश्कियान म्हणाले, अमेरिकेने पश्चिम आशियात नौदलाची कुमक वाढवली, त्यांचा उद्देश इराणवर दबाव आणून अणुकार्यक्रम रोखण्यासाठी करार करण्यास भाग पाडणे आहे. त्यांनी कितीही कुरघोड्या केल्या तरी आम्ही झुकणार नाही. देशाचे रक्षण करण्यासाठी अण्वस्त्रे निर्मितीचा आम्हाला अधिकार असून, कोणताही देश रोखू शकत नाही. आम्हाला कमकुवत समजणे त्यांची चूक असेल. अमेरिकेला मदत करणाऱ्या देशांना किंमत चुकवावी लागेल. आम्ही शांततेच्या मार्गाने वाटाघाटी करण्यास तयार आहोत. मात्र बळाचा वापर करणे, धमकावणे खपवून घेणार नाही. दरम्यान राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या आदेशानुसार जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीतून जाणारी विमानवाहू जहाज यूएसएस गेराल्ड आर. फोर्ड, यूएसएस अब्राहम लिंकन आणि एक एस्कॉर्ट युद्धनौका इराणच्या सीमेवर तैनात करण्यात आल्या आहेत.

इराण अमेरिकेला युद्धाच्या धमक्या देत असला तरी बलाढ्य देशासोबत युद्ध करणे म्हणजे अंगावर संकट ओढवून घेण्यासारखे आहे, याची जाणीव असल्याने मागच्या दाराने चर्चाही केली जात आहे. अमेरिकेलाही युद्ध नको असल्याने इराणला विचार करण्यासाठी दहा दिवसांचा कालावधी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. येत्या सहा दिवसांत संघर्ष की शांतता, यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. *(वृत्तसंस्था)*

### पश्चिम आशियातील तळांवरून सैन्य हलविले

इराणशी युद्धाच्या भीतीने अमेरिकेने मध्य पूर्वेतील हवाई आणि लष्करी तळावरील सैन्य सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यास सुरुवात केली आहे. संघर्षाची परिस्थिती उद्भवल्यास इराण अमेरिकन सैन्याला लक्ष्य करू शकते, यामुळेच पेंटागॉनने सैन्याला स्थलांतरित करणे सुरू केल्याचे न्यू यॉर्क टाईम्सच्या अहवालात म्हटले आहे. कतारच्या अल उदेद तळावरून शेकडो सैन्य स्थलांतरित करण्यात आले. याशिवाय बहरीन, इराक, सीरिया, कुवेत, सौदी अरब, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिराती येथील अमेरिकन तळांवरील सैन्याला सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

### इराणमध्ये विद्यार्थ्यांची निदर्शने

इराणमध्ये निदर्शकांवर केलेल्या कारवाईनंतर पुन्हा निदर्शने सुरू झाली आहेत. शनिवारी, तेहरान आणि मशहादमधील विद्यापीठ परिसरात शेकडो विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला आणि खामेनेई यांच्याविरोधात नारेबाजी केली. खामेनेई यांना मृत्यूदंड देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# ट्रेलरची बोलेरोला धडक; पाच पोलिसांचा मृत्यू

**ओडिशाच्या झारसुगुडा जिल्ह्यात भीषण अपघात**

◆ **भूवनेश्वर, २२ फेब्रुवारी**

ओडिशा राज्यातील झारसुगुडा जिल्ह्यात रविवारी पहाटे एका भरधाव ट्रेलरने पोलिसांच्या बोलेरो वाहनाला धडक दिली, या अपघातात पाच पोलिस कर्मचारी ठार झाले तर तीन जण गंभीर जखमी झाले. झारसुगुडा सदर पोलिस ठाण्याजवळ हा अपघात झाला.

कर्तव्यावर असलेले पोलिस वाहन आणि विरुद्ध दिशेने वेगाने येणाऱ्या ट्रेलरची समोरासमोर धडक झाली. अपघात इतका भीषण होता की पोलिसांचे वाहन चक्काचूर झाले आणि त्यात बसलेले पाच पोलिस घटनास्थळीच ठार झाले. जखमी झालेल्या तीन कर्मचाऱ्यांमध्ये सशस्त्र पोलिस राखीव दलाचे (एपीआर) दोन सदस्य आणि एक सार्जंट यांचा समावेश आहे. स्थानिक पोलिसांनी बचाव कार्य सुरू केले आणि त्यांना ताबडतोब झारसुगुडा जिल्हा मुख्यालय रुग्णालयात हलवले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि परिस्थितीचा आढावा घेतला. पोलिसांनी ट्रेलर चालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहेत. *(वृत्तसंस्था)*

# भारत-अमेरिकेत संयुक्त लष्करी सराव

**'वज्र प्रहार' आजपासून सुरू होणार**

◆ **नवी दिल्ली, २२ फेब्रुवारी**

भारत आणि अमेरिकेच्या सैन्यांमधील मजबूत भागीदारी आणि सामायिक दृढनिश्चय मजबूत करण्याच्या उद्देशाने 'वज्र प्रहार' हा संयुक्त लष्करी सराव सोमवारपासून हिमाचल प्रदेशातील बाकलोह येथील विशेष दल प्रशिक्षण केंद्राच्या परिसरात आयोजित केला जाणार आहे. लष्करी सरावाची ही १६ वी आवृत्ती आहे.

उच्चस्तरीय द्विपक्षीय सराव जटिल ऑपरेशनल वातावरणात इंटरऑपरेबिलिटी, टॅक्टिकल समन्वय आणि लढाऊ तयारी वाढवण्याच्या



उद्देशाने आयोजित केला जात असून, सराव १५ मार्चपर्यंत सुरू राहील. भारतीय लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, हा सराव संरक्षण सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी, इंटरऑपरेबिलिटी आणि संयुक्त ऑपरेशनल तयारी वाढविण्यासाठी आणि प्रगत विशेष ऑपरेशन रणनीती, तंत्रे आणि प्रक्रियांची देवाणघेवाण करण्यासाठी आयोजित केला आहे. कठोर आणि वास्तववादी परिस्थितींमध्ये प्रशिक्षणाद्वारे, दोन्ही देशांचे सैनिक परस्पर विश्वास आणि ऑपरेशनल समन्वय मजबूत करतील. उत्कृष्ट भागीदारी निर्माण करणे आणि सामायिक संकल्प मजबूत करणे सरावाचे उद्दिष्ट आहे. *(वृत्तसंस्था)*

# भारत-पाक सीमेवरील चौकीत आढळले जवानांचे मृतदेह

◆ **गुरदासपूर, २२ फेब्रुवारी**

पंजाबमधील गुरुदासपूर येथे भारत-पाकिस्तान सीमेवर पोलिस चौकीत दोन पोलिसांचे मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. मृत पोलिसांची ओळख सहायक उपनिरीक्षक गुरनाम सिंग आणि होमगार्ड जवान अशोक कुमार अशी झाली. गुरुदासपूरमधील दोरंगला पोलिस ठाण्याअंतर्गत सीमेजवळ असलेल्या अदियान चौकीत ही घटना समोर आली. मृत्यूचे कारण अद्याप समोर आलेले नाही. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले. तथापि, पोलिस अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. *(वृत्तसंस्था)*



काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यात पिरपंजाल पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या बंदी चेचियान गावाजवळ लष्कराने 'बानवत एकता स्थळ' उभारले आहे. मुलांना खेळण्यासाठी बागची निर्मितीही करण्यात आली आहे. येथे १०५ फूट उंचीचा तिरंगा ध्वजही उभारण्यात आला आहे.

# भूपेन बोरांचा भाजपात प्रवेश

**निवडणुकीपूर्वी आसाममध्ये काँग्रेसला धक्का**

◆ **गुवाहटी, २२ फेब्रुवारी**

आसाम काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष भूपेन बोरा यांनी रविवारी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप सैकिया आणि खासदार बैजयंत पांडा यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. आसाम विधानसभा निवडणुकीपूर्वीच काँग्रेस पक्षाला हा मोठा धक्का आहे.

बोरा यांनी शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांच्यासह मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची भेट घेतली होती. भाजपा पक्षप्रवेशानंतर बोरा यांनी दावा केला की, १८ मार्चपर्यंत राज्यातील ५० टक्के काँग्रेस कार्यकर्ते भाजपात प्रवेश करतील. मागील आठवड्यात




बोरा यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला होता, मात्र पक्षाने त्यांचा राजीनामा स्वीकारला नव्हता आणि वरिष्ठ नेत्यांनी त्यांना भेटण्यासाठी बोलावले होते. राहुल गांधींनीदेखील त्यांच्याशी फोनवरून चर्चा केली. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी बोरा यांना त्यांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले होते, परंतु दुसऱ्याच दिवशी मुख्यमंत्री सरमा यांची भेट घेवून त्यांनी भाजपात प्रवेश केला.

**अपमान असह्य झाल्याने दिला राजीनामा**

पक्षप्रवेशानंतर बोलताना बोरा म्हणाले की, पक्षातील अपमानाचा मुद्दा राहुल गांधींकडे उपस्थित करूनही त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. अपमान सहन न झाल्यानेच आपण राजीनाम्याचा निर्णय घेतला. सरमा यांच्याकडून भाजपामध्ये सामील होण्यासाठी ५० कोटी रुपये स्वीकारल्याच्या गौरव गोगोई यांच्या आरोपाला उत्तर देताना बोरा म्हणाले की, घोटाळे करणाऱ्यांना पैशाशिवाय काहीही दिसणार नाही. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### श्रद्धा कपूर अंबाबाईच्या चरणी



बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर 'ईठा' या आगामी चित्रपटाच्या शूटिंगसाठी कोल्हापुरात आली असून, तिने अंबाबाई मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. तिच्या आगमनाची माहिती मिळताच मंदिर परिसरात चाहत्यांची मोठी गर्दी जमली. आगामी चित्रपट ईठाच्या शूटिंगमध्ये व्यस्त असलेल्या श्रद्धाने कोल्हापुरात आई अंबाबाई मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी तिच्यासोबत या चित्रपटातील अभिनेता रणदीप हुड्डा देखील होता. दोघांचे कोल्हापूरमधून व्हिडी ओ व्हायरल झाले. छावा चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर हे ईठाचे दिग्दर्शन करत आहेत. यासाठी श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत असून ती विठाबाई नारायणगावकर यांच्या भूमिकेत दिसणार आहे. विठाबाई यांच्या आयुष्यावर आधारित चित्रपटाची कहाणी आहे.

### देओल बंधू आमने-सामने



मे महिन्यात बॉक्स ऑफिसवर देओल बंधू आमने-सामने येणार आहेत सनी देओलचा 'गबरू' आणि बॉबी देओलचा 'बंदर' हे दोन्ही चित्रपट एकाच सुमारास प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर कोण बाजी मारणार याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये आहे. दोघांच्याही अलीकडील यशामुळे ही स्पर्धा अधिकच रंगतदार ठरणार आहे. दोन सख्ख्या भावांचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर आमने-सामने असणे ही प्रेक्षकांसाठी पर्वणीच असेल बॉलीवूडमध्ये अनेकदा मोठ्या स्टार्सचे चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित होतात आणि बॉक्स ऑफिसवर चुरस निर्माण होते. यावेळची स्पर्धा दोन भावातच आहे. सनी आणि बॉबी यांचे अनुक्रमे गबरु आणि बंदर हे चित्रपट मे महिन्यात एकाचवेळी प्रदर्शित होणार आहे.

### 'जय हनुमान'चे चित्रीकरण सुरू



चित्रपट 'जय हनुमान'ची अधिकृत सुरुवात मुहूर्त पूजेने झाली. हा कार्यक्रम रविवारी कर्नाटकच्या कोप्पल जिल्ह्यातील अंजनाद्री बेट्टा येथे पार पडला, या स्थळाला भगवान हनुमानाचे जन्मस्थान मानले जाते. टी-सीरीजचे भूषण कुमार हा चित्रपट सादर करत आहेत, प्रशांत वर्मा या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत आणि यात ऋषभ शेट्टी मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट २०२४ च्या ब्लॉकबस्टर चित्रपट हनुमानचा सिक्वेल आहे. या चित्रपटाची निर्मिती मैत्री मूव्ही मेकर्स करत आहेत. राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता ऋषभ शेट्टी या चित्रपटात भगवान हनुमानाची भूमिका साकारत आहेत. अभिनेता तेजा सज्जा यापूर्वी २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या हनुमान चित्रपटाचा भाग होते. हा चित्रपट मोठ्या स्तरावर तयार केला जाईल. कथेचा भव्य पैलू आणि श्रद्धेची भावना प्रभावीपणे सादर करण्यासाठी यात उत्कृष्ट निर्मिती मूल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल, असे भूषणकुमार यांनी सांगितले.

## १७,००० मेट्रिक टन कोळसा जप्त

◆ **शिलाँग, २२ फेब्रुवारी**

बेकायदेशीर खाणकाम आणि वाहतुकीविरुद्धच्या कारवाईचा एक भाग म्हणून मेघालय पोलिसांनी पूर्व जैंतिया हिल्स जिल्ह्यात १७,००० मेट्रिक टनांहून अधिक कोळसा आणि २५.५ किलो स्फोटक पदार्थ जप्त केले.

५ फेब्रुवारीला थांगस्कू परिसरात बेकायदेशीर कोळसा खाणीत झालेल्या स्फोटानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. या स्फोटात ३४ जणांचा मृत्यू तर अनेक जण जखमी झाले होते. या घटनेनंतर पोलिसांनी बेकायदेशीर खाणकामांविरुद्ध धडक मोहीम राबवण्यास सुरुवात केली. पूर्व जैंतिया हिल्सचे पोलिस अधीक्षक पंकज कुमार रासगानिया म्हणाले, पोलिसांनी २०-२१ फेब्रुवारीच्या रात्री छापा टाकून बेकायदेशीरपणे उत्खनन केलेला १७,३२२ मेट्रिक टन कोळसा आणि सोडून दिलेल्या खाणींमधून २५.५ किलो स्फोटक पदार्थ जप्त केले. *(वृत्तसंस्था)*

# भारतात वर्षाला ५४ हजार कोटींचे दान

**● 'हाऊ इंडिया गिव्ह्स'चा अहवाल ● धार्मिक संस्थांना सर्वाधिक ४५.९ टक्के देणग्या**





◆ **नवी दिल्ली, २२ फेब्रुवारी**

भारतात देणग्यांचा सर्वात मोठा आधार सामान्य कुटुंबे असून, वर्षाला त्यांच्याकडून एकूण ५४ हजार कोटींचे दान दिले जाते. १४० कोटी लोकसंख्येपैकी देशातील ६८ टक्के लोकांनी कोणत्या ना कोणत्या स्वरुपात दान केले, यात धार्मिक संस्थांना दिलेल्या देणग्या ४५.९ टक्के असल्याची माहिती 'हाऊ इंडिया गिव्ह्स' च्या अहवालातून समोर आली.

भारतात वैयक्तिक देणग्यांपैकी ४५.९ टक्के हिस्सा धार्मिक संस्थांना जातो. ४१.८ टक्के देणग्या थेट अत्यंत गरीब, गरजू आणि भिक्षा मागणाऱ्यांना मिळतात. गैरधार्मिक संस्थांपर्यंत केवळ १४.९ टक्के देणग्या पोहोचतात असे 'हाऊ इंडिया गिव्ह्स' अहवालाच्या तिसऱ्या आवृत्तीतून समोर आली आहे. देशात देणग्यांचा सर्वात मोठा आधार सामान्य कुटुंबे आहेत. एकूण घरगुती देणग्यांचा अंदाज दरवर्षी ५४ हजार कोटी रुपये आहे. देणगी म्हणून दिलेले बरेच अन्न मोफत सामुदायिक स्वयंपाकघरांपर्यंत पोहोचते. सेवेचे सर्वात सामान्य स्वरूप म्हणजे धार्मिक संस्थांमध्ये काम करणे आहे. भारतीय जगातील सर्वात उदार लोकांमध्ये सहभागी असल्याचे अहवालात नमूद आहे. हा अभ्यास २० राज्यांमधील सर्वेक्षणावर आधारित आहे. सामान्य लोक रोख रक्कम, वस्तूंच्या स्वरूपात मदत आणि सामाजिक कामांमध्ये कसे योगदान देतात हे समजून घेणे हा सर्वेक्षणाचा उद्देश होता. *(वृत्तसंस्था)*

### एकूण दानामध्ये रोख रकमेचा वाटा ४४ टक्के

अहवालात दानाचे प्रकार देखील सांगितले आहेत. वस्तूंच्या स्वरूपातील मदतीचा वाटा सर्वात जास्त ४६ टक्के आहे. रोख दान ४४ टक्के आहे. सुमारे ३० टक्के लोकांनी स्वयंसेवा केल्याचे सांगितले. अहवाल प्रसिद्ध करताना सीएसआयपीच्या संचालक आणि प्रमुख जिनी उप्पल म्हणाल्या की, हा अहवाल भारताच्या त्या उदारतेला समोर आणतो, जी नेहमीच अस्तित्वात होती, परंतु तिचे कमी मूल्यांकन केले गेले. राष्ट्रीय उपभोग आकडेवारीच्या आधारावर विश्लेषण केल्यास भारत दान करण्यात जगात आघाडीवर असल्याचे समोर येते.

### उत्पन्न वाढल्यास दानातही वाढ

अहवालानुसार, दैनंदिन दान सरासरी उत्पन्न असलेल्या कुटुंबातून होते. कमी उपभोग पातळी (४ ते ५ हजार रुपये प्रति महिना) असलेल्या कुटुंबातील ५० टक्के लोक महिन्याला एकदा दान करतात. उत्पन्न वाढल्यास दानातदेखील वाढ होते. दानाचा उद्देश देवांप्रती असलेली श्रद्धा, मानसिक समाधान, समाजाप्रती दायित्व आणि गरजूंना मदत करणे असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आता कळेल वेदनेचा अर्थ

इस्लाममध्ये रमजान या नवव्या महिन्याला अत्यंत महत्त्व आहे. हा महिना मांगल्याचे प्रतीक असल्याने त्याला कृपाप्रसादाचा महिनाही म्हणतात. पवित्र कुराणचे अवतरण याच महिन्यात झाले. रमजानचे पहिले दशक कृपेचे, दुसरे क्षमेचे तर नरकापासून मुक्ततेचे मानले जाते. त्यामुळे या काळात इबादत करणाऱ्यास अल्लाह क्षमादान देईल आणि नरकापासून मुक्तता देईल. त्यामुळेच अल्लाहचे बंदे संसार, व्यापाराचा त्याग करून अल्लाहला शरण जातात. अशा या पवित्र महिन्यात शांतता असावी, अशी अपेक्षा निदान इस्लामिक स्टेट ऑफ पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या देशांकडून आहे. कारण आम्हीच इस्लामचे रखवाले असल्याची आवई हे देश देत असतात. मात्र, धर्माच्या नावावर या दोन्ही देशांमध्ये माणसांचे जेवढे जीव घेतले गेले आहेत तेवढे अन्य कुठल्याही देशामध्ये आढळणार नाही. विशेष म्हणजे हे दोन्ही देश कधीकाळी अखंड हिंदुस्थानचेच तुकडे होते. हिंदू आणि बौद्ध राजांच्या राजवटी कधीकाळी अफगाणिस्तानात सुखाने नांदत होत्या. खैबर आणि बोलन खिंडींच्या अलिकडचा भागही, जो आज पाकिस्तान आहे, भरभराटीस आलेला होता. पण, धर्मांधतेने दोन्ही देशांचा ऱ्हास केला.

जगातील छोटे छोटे देश विकासाचे उंच उंच इमले बांधत असताना साधन संपत्तीने समृद्ध असतानाही पाकिस्तान-अफगाणिस्तान दरिद्री अवस्थेत खितपत पडलेले आहेत. कारण काय तर एकच आणि ते म्हणजे धर्मांधता. भूतकाळात अफगाणिस्तानने सहिष्णूता, शांततेचा पुरस्कार करणाऱ्या हिंदुस्थानचा प्रचंड छळ केला. सबुक्तगीन, गझनी, घोरी, खिल्जी, मोघल आणि अब्दाली या क्रूर शासकांनी लक्षावधी नागरिकांची कत्तल करीत अगणित संपत्ती लुटून नेली. पण, लुटारूंच्या या देशाची आजची परिस्थिती काय आहे? आज जवळपास ४५ वर्षांपासून म्हणजे १९७९ मधील रशियाच्या आक्रमणानंतर अफगाणिस्तान जगापासून तुटला आहे, कंगाल-भंगार झाला आहे. धर्माच्या नावावर लुटमार करणाऱ्या दरोडेखोरांच्या नशिबी आणखी काय येणार? हिंदुस्थानची कबर खोदण्याची स्वप्ने पाहणारे हे दोन्ही देश आता त्याच कबरीच्या काठावर उभे आहेत. हा सर्व काळ भूतकाळ मांडण्याचे कारण एकच की, जसे तुम्ही कराल, तसेच तुम्हाला भरावे लागणार आहे. भारतीय जीवन दर्शनातील 'यादृशं कुरूते कर्म तादृशं फलमृश्ते।' हा संस्कृत श्लोकसुद्धा हेच दर्शवितो. रमजानचा पवित्र नववा महिन्याचे उपवास सुरू आहेत. हा महिना पवित्रता, त्याग, संयम, नैतिकता आणि बंधुत्वाची शिकवण देणारा आहे. थोडक्यात हा महिना म्हणजे अल्लाहच्या जवळ जाण्याचा आणि स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणारा आहे. या पवित्र महिन्यात पाकिस्तानने मात्र अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करून २० पेक्षा जास्त निष्पाप नागरिकांचे बळी घेण्याचे सैतानालाही लाजवेल, असे कृत्य केले. रविवारी रात्री नागरिक झोपेत असताना पाकिस्तानच्या लढाऊ विमानांनी नानगाहर आणि पख्तिया प्रांतात तीन हल्ले केले. या हल्ल्यात महिला आणि मुलांसह झोपेत असलेल्या नागरिकांचा मृत्यू झाला. एक मदरसा, एक मशिद आणि काही मातींच्या घरांवर शक्तिशाली बॉम्ब पडल्याने नागरिक मलब्यात दबून ठार झाले. २०२१ मध्ये तालिबान सत्तेवर आल्यापासून दोन्ही इस्लामिक बंधू असलेले हे दोन्ही देश एकमेकांच्या जिवावर उठले आहेत. खरे तर तालिबानचे पालनपोषण करणारा पाकिस्तानच आहे. या इस्लामिक बरादरचा उपयोग हिंदुस्थानच्या विरोधात विशेषतः जम्मू-काश्मिरात करण्याचे कुटिल मनसुबे पाकिस्तानने आखले होते. पण, झाले उलटेच. भारताचे तर कुणी काहीही वाकडे करू शकले नाही; उलट हे दोन्ही देश गृहयुद्धात अडकले आहेत. १९९० च्या दशकात काश्मिरात जेव्हा दहशतवादाला सुरुवात झाली तेव्हा अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांनाच घुसविण्यात आले होते. अकबर भाई हे त्यापैकी एक नाव. रशियन सैन्य परत गेल्यानंतर या दहशतवाद्यांना काही कामधंदा नसल्याने पाकिस्तानी सैन्याने त्यांना काश्मिरात पाठविले होते. हा अकबर अफगाणिस्तानातील हिकमतयार या दहशतवादी गटाचा प्रमुख गुलबदीन हिकमतयार याचा अंगरक्षक होता. १९९३ मध्ये सोपोरजवळ भारतीय जवानांनी अकबरला ठार केले. १९९६ मध्ये तालिबानने काबूल जिंकल्यानंतर काश्मीर खोऱ्यात हिंसाचार वाढला होता. आकडेवारी हेच सांगते. गेल्या चार दशकांत जेवढे नागरिक, सुरक्षा जवान आणि दहशतवादी हिंसाचारात ठार झाले त्यापैकी ४० टक्के १९९६ ते २००१ या काळात मारले गेले. या काळात अफगाणिस्तानात तालिबान सत्तेवर होते. अमेरिकेवरील हल्ल्यानंतर तालिबानला सत्तेवरून हाकलून लावल्यानंतर परिस्थिती बदलली. अफगाणी दहशतवाद्यांनी नंतर काश्मीरकडे वळूनही पाहिले नाही. तसेही १९९० पासून काश्मीर खोऱ्यात फक्त ८४ अफगाणी दहशतवाद्यांची उपस्थिती दिसून आली. यापैकी काही चकमकीत ठार झाले तर काही पळून गेले. त्यानंतर जवळपास १० वर्षे अफगाणिस्तानात शांतता होती. २०२१ मध्ये पुन्हा तालिबान सत्तेवर आल्याने पाकिस्तानने पुन्हा एकदा तालिबान्यांच्या मदतीने काश्मिरात आग लावण्याचे प्रयत्न केले. पण, हे तालिबानी काही १९९० च्या काळातील नव्हते. धर्माच्या नावावर हिंसा केली तर मरणच नशिबी येणार, सुख नव्हे याची जाणीव या पुढारलेल्या तालिबान्यांना झाली. पैसा, संपत्ती, सत्ता आणि पळून गेलेल्या अमेरिकन सैनिकांची शस्त्रे व वाहने हाती लागल्याने ही सर्व साधने आणि सुखाचा पाकिस्तान म्हणेल म्हणून त्याग करायला हे तालिबानी काही मूर्ख आणि बावळट नव्हते. तसेच या तालिबान्यांचा मूळ पिंड हा पेंढाऱ्यांचाच आहे. सत्तेमुळे सुखावलेले आणि खुर्चीसाठी चटावलेले तालिबान आपल्या तालावर नाचत नसल्याचे पाहून पाकिस्तानचे डोके फिरले आणि त्यांनी अफगाणी निर्वासितांना हाकलून देण्यास सुरुवात केली. गेली तीन दशके पाकिस्तानात राहणाऱ्यांना अफगाणींना हाकलल्याने दोन्ही देशांत निर्माण झालेला तणाव अजूनही कायम आहे. जमिनी युद्धात तरबेज असलेल्या तालिबानकडे हवाई युद्ध क्षमता नाही तसेच क्षेपणास्त्रेही नाहीत. त्यामुळे हानी टाळण्यासाठी पाकिस्तानने २०२१ पासून अफगाणिस्तानवर पाच वेळा हवाई हल्ले करून शेकडो नागरिकांचा बळी घेतला. पहिला हल्ला एप्रिल २०२२, दुसरा मार्च २०२४, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२५ मध्ये दोन तर २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पाचवा हवाई केला.

प्रतिहल्ला करण्याची क्षमता तालिबानकडे नाही. परिणामी योग्य वेळ पाहून आत्मघाती हल्ला अथवा सीमावर्ती भागात तैनात असलेल्या सैनिकांवर अचानक धावा बोलून पाकिस्तानची जेवढी मनुष्यहानी होईल तेवढी करण्याचा प्रयत्न तालिबान करीत असतो. ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या धुमश्चक्रीत पाकिस्तानचे ५० पेक्षा जास्त सैनिक ठार झाल्यानंतर प्रचंड तणाव निर्माण होऊन व्यापार ठप्प झाला. दोन्ही देशांमध्ये २६०० किलोमीटर लांबीची सीमारेषा आहे. व्यापार बंद झाल्याने दोन्ही देशांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. अफगाणिस्तानला भारत चाबाहार बंदरामार्फत खाद्यवस्तू आणि औषधांचा पुरवठा करीत आहे. मात्र, सीमा बंद असल्याने पाकिस्तानी व्यापारी हवालदिल झाले आहेत. या हल्ल्यानंतर तालिबान शांत बसणार नाही, एवढे मात्र नक्की. निष्पाप मुले आणि महिलांचा हल्ल्यात मृत्यू झाल्याने चवताळलेल्या तालिबानने या हल्ल्यांचा योग्य ठिकाणी आणि योग्यवेळी सूड घेण्याची घोषणा केली आहे. परिणामी आणखी एक हल्ला आणि प्रतिहल्ला अशी सूड उगविण्याची मालिका कायम राहणार आहे. कधीकाळी जो पाकिस्तान सीमापार दहशतवादाचा वापर करीत हिंदुस्थानला जखमा करीत होता त्याच जखमा आता तालिबान पाकिस्तानला करीत आहे. ज्या दहशतवादरूपी भस्मासुराला आशीर्वाद दिला, पालनपोषण केले तोच आता पाकिस्तानवर उलटला आहे. दहशतवादी हल्ल्यांमध्ये सैनिक आणि निष्पाप नागरिक ठार झाल्यानंतर झालेल्या जखमांच्या वेदना काय असतात, हे आता पाकिस्तानला कळू लागले आहे. ▮

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# प्रकरण निखिल गुप्ताचे!

न्यू यॉर्कच्या मॅनहटन न्यायालयाच्या दालनात घडलेल्या एका घटनेचे साद-पडसाद नवी दिल्लीतील सत्तेच्या दालनात प्रदीर्घ काळ ऐकू येत राहतील. न्यू यॉर्कमध्ये राहणाऱ्या ५४ वर्षीय निखिल गुप्ता या भारतीयाने एक खलिस्तानी नेता गुरपतवंतसिंग पन्नू याच्या हत्याकांडाच्या कटात सामील असल्याचा कबुलीजबाब या न्यायालयात दिला. अमेरिकेच्या न्यायप्रणालीत एक फार चांगली पद्धत आहे. एखादा गुन्हा घडल्यानंतर त्याची चौकशी पूर्ण करून न्यायालयात खटला दाखल केला जातो. आरोपीच्या विरोधात असलेला सारा पुरावा आरोपीस दाखविला जातो आणि त्यास गुन्हा कबूल करण्याची संधी दिली जाते. याचे दोन फायदे होतात. आरोपीने गुन्हा कबूल केला तर त्याला कमी शिक्षा दिली जाते. परिणामी त्याला कमी शिक्षा भोगावी लागते आणि दुसरा फायदा म्हणजे खटला चालविण्यासाठी लागणारा वेळ संपुष्टात येतो.

**प्रागमध्ये अटक :** न्यू यॉर्कमध्ये राहणाऱ्या आणि अमेरिकन नागरिक असणारा खलिस्तानी नेता पन्नू याच्या हत्येच्या कटाचे प्रकरण मागील काही काळापासून गाजत होते. त्या प्रकरणात निखिल गुप्ता हा एक आरोपी होता. मागील वर्षी त्याला झेकोस्लाव्हाकियाची राजधानी प्राग येथे अटक करण्यात आली. नंतर त्याचे प्रत्यार्पण अमेरिकेकडे करण्यात आले. प्रारंभी गुप्ताने आपल्यावरील सर्व आरोपांचा इन्कार केला होता.

**तीन आरोप :** पन्नूच्या हत्येचा कट करणे, त्यासाठी मारेकरी निवडण्याचा कट करणे आणि यासाठी पैसा पुरविणे असे तीन आरोप गुप्तावर ठेवण्यात आले होते. अमेरिकन चौकशी अधिकाऱ्यांनी यासदर्भात भक्कम पुरावा गोळा केला होता. तो गुप्ताला दाखविण्यात आल्यानंतर त्याने हे तिन्ही आरोप स्वीकारण्याचा निर्णय घेतला. आरोप नाकारून नंतर खटला चालून तो दोषी ठरला असता तर त्याला ४० वर्षे कारावासाची शिक्षा झाली असती. आता त्याला २१ ते २४ वर्षे शिक्षा होईल. याबाबतचा आदेश २९ मे रोजी दिला जाईल.

**विकास यादव :** निखिल गुप्ताने एक भारतीय अधिकारी विकास यादवच्या सांगण्यावरून हे केले. या भारतीय अधिकाऱ्यास नवी दिल्लीतील एक अधिकारी आदेश-निर्देश देत होता, असे अमेरिकन चौकशी संस्था एफबीआयने म्हटले आहे . भारताने याचा स्वाभाविकच इन्कार केला आहे. या प्रकरणाशी आमचा काहीही संबंध नाही, असे भारताने म्हटले आहे. विकास यादव केंद्रीय राखीव पोलिस दलात होता. नंतर त्याला प्रतिनियुक्तीवर'रॉ'कडे पाठविण्यात आले होते आणि 'रॉ'ने त्याला न्यू यॉर्कमध्ये नियुक्त केले होते. या विकास यादवने पन्नू याच्या हत्येसाठी मारेकरी निवडण्याची जबाबदारी निखिल गुप्ताकडे सोपविली होती आणि निखिल गुप्ताने या हत्येची सुपारी ज्या अमेरिकन नागरिकाकडे सोपविली; तो मारेकरी वगैरे नव्हता, तर अमेरिकन गुप्त अधिकारी होता. निखिल गुप्तासोबत टॅक्सीत झालेले त्याचे संभाषण, पैशाची देवाणघेवाण या सर्व बाबी त्याने कॅमेऱ्याने टिपल्या. नंतर त्या सर्व पुरावा म्हणून न्यायालयात सादर केल्या. त्यातून या साऱ्या प्रकरणाचे बिंग फुटले.

**यादवचा राजीनामा :** पन्नू प्रकरणाचे पडसाद अमेरिकन वृत्तपत्रांमध्ये उमटू लागल्यावर भारत सरकारने विकास यादवला माघारी मायदेशी बोलाविले. अमेरिकन प्रशासनाने विकास यादवच्या प्रत्यार्पणाची मागणी भारत सरकारकडे केली आहे. मात्र आता विकास यादवने केंद्र सरकारच्या नोकरीतून राजीनामा दिला असून तो सध्या काय करीत आहे, याची फारशी माहिती समोर आलेली नाही. मधल्या काळात दिल्लीतील एका न्यायालयाने यादवच्या विरोधात गैरजमानती वॉरंट जारी केले होते. नंतर ते रद्द करण्यात आले. यादव याला अमेरिकेकडे न सोपविण्याची भारत सरकारची भूमिका आहे आणि ती बरोबरही आहे. पण, आता निखिल गुप्ताच्या कबुलीजबाबानंतर अमेरिका यादवचा ताबा मिळविण्यासाठी आपला दबाव वाढवेल, असे मानले जाते.

**गुप्ताची भूमिका :** निखिल गुप्ताने आपण हे सारे काम विकास यादव या भारतीय अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून केले, असे एफबीआयला सांगितले आहे. कॅनडातील खलिस्तानी नेता निज्जर याची हत्या अशाच प्रकारे करण्यात आल्याचे त्याने आपल्या कबुलीजबाबात सांगितले आहे. पन्नूच्या हत्येची सुपारी आपल्याला यादवने दिली होती. मात्र ही हत्या पंतप्रधान मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याच्या दरम्यान करण्यात येऊ नये, असेही आपल्याला सांगण्यात आले होते, असे मॅनहॅटन न्यायालयात गुप्ताने सांगितले आहे. गुप्ताच्या या कबुलीजबाबाचा आधार घेत अमेरिका आता विकास यादवच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न करणार असल्याचे समजते. अर्थातच हे होण्याची शक्यता नाही. कोणत्याही परिस्थितीत यादवला अमेरिकेकडे सोपविले जाणार नाही. कारण त्यातून नव्या समस्या तयार होतील, याची भारत सरकारला जाणीव आहे.

**चूक भोवली :** केंद्रीय राखीव पोलिस दलाचा माजी अधिकारी विकास यादवचा नवखेपणा या प्रकरणात सर्वांना भोवला, असे समोर येत आहे. विकास यादव हा नवखा अधिकारी. त्याने निवडलेला निखिल गुप्ता हाही या क्षेत्रात नवखाच होता. गुप्ता व विकास यादव या दोघांनी न्यू यॉर्कमध्ये पन्नू याच्या हत्येचा कट का व कसा रचला, याची भारत सरकारला कल्पना आलेली नाही. विकास यादव नवी दिल्लीत कोणत्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होता, याचीही भारत सरकारला कल्पना नसल्याचे सांगितले जाते. एफबीआयजवळ मात्र 'ते उच्चपदस्थ नाव' असल्याचे सांगितले जाते. एफबीआयने सध्या तरी ते जाहीर न करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, राष्ट्रपती ट्रम्प ते जाहीर करणारच नाहीत, असे मात्र म्हणता येणार नाही. विकास यादव भारतात परतल्याने तो तर बचावला. पण, या प्रकरणात हकनाक बळी गेला तो मात्र निखिल गुप्ताचा. गुप्ता मागील वर्षभरापासून तुरुंगात आहे आणि आता तर त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली असल्याने त्याला २०-२२ वर्षे अमेरिकन कारागृहात राहावे लागणार आहे. आता हे प्रकरण निखिल गुप्तावरच थांबेल, असे भारत सरकारला वाटत असले, तरी ते होण्याची शक्यता कमी आहे. अमेरिकेने हा सारा विषय अतिशय उच्च स्तरावर भारत सरकारकडे लावून धरला होता, अशी माहिती अमेरिकेतील काही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली होती. अमेरिकेच्या या भूमिकेचा विचार केल्यास, आता गुप्ताचा कबुलीजबाब अमेरिका किती आणि कोणत्या स्तरावर उपस्थित करणार, याकडे भारत सरकारचेही लक्ष लागले आहे.

**मनोबल उंचावले? :** मॅनहटन न्यायालयात निखिल गुप्ता कबुलीजबाब देत असताना, तेथे काही खलिस्तान समर्थक उपस्थित होते. त्यांना एकप्रकारे अभय मिळाले आहे. भारताविरोधात गरळ ओकणाऱ्या एका खलिस्तानी नेत्यासाठी म्हणजे पन्नूसाठी एका भारतीयास म्हणजे निखिल गुप्ताला कारागृहात जावे लागले यापेक्षा या खलिस्तानींसाठी आणखी कोणती चांगली घटना असू शकते?

अमेरिका, कॅनडा, ब्रिटन या तीन देशात तरी शीख लोकसंख्या भरपूर आहे आणि या देशांमध्ये खलिस्तानी चळवळीची पाळेमुळे रुजली गेली आहेत. या तिन्ही देशांची सरकारे आपल्या बाजूने आहेत असा एक संदेश निज्जर व पन्नू प्रकरणात गेला आहे. याने या देशांमध्ये खलिस्तानी चळवळ पुन्हा सुरू होईल काय, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. तसे झाल्यास भारत सरकारसाठी ती एक नवी डोकेदुखी ठरेल. ▮

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# वाहनांची वेगमर्यादा लॉक करा!

वाहन आज मानवाची मूलभूत गरज बनली आहे. पण याच वाहनांमुळे वाढत असलेले अपघातही चिंताजनक ठरले आहेत. १०० पैकी ९९ अपघात मानवी चुकांमुळे घडतात. यात वेगाने वाहन चालविणे हे प्रमुख कारण आहे. एसटी महामंडळाने अपघात घडू नये म्हणून आपल्या सर्वच वाहनांची वेगमर्यादा ताशी ६० ते ८० किलोमीटर यानुसार चक्क लॉक करून ठेवली आहे. परिणामी एसटीचा प्रवास सर्वात सुरक्षित ठरला आहे. एसटी आपल्या वाहनांची वेगमर्यादा लॉक करून ठेवते, त्याच धर्तीवर खाजगी वाहनांना मोकळे रान का? हा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. त्याचा विचार करता प्रत्येक वाहनाची वेगमर्यादाही लॉक करायची वेळ आलेली आहे. लोक शिकलेले असोत किंवा अशिक्षित ते नियम मोडण्यातच धन्यता मानतात. शिवाय कायद्यातील पळवाटा पाहता आरोपी चालकाला फाशी झालेले उदाहरण भारतात तरी उपलब्ध नाही. हे वास्तव पाहता भारत सरकारने स्वतः पुढाकार घेत कारखान्यातून रस्त्यावर येणाऱ्या प्रत्येक वाहनाची वेगमर्यादा लॉक करण्याचे आदेश द्यायला हवेत. समजा एखाद्याला वेगमर्यादा लॉक केलेले वाहन नको असल्यास त्याच्याकडून १० पट कर घेतला जावा. एवढेच नव्हे, तर त्याच्या विम्याची रक्कमही तेवढ्याच पटीने वाढविण्यात यावी. ही मागणी अनेकांना हास्यास्पद वाटेल, पण हीच काळाची गरज आहे. भारतातील लोकांची मानसिकता भीतियुक्त आदर राखणारी आहे. नागपूर जिल्ह्यातील कामठीत नाही का, भारतीय लष्कराच्या परिसरातून जाताना सैनिकांच्या धाकापोटी का असेना तिथे वाहन चालक हळुवारपणे वाहन चालवितात. परिणामी तिथे अपघात घडत नाहीत.



मग इतरत्र हाच नियम लागू केल्यास मनुष्यबळाची गरज वाढेल. तेवढे मनुष्यबळ पुरविणे सरकारला शक्य नाही. अशावेळी वाहनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनाच एसटी महामंडळाच्या धर्तीवर वेगमर्यादा लॉक करण्याचे निर्देश सरकारने द्यायला हवेत. ज्या कंपन्या याला जुमानणार नाहीत, त्यांच्या वाहन विक्रीवर देशात बंदी टाकावी. भारतात २०२५ या वर्षात सुमारे ४ लाख ८० हजार अपघात झाले आहेत. याचा अर्थ दररोज १३१५ अपघात घडले. महाराष्ट्रात २०२५ मध्ये ३६ हजारांपेक्षा जास्त अपघात झाले. त्यात १५,५४९ लोकांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला आहे. देशातील बहुतांश गावात वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणण्यासाठी गतिरोधक लावले जातात. पण दोन गतिरोधकांच्या मध्ये जो वेग वाढतो तोही जीवघेणा ठरत असतो. या स्थितीचा अभ्यास करता वाहनांची वेगमर्यादा लॉक झाल्यास चालकाने कितीही प्रयत्न केला तरी ती गाडी वायुवेगाने धावणारच नाही. तसे पाहता वायुवेगाने वाहन चालवून लोकांना चंद्रावर जायचे नसते. त्यांना तर रस्त्यावर थरार लोकांना दाखवायचा असतो. तो थरार पूर्ण होतो, पण निष्पाप पादचारी मरतात, त्याचे काय? मेलेला माणूस केवळ एक असला, तरी त्याच्यावर अवलंबून असलेले संपूर्ण कुटुंब उघड्यावर येते. एका चालकाच्या चुकीने १० ते १२ लोकांचे आयुष्य बरबाद होते. शिवाय आरोपी चालकाला मोठी शिक्षाही दिली जात नाही. तो तर 'तांत्रिक चूक होती' असे सांगून पुन्हा दुसरा अपघात करायला मोकळा होतो. तिकडे ज्याचा जीव गेला त्याला कधीच न्याय मिळत नाही. ही कटू वास्तविकता पाहता दुचाकी, चार चाकी आणि तीन चाकी सर्वच वाहनांची वेगमर्यादा लॉक करण्याची वेळ आलेली आहे. रस्ता ही सार्वजनिक मालमत्ता आहे. ती खाजगी मालमत्ता नाही. यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्यांसाठी कडक नियमावली यायलाच हवी. वेगमर्यादा लॉक झाल्यास वायुवेगाने होणारे अपघात थांबतील. वाहन हे सुरक्षित प्रवासाकरिता आहे. ते रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांना चिरडून स्मशानभूमीत नेणारे नाही; प्रत्यक्षात आज वाहन हे निष्पाप लोकांना स्मशानभूमीत पोहोचविणारे यमदूत ठरले आहेत. अशा यमदूतरूपी वाहन चालविणाऱ्या चालकांना धाकात ठेवायचे झाल्यास वेगमर्यादेला लॉक हाच सर्वोत्तम उपाय ठरू शकतो. याला काही लोक नक्कीच विरोध करतील. पण ज्यांच्या घरचा कर्ता पुरुष रस्ता अपघातात देवाघरी गेला, ते मात्र याला नक्कीच समर्थन देतील. शेवटी, रस्ता हा सार्वजनिक असल्याने त्यावरून चालणारी प्रत्येक व्यक्ती सुखरूप घरी जायलाच हवी. एसटी महामंडळाने वेगमर्यादा लॉक केल्याने त्यांचे काहीच बिघडलेले नाही; उलट त्यांचा प्रवास सुरक्षित झाला आहे. शिवाय बहुमूल्य इंधनाची नासाडीही थांबली आहे. मग आपलाही प्रवास सुरक्षित व्हावा, असे ज्यांना वाटत असेल त्यांनी नक्कीच वेगमर्यादेला लॉक करण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेवटी 'वेगाला आवरा जिवाला सावरा' हाच फॉर्म्यूला आपल्याला पृथ्वीवर जिवंतपणीच स्वर्गसुख मिळवून देणारा ठरू शकतो. ▮

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# गोपाला...गोपाला...देवकीनंदन गोपाला

विदर्भ ही संतांची भूमी आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यात शेणगाव (शेंडगाव) या गावी २३ फेब्रुवारी १८७६ रोजी संत गाडगे महाराजांचा जन्म झाला. 'जाती न पूछिये संत की, पूछ लीजिए ज्ञान.' असे जे म्हटलेले आहे ते बरोबरच आहे. नदीचे मूळ आणि ऋषीचे कुळ विचारू नये, तेही योग्यच आहे. पूर्वीचा समाज बहुतांश अशिक्षित होता. संत कुठल्याही जातीत जन्मलेले असले, तरी त्यांनी जातिपातीचा विचार न करता योग्य सन्मान दिलेला होता. संत गाडगे महाराज यांचे नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचे वडील लहानपणीच दारूच्या व्यसनामुळे आजारी होऊन वारले. भविष्यात महाराजांनी आपल्या कीर्तनातून दारूच्या व्यसनाविरोधात ते विचार मांडलेले आहेत. वडिलांच्या निधनानंतर त्यांची आई त्यांना घेऊन त्यांच्या मामाच्या घरी दापुरे येथे आली. मामाच्या घरी राहून काबाडकष्ट करण्याची सवय डेबूजी यांना लागलेली होती. काबाडकष्ट करावे, शेतात राबावे आणि मिळेल तो भाकर-तुकडा खावा. असे त्यांचे बालपण आणि तरुणपण गेले. यथावकाश त्यांचे लग्न झाले. मुले झाली. हे सर्व होत असताना त्यांनी समाजामध्ये चाललेल्या रूढी-कुप्रथा बघितलेल्या होत्या. व्यसनाधीनता बघितली होती. सावकाराच्या पाशामध्ये भरडले जाणारा समाजही बघितला होता.

डेबूजींना लहानपणापासूनच भजन म्हणण्याची आवड होती. मंदिरात होणाऱ्या भजन-कीर्तनात ते सहभागी व्हायचे. पहाटेच उठावे, नदीवर स्नान करावे, देवाचे दर्शन घ्यावे आणि मगच आपल्या शेतीवाडीच्या कामांना हात लावावा, असे त्यांचा नित्यक्रम होता. पहाटेच्या वेळी जर अंधाऱ्या रस्त्यांवरून कोणी भजन म्हणत जात असेल तर लोक म्हणायचे हा नक्कीच डेबूजी असणार.

एकदा ऋणमोचन या तीर्थक्षेत्री नेहमीप्रमाणे ते पूर्णा नदीमध्ये आंघोळीला गेले असता त्यांच्या कमरेला बांधलेला एक रुपया नदीच्या पात्रात पडला. खूप शोधूनही तो मिळाला नाही. त्याच वेळेला डेबूजींच्या मनामध्ये विचार आला की असे कितीतरी जीवन या कालप्रवाहामध्ये सामावून गेले असतील. ते भानावर आले आणि यातूनच त्यांच्या मनामध्ये पुढील कार्याची रूपरेषा ठरत गेली. पत्नी, आई, मुली यांना सोडून ते घराबाहेर पडले. ते गावोगावी फिरू लागले. शेतकऱ्यांच्या शेतात जावे, त्याला म्हणावे भाकरी देतो का? त्याने म्हटले की फुकटचे कशाला खातो. काही काम का करत नाही? तर, डेबूजींनी त्याला म्हणावे सांग काय करू आणि डेबूजी लगेच त्याच्या शेतामध्ये काम करू लागत. तो भाकरी घेऊन येतपर्यंत डेबूजी तिथून निघून जात. कोणाच्या घरी जात, भाकरी मागत. त्याने काही काम का नाही करत म्हटले तर म्हणायचे की कुऱ्हाड द्या, तुमची लाकडं फोडून देतो. कुंभाराच्या घरी गेले तर त्याची माती पायाने तुडवून देत. कोणाचे अंगण झाडून देत. मिळेल तो भाकर-तुकडा खात होते. इकडे मात्र सर्व लोक त्यांना शोधत होते.



आणि एक दिवस पुन्हा ऋणमोचनची यात्रा आली. त्यांच्या समाजातील लोकांना डेबूजी दिसले. त्यांनी त्यांच्या घरी, त्यांच्या कुटुंबीयांना सांगितले. पत्नी, आई, मुले सर्व लोक ऋणमोचनला आले. पाहतात तर काय, डेबूजी यात्रेचा परिसर हातात खराटा घेऊन सकाळपासून झाडत आहेत. ऋणमोचनच्या नदीमध्ये उतरणारे लोक सगळीकडे चिखल झाल्यामुळे घसरून पडायचे. डेबूजीला वाटले की, तिथे घाट बांधले पाहिजे. म्हणून दरवर्षी ते कुदळ घेऊन पायऱ्या बनवायचे. पण पुढील पावसाळ्यात पुन्हा पूर्णा माय त्या पायऱ्या वाहून घेऊन जायची. पुढे याच ठिकाणी तिडके सावकाराच्या मदतीने त्यांनी पक्के घाट बांधले. डेबूजी फार शिकलेले नव्हते तरीही त्यांच्या उत्तरांपुढे लोक हतबल होऊन जायचे. त्यांच्या मुलीच्या जन्माच्या वेळेला त्यावेळच्या समाजाच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी बकरा कापला नाही. लोकांना दारू पाजली नाही तर उलट गोडधोडाचे जेवण दिले. त्यांच्या समाजाचे लोक नाराज झाले होते. डेबूजी म्हणायचे मला मुलगी झाली. आनंद झाला. अशा आनंदाच्या प्रसंगी बकऱ्याचा बळी देणं मला पटत नाही. लोक म्हणायचे, बरं दारू का पाजत नाही? म्हणायचे, दारू पिणं वाईटच आहे ना. लोक त्यांच्या प्रश्नांवर निरुत्तर व्हायचे. ऋणमोचनची यात्रा महिनाभर चालत होती. डेबूजी महिनाभर तो परिसर झाडत राहिले. काही चांगल्या लोकांनी त्यांना विचारले की, आम्ही तुमच्यासोबत मदत केली तर चालेल का? डेबूजी म्हणाले, हे समाजाचं काम आहे. सगळ्यांनीच केलं पाहिजे आणि मग त्यांच्यासोबत आणखी लोक यात्रेतला परिसर झाडू लागले. हळूहळू संख्या वाढू लागली. आता डेबूजी यात्रेचा परिसर झाडणे, बैलबंडी कुठे लावायची, स्वयंपाक कुठे करायचा, जेवणाच्या पंक्ती कशा मांडायच्या हे सांगू लागले...

डेबूजींचा वेश म्हणजे घरातून निघताना घातलेलं धोतर. पुढे तेही धोतर फाटले म्हणून त्याची त्यांनी लुंगी केली. डोक्याला कपडा बांधलेला. ठिकठिकाणी चिंध्या बांधलेल्या, हातामध्ये गाडगे आणि म्हणूनच लोक त्यांना म्हणू लागले 'गाडगे महाराज!'

प्रत्येक यात्रेच्या ठिकाणी ते जायचे. स्वच्छता करायचे. ज्याने ऐकलं त्याला सांगायचे. नाही ऐकलं तर सोडून द्यायचे. एखाद्या गावी जावे. हनुमंताचं मंदिर दिसले तर तो परिसर झाडावा. कोणी विचारले की का बरं झाडता? तर त्यांना सांगावे की संध्याकाळी कीर्तन आहे. संध्याकाळी लोक जमल्यावर त्यांना विचारायचे की, कीर्तनकार कुठे आहे? तर ते म्हणायचे ते नाही येणार. त्यांनी मलाच पाठविले आहे. त्यावर लोक हसायचे व आपल्या घरी जाऊ लागायचे. त्याच वेळेला त्यांच्या कानावर गोपाला...गोपाला...देवकीनंदन गोपाला... असा सुरेल आवाज पडायचा. लोक जमू लागले व त्यांना गाडगे महाराज ही मान्यता मिळू लागली.


मोठमोठ्या तीर्थक्षेत्रांमध्ये लाखोच्या संख्येने लोक जातात. परंतु त्यांच्या निवासाची व्यवस्था नाही. नदीवर स्नान करण्याची व्यवस्था नाही. हे सर्व बघून त्यांनी पंढरपूरला चोखामेळा धर्मशाळा, परीट समाज धर्मशाळा, मराठा समाज धर्मशाळा बांधल्या. नाशिक, देहू, आळंदी येथेही धर्मशाळा बांधल्या. मूर्तिजापूरला गोरक्षण सुरू केले. ऋणमोचनला त्यांनी लक्ष्मीनारायणाचं मंदिर बांधले. कधी कधी त्यांची पत्नी, मुलगी, मुलगा त्यांना येऊन भेटायचे. बाबा त्यांना म्हणायचे, तुम्हीसुद्धा इतर लोकांसारखे काम करा. बाबांची प्रसिद्धी झाल्यावर अनेक ठिकाणांवरून त्यांच्याकडे पैशाचा ओघ सुरू झाला; पण बाबा कोणाच्याही पैशाला हात लावत नव्हते. समाजामध्ये असलेले अज्ञान, अडाणीपणावर त्यांनी जनजागृती केली. देव देवळात आहे आणि तो गरीब, निराधार, लुळे-पांगळ्यांमध्ये आहे. त्यांची पण सेवा केली पाहिजे, हा संदेश त्यांनी दिला. व्यसनाधीनतेवर त्यांनी खूप जनजागृती केली. व्यसनांमुळे कुटुंबाची राखरांगोळी होते, हे ते लोकांना पटवून द्यायचे. गावातल्या मंदिरात काळोख आहे. सर्वच विचार करतात की, कोणीतरी दिवा लावला पाहिजे. पण बाबा म्हणायचे, हा दिवा मी का लावू नये? समाजासाठी आयुष्यभर काम करणाऱ्या गाडगे महाराजांची आज जयंती आहे. त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### पानगळ : सृजनाचे वळण

निसर्गा, तुझ्यातल्या आगळ्या, सुंदर भावपणाचे सदैवच कौतुक वाटतं. तू या आधी तर चोख तुझा कार्यभार फार व्यवस्थित पाळत आलास आणि आताही काही अंशी पाळत येतोस. शिशिर ऋतूची चाहूल लागली की, किंचित वातावरणातली बदललेली कूस हवेतल्या बोचऱ्या स्पर्श भावनेतून जाणीवपूर्वक लक्षात येणारी असते. पहाटे आणि रात्रीची थंड छाया आणि दुपारी सूर्य कथा विस्तार तापवून स्वतःची छाप सोडत असताना वातावरणीय तप्त भाव सहजच खुणावत जातो, त्या तप्त होणाऱ्या मातीवर. मग हळूहळू कालांतराने, झाडांच्या फांद्यांवर असलेला पिकला भार कमी करून वाऱ्याच्या सोबतीने कोपरा शोधून कुठेतरी निपचित पहुडलेलं समाधान वाचायला मिळत. त्या पानांच्या भावनेत फार मोठं समाधान असलेलं भासतं जणू. कुठेतरी जरासे हळवे होऊन मनाला त्याची कथित भावना जाणण्याची आस लागत येते आणि मग, कधीकाळी कोवळी पालवी फुटून तिच्यात गर्द रंगाचे डोहाळे सामावले असतील, तिच्यात आनंद कथेचा सुंदर आशय सावली पुरवत लिहिलेला असेल. कधी कोणत्या



कळीवरचा भार उचलला असेल, कधी त्या फुलांचा गंध वेचला असेल, फुलून आलेल्या त्या फुलांची कथा मातीत मिसळून जाण्याच्या भावकलेतला निरोप पाहिलेला असेल, कधी वादळाने हेलावून गेलेल्या तुझ्या फांद्यावरची अनंत पाने तुझ्या सहवासातली भेदारून जाऊन शांत झालेल्या वादळावर समाधान आणि सुख शोधत असेल, असं बरंच काही चांगलं आणि वाईट अनुभूतीतून तुझी कथा आठवून आज कोपऱ्यात तुझी समाधानी पाऊलं त्या वाऱ्यासह हलकी होऊन तुझ्याच कथेतले तुझे निरूपण गात असेल, या आशेच्या विचार कथेतून तुझ्यात झिरपलेलं सुख आज त्या फांद्यांच्या तसेच मातीत रुजलेल्या घट्ट मुळाशी पुन्हा नवे आशय, पुन्हा नवी आशा अंकुरित होण्याकरिता हा पानगळीचा निसर्ग नियम फार काही शिकवून जातो. काही क्षण जरासे हळवे करून जातात, कधी? तर वाऱ्यासह उडून गेलेल्या अनुभवी पानांची ऋतुचक्रानुसार जेव्हा पानगळ लिहिली जाते तेव्हा त्या फांद्या फार भकास वाटत असतात. उदास करीत असतात. पुन्हा नव्याने नवी रुजवात होऊन नवी सुरुवात असेल, अशाच आशावादातली ही पानगळ, समाधानातून सृजनाकडे कललेला हा प्रवास सेतू...

**श्रद्धा राऊत बुरले**/नागपूर

## वाचक पत्रे

### रोजगार निर्मितीवर भर द्या

देशातील वाढती बेरोजगारी ही केवळ आकड्यांपुरती मर्यादित समस्या राहिलेली नाही; ती आज प्रत्येक कुटुंबाच्या चिंतेचा विषय बनली आहे. उच्च शिक्षण घेतलेले तरुण नोकरीच्या शोधात भटकताना दिसतात, तर ग्रामीण भागातील युवक शेतीवरील अवलंबित्व कमी झाल्याने पर्यायी रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. ही स्थिती बदलण्यासाठी रोजगार निर्मितीवर ठोस आणि दीर्घकालीन भर देणे अत्यावश्यक आहे. भारतासारख्या तरुण देशात कामगार शक्ती ही सर्वात मोठी संपत्ती आहे. मात्र, योग्य संधींचा अभाव असल्याने ही शक्ती निष्क्रिय राहत आहे. परिणामी आर्थिक विकासाचा वेग मंदावतो आणि सामाजिक असंतोष वाढतो. बेरोजगारीमुळे निर्माण होणारे नैराश्य, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि मानसिक ताण ही समाजासाठी धोकादायक लक्षणे ठरत आहेत. रोजगार निर्मितीसाठी शासनाने लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, स्टार्टअप उपक्रमांना आर्थिक सहाय्य देणे आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढविणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारल्यास स्थलांतर रोखता येईल. कौशल्य विकास कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण दिल्यास तरुणांना तत्काळ रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

ग्रामीण भागातील रोजगार वाढविण्यासाठी रोजगार हमी योजना सारख्या योजनांची पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक आहे. या योजनांमुळे केवळ रोजगारच नाही तर गावांच्या पायाभूत सुविधांचाही विकास होऊ शकतो. याशिवाय खाजगी क्षेत्रानेही सामाजिक जबाबदारी स्वीकारून स्थानिक युवकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. शैक्षणिक संस्थांनी अभ्यासक्रम अधिक व्यावहारिक व उद्योगाभिमुख करणे ही काळाची गरज आहे. बेरोजगारीवर मात करणे म्हणजे देशाच्या प्रगतीचा मार्ग सुकर करणे होय. रोजगार म्हणजे केवळ उत्पन्नाचा स्रोत नसून तो आत्मसन्मान आणि स्थैर्याचा आधार आहे. त्यामुळे शासन, उद्योग आणि समाज यांनी एकत्रितपणे रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य दिल्यासच भारताची तरुण शक्ती विकासाच्या प्रवाहात प्रभावीपणे सहभागी होईल. ▮

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### सोलापूरच्या पंचाक्षरी लोणारला उपविजेतेपद



**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी -** वाशी येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय महापौर श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत कोल्हापूरच्या अजिंक्य रेडेकर याने बाजी मारत विजेतेपद पटकावले. या अत्यंत अटीतटीच्या स्पर्धेत सोलापूरचा पंचाक्षरी लोणार उपविजेता ठरला. या स्पर्धेचे आयोजन नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे वाशी येथे करण्यात आले होते. राज्यभरातून आलेल्या सुमारे १५७ स्पर्धकांनी यात आपला सहभाग नोंदवला. विशेषतः विजेतेपदासाठी सोलापूर आणि कोल्हापूरच्या खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली.

**लोणारची सुवर्ण कामगिरी -** सोलापूरच्या पंचाक्षरी लोणार याने ७५ किलो वजनी गटात सुवर्णपदक प्राप्त केले आणि त्यानंतर झालेल्या विजेत्यांच्या विजेते फेरीत उपविजेतेपदावर मोहोर उमटवली. लोणार हा सोलापूरच्या इलेजियम क्लबचा खेळाडू आहे. पंचाक्षरी लोणारचे जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे अध्यक्ष संतोष पवार आणि सरचिटणीस विशाल गायकवाड यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.



### छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजची कराटे स्पर्धेत ७ पदकांची कमाई

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी पाच सुवर्ण व दोन रौप्य अशी ७ पदकांची कमाई केली. माऊली महाविद्यालय वडाळा येथे झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या ईश्वर चव्हाण, तौफिक नाईकवाडी, जुनेद खान, निलेश गडकरी आणि दिव्या पवार यांनी सुवर्ण तर आर्षद सय्यद, साक्षी आहेरवाडी यांनी रौप्य पदक प्राप्त केले. त्यांना प्रा.संतोष गवळी, प्रा.सचिन गायकवाड, प्रा.अमोल वाघमोडे, संतोष क्षीरसागर, मारुती घोडके, नितीन गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे, जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे आणि प्राचार्य डॉ नितीन मोटे यांनी अभिनंदन केले.



### मुस्लिम बांधवाकडून पवार, बोराडे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-** पंचायत समिती, जिल्हा परिषद सार्वजनिक निवडणूक २०२६ नुकत्याच पार पडल्या असून, यामध्ये इंद्रजीत पवार बीबीदारफळ गटातून व मार्डी गणातून तेजस्विनी बोराडे मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल मार्डी, कारंबा, एकरूख, हिप्परगा, अकोलेकाटी व बीबीदारफळ या गावातील प्रमुख मुस्लिम बांधवांनी त्यांचा सत्कार केला. भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, इंद्रजीत पवार यांचे वरील गावातील मुस्लिम बांधवांबरोबर अतिशय सलोख्याचे संबंध आहेत. त्यांच्या नेहमीच सुखदुःखात ते सहभागी होत असतात. यामुळे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत मार्डी, कारंबा या गावामध्ये मुस्लिम बांधवांचे पवार बांधवांना सहकार्य मिळाले होते. पवार बंधू जातीपातीचे राजकारण न करता सर्वधर्मसमभाव म्हणून समाजकारण, राजकारण करतात म्हणून त्यांच्या पाठीमागे या मतदारसंघातील मुस्लिम बांधव उभे राहिल्याच्या भावना यावेळी उपस्थित मुस्लिम बांधवांनी व्यक्त केल्या. यावेळी महिबूब शेख, गौसपाक शेख, शुकूर शेख, आरिफ शेख, अशपाक शेख, रफिक मुजावर आदी मुस्लिम बांधव व महिला देखील उपस्थित होत्या.

# सोलापुरात आजपासून राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा


## १२ वर्षांखालील गटातील ६४ खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी -** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली १२ वर्षाखालील मुले व मुलींच्या (सुपर सिरीझ) स्पर्धेचे आयोजन येथे केले आहे.

ही स्पर्धा २३ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथील एम.एस.एल.टी.ए टेनिस सेंटरच्या व इलिझियम क्लबच्या मैदानावर सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत खेळविल्या जाणार आहेत. या स्पर्धेत देशभरतातून ६४ खेळाडू सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेचे आयोजन सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एस.डी.एल.टी.ए) केले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन स्पोर्ट्स एरोबिक्सचे आंतरराष्ट्रीय जज आणि कोच डॉ. मोहिनी मोरे ताकटे यांच्या हस्ते सोमवार २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता करण्यात येईल. या स्पर्धेसाठी पर्यवेक्षक म्हणून पुण्याच्या तेजल कुलकर्णी तर स्पर्धा संचालक म्हणून एम.एस. एल.टी.ए चे संयुक्त मानद सचिव राजीव देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## राज्यस्तरीय तेंग सु डो स्पर्धेसाठी तेजश्री राजगिरेची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २२ फेब्रुवारी-** माढा येथे झालेल्या शालेय विभाग तेंग सू डो स्पर्धेमध्ये मि टकलवाडी (ता. माढा) येथील तेजश्री तानाजी राजगिरे हिने सुवर्णपदक पटकाविले. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच तेजश्री राजगिरे, शौर्य वनगे, कोमल राऊत, स्वरांजली जाधव, प्रिती राठोड, मेधा अदाटे, सौम्या ओस्तवाल, तनिष्का पवार यांनी द्वितीय तर सृष्टी थोरे, शिवप्रसाद तगारे, ओंकार सरगर, धनबहादूर बी.के, आरुष नवले तृतीय क्रमांक मिळविला.

वेदांत इंगवले, तेजस्विनी ढोक साहिल हरले यांनी सहभाग नोंदविला. या सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षक वैशाली बांगर यांचे मार्गदर्शन लाभले.



## मानांकित खेळाडूंचे आकर्षक विजय

### ९ व १३ वर्षाखालील जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-** माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ पुणे संचलित देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर पी. एम. उषा योजना अंतर्गत आयोजित तसेच सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने केलेल्या ९ व १३ वर्षाखालील जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेत अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय खेळाडू सिद्धांत कोठारी, नियान कंदीकतला, श्रेयस कुदळे, ओम राऊत, देवराज कान्हेरे, हर्ष जाधव, वेदांत मुसळे, प्रतीक हलमल्ली, सार्थक राऊत, श्लोक चौधरी, नैतिक होटकर, सान्वी गोरे, पृथा ठोंबरे, सिद्धी देशमुख यांनी आकर्षक विजय मिळवले.

डी. एच. बी. सोनी कॉलेज येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत सोलापुर शहरासह करमाळा, पंढरपुर, मंगळवेढा, बार्शी, अक्कलकोट, माढा आदी तालुक्यातील १४४ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. स्पर्धेतील प्रथम येणाऱ्या दोन मुले व मुलींची निवड राज्यस्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. सात वर्षीय उदयोन्मुख खेळाडू देखील उत्कृष्ट खेळ करत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. स्पर्धा प्रथमच वातानुकल हॉलमध्ये संपन्न होत आहेत. तसेच यावेळी संस्थेच्या वतीने सर्व खेळाडूंना अल्पोपहार देण्यात आला.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन दीप प्रज्वलन करून तसेच संस्थेचे चेअरमन व कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुसूदन करवा व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू सोनिया देशमुख यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली. यावेळी संस्थेच्या संचालिका डॉ. वासंती अय्यर, प्राचार्या डॉ. आशा रोकडे, संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, मनोज बाळगे, राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रीती कुलकर्णी व आभार प्रा. सुवर्णा कांबळे यांनी केले. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणुन वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा-राठी, प्रशांत पिसे, विजय पंगुडवाले, यश इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## रुद्रशक्ती गुरुकुलचे कलर बेल्ट परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-** योंगमुडो असोसिएशन ऑफ सोलापूर यांच्या मार्फत कलर बेल्ट परीक्षा राजीव गांधी इनडोर स्टेडियम येथे घेण्यात आले. या त रुद्रशक्ती गुरुकुलच्या खेळाडूंनी कलर बेल्ट परीक्षेत यश मिळविले.

त्यांना योंगमुडो बेल्ट मुख्य परीक्षक नागेश शेट्टीकर व परीक्षक सुनिल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना योंगमुडो इंडियाचे अध्यक्ष मास्टर रोहित नारकर व महाराष्ट्राचे सचिव नागेश शेट्टीकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी, मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांनी अभिनंदन केले.



### विद्यापीठ कराटे स्पर्धेसाठी सांगोल्याच्या ठोकळे व कोकरे यांची निवड

**सांगोला, दि.२२ फेब्रुवारी -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन कराटे स्पर्धेतून सांगोला महाविद्यालयाच्या भगवती ठोकळे व स्व.गणपतराव देशमुख महाविद्यालयाच्या आशिश कोकरे यांची विद्यापीठ संघात निवड झाली. वडाळा येथे झालेल्या स्पर्धेमध्ये इंडियन गेनशिनरीयु कराटे फेडरेशनच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांची भोपाळ येथे होणाऱ्या विद्यापीठ कराटे स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना सोलापूर शहर प्रमुख सुनील वाघमारे व श्वेता वाघमारे, ग्रामीण प्रमुख श्रावणी वाघमारे व निजेंद्र चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे असोसिएशनचे अध्यक्ष गौतम वाघमारे यांनी अभिनंदन केले.

## दिगंबर जैन गुरुकुल शाळेस 'ए प्लस' मूल्यांकन प्राप्त

### सोलापुरातील एकमेव शाळा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-** महाराष्ट्रात 'शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा' एसक्यूएएफ-स्कूल क्वालिटी असेसमेंट अँड ॲश्युरन्स फ्रेमवर्क अंतर्गत 'ए+' श्रेणी प्राप्त करणाऱ्या निवडक शाळांमध्ये शहरातून एकमेव आणि सरस मानकरी म्हणून श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांचा समावेश झाला आहे.

राज्यातील हजारो शाळांमधून गुणवत्ता, शैक्षणिक उत्कृष्टता आणि व्यवस्थापनातील आदर्श पद्धती यांमुळे ही संस्था ठळकपणे पुढे आली आहे. स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षात लाभलेले हे यश श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळेसाठी कृतज्ञतेचे आणि शहरासाठी गौरवाचे पर्व ठरले आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या माध्यमातून प्रत्येक शाळेचे मूल्यांकन सहा क्षेत्रे आणि १२८ मानकांच्या आधारे करण्यात आले होते. या सर्व मानकांमध्ये उच्चस्तर प्राप्त झाल्यानंतरच 'ए+' श्रेणी प्राप्त झाली. शैक्षणिक गुणवत्ता, व्यवस्थापन कौशल्य, पायाभूत सुविधा, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, तंत्रज्ञानाचा वापर आणि सर्वांगीण विकास या निकषांवर आधारित सखोल मूल्यमापनानंतरच ही श्रेणी बहाल करण्यात आली.

सन २०२४-२५ या वर्षात राज्यातील लाखापेक्षा अधिक शाळांनी स्वयंमूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली. त्यापैकी गुणवत्तेच्या कठोर निकषांवर आधारित १०,७१२ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड झाली. या अत्यंत काटेकोर प्रक्रियेनंतर राज्यातील केवळ ४२९ शाळांना 'ए+' श्रेणी प्राप्त झाली. वालचंद शिक्षण समूहाचे अध्यक्ष शेठ अरविंद दोशी, मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पृथ्वीराज गांधी, वैभव गांधी, पराग शहा तसेच समस्त विश्वस्तांनी संस्थेला सक्षम नेतृत्व दिले. गुरुकुल परिवारासाठी कृतज्ञतेचे दुर्मीळ पर्व ठरले आहे. हा महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे , बालक मंदिर विभागाच्या प्रमुख विभावरी रणदिवे आणि समस्त गुरुकुल परिवाराच्या एकत्रित प्रयत्नांतून साकारलेली ही कामगिरी, सोलापूर शहराच्या शैक्षणिक अभिमानात भर घालणारी आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी दिशा देणारी ठरत आहे.

## डेक्स्टर इनोफेस्ट स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाचे वर्चस्व






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलाच्यावतीने डेक्स्टर इनोफेस्ट स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वर्चस्व प्राप्त केले.

पारितोषिक वितरण उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, प्रकुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या विशेष उपस्थितीत झाले. या स्पर्धेचे उद्घाटन संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेन्ते यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील संगणकशास्त्र विषयातील २४६ पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी प्रोग्रामिंग, पेपर प्रेझेंटेशन व पोस्टर प्रेझेंटेशन साठी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेसाठी डॉ. प्रीती देशमुख, कांचन खेडीकर, निखिल गज्जम, विनय शीरश्याद, सुशांत शेलार, उषा डोसमिसे व शरद अवताडे यांनी परीक्षणाचे काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजना गवळी यांनी केले. डॉ. अशोक शिंदे यांनी आभार मानले.

**स्पर्धेचा निकाल (प्रथम तीन व उत्तेजणार्थ)**

**प्रोग्रामिंग स्पर्धा: पदवी :** दुड्डम, ऋचा साळुंके, समीर शेख (संगमेश्वर), मेराज आत्तार (ए. आर. बुर्ला). **पदव्युत्तर :** ज्ञानेश्वर पवार, शिवानी परीट ( सोलापूर विद्यापीठ), अंजली उदबळे (एसव्हीआयआयटी), प्रणाली तटाले ( सोलापूर विद्यापीठ).

**पेपर सादरीकरण : पदवी :** आरती मगर (एसआयआयटी, पानीव), आर्या पॉल, आदित्य दानी (संगमेश्वर), साक्षी चिल्लाळ (मंगळवेढेकर), प्रणाली मसाळ, अदिती व्यवहारे (सोलापूर विद्यापीठ). **पदव्युत्तर :** निकिता पिसे, अमिषा परदेशी, अल्फीया मणियार, सानिया मुजावर (संगमेश्वर), गजानन पाटील (सोलापूर विद्यापीठ), मुग्धाली बाबरे, वैष्णवी उडचान ( सोलापूर विद्यापीठ).

**पोस्टर प्रेझेंटेशन : पदवी :** आर्यमबिया कोंडबाट्टींनी (दयानंद वेलणकर), शिवप्रसाद डोमाल, अक्षय बोडगल (एच.एन.) प्रगती शिरसट, अमित सावंत ( सोलापूर विद्यापीठ), सायली अडसर (एसआयआयटी, पानीव).

### मुंबईत आज अजितदादांची 'श्रद्धांजली सभा'

**मुंबई, दि. २२ फेब्रुवारी-** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष, माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने राज्य शोकसागरात बुडाले आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा उजाळा देण्यासाठी मुंबईत सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता वरळी येथील एनएससीआयएम डोम, लोटस कॉलनी येथे विशेष श्रद्धांजली सभेचे आयोजन केले आहे.

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ६०/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. **नागेश ज्ञानेश्वर गायकवाड** - **अर्जदार**
रा. बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील)
विरुध्द
२. **जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा.प. लक्ष्याचीवाडी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आजी भिवराबाई कोंडिबा गायकवाड, रा. बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे लक्ष्याचीवाडी, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १९ ऑक्टोबर २००० रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आजी भिवराबाई कोंडिबा गायकवाड यांचा दिनांक १९ ऑक्टोबर २००० रोजी मौजे लक्ष्याचीवाडी, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

जा.क्र.एम/कावि/2/ 174 /26 दिनांक 23/02/2026

**मैंदर्गी नगरपरिषद , मैंदर्गी जि.सोलापूर**
**बांधकाम विभाग**
**जाहिर निविदा सुचना**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान ( जिल्हास्तर ) योजना सन 2025-26 अंतर्गत बांधकाम विभागाकडील खालील कामे करावयाचे आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मण बमनळ्ळी घर ते नाला पर्यंत दोन्ही बाजुस गटार व रस्ता करणे | 9,84,071/- | 1000/- | 2000/- |

सदरील कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत व अर्हताप्राप्त अनुभवी मक्तेदार , ठेकेदार , पुरवठादार , संस्थेकडुन निविदा फॉर्म मध्ये नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन दिनांक 23/02/2026 ते दिनांक 02/03/2026 रोजी दुपारी 04.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत द्विलिफाफा पद्धतीने निविदा मागवित आहे. कामाची निविदा फॉर्म , अटी , शर्ती व अधिक माहिती मैंदर्गी नगरपरिषद बांधकाम विभाग येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

सही/-
(अर्जुन सुरवसे)
मुख्याधिकारी
मैंदर्गी नगरपरिषद,मैंदर्गी

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**प्रस्तावित योजनांची अधिसूचना**

विद्युत कायदा २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/प्र.क्र. ३१२/उर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (शासकीय राजपत्र पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

**योजनेचे नाव :** सोलापूर जिल्ह्यातील करजगी ता. अक्कलकोट येथे मे. इन्फ्राव्होल्ट प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांच्या ४५ मे.वॅ. सौर ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत.

**वाहिनीचे नाव :** १३२ के.व्ही. करजगी–मंद्रुप वाहिनीवर लिलो करून दुहेरी परिपथ वाहिनी दुहेरी परिपथ मनोऱ्यावर १३२ के.व्ही. सौर ऊर्जा प्रकल्प उपकेंद्रापर्यंत उभारणे – १.८ कि.मी. (OPGW सह.)

सदर वाहिनीचा मार्ग खालील महसूली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे.

| जिल्हा | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| सोलापूर | अक्कलकोट | करजगी |

या योजनेचा अंदाजे खर्च रु. ११७४.०९ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी–१९, बांद्रा–कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई– ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

**मुंबई**
**दिनांक : १०.०२.२०२६**

**संचालक (प्रकल्प) (प्रभारी)**
**महापारेषण, मुंबई**

www.tarunbharat.net
तरुण भारत
६
सोलापूर, सोमवार, २३ फेब्रुवारी २०२६





# टी-२० विश्वचषकाचा थरार

## महत्त्वाचे

### कार्लोस अल्काराझ कतार ओपन विजेता



**कतार** : जागतिक स्तरावरील अव्वल क्रमांकाचा टेनिसपटू स्पेनच्या कार्लोस अल्काराझने फ्रान्सच्या आर्थर फिल्सचा ६-२, ६-१ असा पराभव केला आणि कतार ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या विजयाबरोबरच अल्काराझने आपल्या वर्षाची परिपूर्ण सुरुवात केली. ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये कारकिर्दीतील ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण केल्यानंतर अल्काराझने ही दुसरी ट्रॉफी मिळविली. अल्काराझने ५० मिनिटांच्या सामन्यात कधीही ब्रेक पॉइंटचा सामना न करता आपल्या पहिल्या सर्व्हिस पॉइंट्सपैकी ८९ टक्के गुण मिळविले. मी या वर्षी विजेतेपदासाठीच आलो होतो, असे गत वर्षी दोहा उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झालेला अल्काराझ म्हणाला. या विजयासह, अल्काराझने वर्षासाठी १२-० अशी सुधारणा केली आणि आपली नववी एटीपी ५०० ट्रॉफी जिंकली.

### आयसीसीची बैठक मार्चमध्ये दोहा येथे

**दुबई** : दोहा येथे २५ ते २७ मार्च दरम्यान आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या बोर्ड आणि समिती बैठकांचे पुढील फेरीचे आयोजन केले जाणार आहे. या बैठकांमध्ये आयसीसी बोर्ड संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, समिती सदस्य आणि वरिष्ठ नेतृत्व एकत्र येईल आणि संघटनेच्या चालू प्रशासन दिनदर्शिकेचा भाग म्हणून जागतिक खेळाच्या वर्तमान आणि भविष्याशी संबंधित महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्याची एक महत्त्वाची संधी मिळेल, असे आयसीसीने म्हटले आहे. २०२० पासून, कतारमध्ये क्रिकेटमधील एकूण सहभाग ४४७ टक्क्यांनी प्रभावीपणे वाढला आहे, असे आयसीसीने म्हटले आहे. कतार ऑलिम्पिक समितीच्या शालेय ऑलिम्पिक कार्यक्रमात क्रिकेटचा समावेश हा या वाढीचा केंद्रबिंदू आहे, त्यामुळे देशभरातील शाळांमध्ये हा खेळ समाविष्ट होण्यास मदत झाली आहे.

### चांगल्या फलंदाजीची अपेक्षा होती : शनाका

**कोलंबो** : हे खूप निराशाजनक आहे. आमच्या शिस्तबद्ध गोलंदाजीत सकारात्मक गुण होते, त्यामुळे प्रतिस्पर्धी संघाला कमी धावसंख्येवर रोखले, प्रत्युत्तरादाखल मला माझे खेळाडू चांगली फलंदाजी करतील अशी अपेक्षा होती, पण निराश केले, असे श्रीलंकेचा कर्णधार दासून शनाका सामन्यानंतर म्हणाला. श्रीलंकेच्या गोलंदाजांनी इंग्लंडला १४५ धावांवर रोखण्यासाठी त्यांच्या योजना प्रभावीपणे राबवल्या, त्यामुळे यजमानांना परिचित परिस्थितीत वास्तववादी संधी मिळाली. तथापि, संघाच्या घसरणीसाठी खेळपट्टी जबाबदार नाही, असे शनाकाने स्पष्ट केले. परिस्थिती खेळण्यायोग्य होती व फलंदाजी करतेवेळी घेतलेली वाईट निर्णयक्षमता महाग पडली. आम्ही वाईट खेळलो. आमच्या संघातील सर्व गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली, इंग्लंडनेही खरोखर चांगली गोलंदाजी केली. आम्ही महत्त्वाच्या अंतराने काही वाईट फटके खेळलो, परंतु पुढील काही सामन्यांमध्ये आम्हाला मुसंडी मारण्याची आवश्यकता आहे, असे कर्णधाराने नमूद केले.

### करकेरा, निर्माबेनने जिंकली नवी दिल्ली मॅराथॉन

**नवी दिल्ली** : रविवारी ११ व्या नवी दिल्ली मॅराथॉन जिंकण्यासाठी कार्तिक करकेराने राजधानीच्या रस्त्यांवर वर्चस्व गाजवले आणि इतर दोघांसह या वर्षीच्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता निकष मोडले. दोन तास आणि तेरा मिनिटे (०२:१३:१०) या उल्लेखनीय वेळेत ४२.२ किलोमीटर अंतर पूर्ण करून, मुंबईच्या करकेराने या वर्षाच्या अखेरीस जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता गुण सहज गाठले. पेशाने डॉक्टर असलेल्या २८ वर्षीय या खेळाडूला गोपी थोनाकल (०२:१३:१२) आणि मान सिंगने (०२:१३:१५) अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान मिळविले. महिला विभागात ठाकोर निर्माबेनने (०२:४१:१५) अव्वल स्थान मिळविले. तिने भागीरथी (०२:४३:२८) व अश्विनी जाधवला (०२:५६:५९) मागे टाकले. इतर महत्त्वाच्या शर्यतींमध्ये, कुलदीप कुमार (०१:०८:५१) आणि जेनेट शिकुर रेशद (०१:१९:३६) यांनी अर्ध-मॅराथॉनमध्ये बाजी मारली.

## इंग्लंडचा श्रीलंकेवर शानदार विजय



फिल सॉल्ट
धावा ६२
चेंडू ४०
चौकार ६
षट्कार २



सामनावीर विल जॅक्स (२२ धावांत ३ बळी)

♦ **कॅण्डी, २२ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी पल्लेकेले स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सुपर एट फेरीतील अटीतटीच्या सामन्यात फिल सॉल्टची जबरदस्त फलंदाजी आणि विल जॅक्सच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर इंग्लंडने सह-यजमान श्रीलंका संघाचा ५१ धावांनी पराभव केला. या विजयाबरोबरच इंग्लंडने २ गुणांची कमाई करत गट एक मध्ये अव्वल स्थान मिळविले. १४ चेंडूंत २१ धावा काढणारा व २२ धावांत ३ बळी टिपणारा इंग्लंडचा अष्टपैलू विल जॅक्स सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून इंग्लंडला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित श्रीलंकेच्या क्षेत्ररक्षकांनी इंग्लंडला २० षटकांत ९ बाद १४६ धावांवर रोखले, मात्र प्रत्युत्तर देताना श्रीलंकेचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत केवळ ९५ धावांत गारद झाला. इंग्लंडकडडून सलामीवीर फिल सॉल्टने तेवढी एकाकी झुंज दिली. फिल सॉल्टला कर्णधार हॅरी ब्रुक (१४), सॅम करन (११) व विल जॅक्सची (२१) थोडी फार साथ मिळाली, परंतु इतर फलंदाज श्रीलंकेच्या गोलंदाजांसमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाही. दुनिथ वेलालगेच्या गोलंदाजीत हेमंताकडू झेलबाद होण्यापूर्वी फिल सॉल्टने ४० चेंडूंत ६२ धावांचे योगदान दिले, यात त्याने ६ चौकार व २ षट्कार खेचलेत. जॅमी ओव्हर्टनने नाबाद १० धावांची खेळी करत आपल्या संघाला ९ बाद १४६ धावांचा टप्पा गाठून दिला.

श्रीलंकेकडून दुनिथ वेलालगेने ३ बळी, दिलशान मधुशंका व महेश थिक्षानाने प्रत्येकी २ बळी, तर दुष्मंता चामिराने एक बळी मिळविला. लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची दाणादाण उडाली. दुनिथ वेलालगे (१०), कामिंदू मेंडिस (१३) व सातव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या कर्णधार दासून शनाका (३०) व महेश थिक्षाना (नाबाद १०) या चौघांनाच दोन अंकी धावा काढता आल्या. इंग्लंडच्या प्रभावी माऱ्यामुळे श्रीलंकेचे उर्वरित सर्व फलंदाज एक अंकी धावेवरच बाद झालेत. पवन रथनायके शून्यावरच बाद झाला. इंग्लंडने श्रीलंकेला ९५ धावांतच गुंडाळले. इंग्लंडकडून विल जॅक्सने ३ बळी, जोफ्रा आर्चर, लियाम डावसन व आदिल रशीदने प्रत्येकी २ बळी, तर जॅमी ओव्हर्टनने एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

## भारत अ संघाकडे आशिया चषक कायम

### एसीसी महिला आशिया चषक रायझिंग स्टार्स

### बांगलादेश अ संघाचा ४६ धावांनी पराभव



विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय महिला क्रिकेटपटू

♦ **बँकॉक, २२ फेब्रुवारी**

थायलंडमधील बँकॉक येथील टेर्डथाई क्रिकेट मैदानावर रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारत अ संघाने बांगलादेश अ संघाचा ४६ धावांनी पराभव केला. राधा यादवच्या नेतृत्वाखालील संघाने १३५ धावांचे लक्ष्य यशस्वीरीत्या बचाव केला व आपले विजेतेपद कायम राखले.

राधा यादवच्या नेतृत्वाखालील संघाने बांगलादेशसमोर विजयासाठी १३५ धावांचे लक्ष्य ठेवले, प्रत्युत्तर देताना बांगलादेशचा संपूर्ण संघ १९.१ षटकात ८८ धावांत गारद झाला.

तेजल हसबनीसने ३४ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ५१ धावा केल्या. तिने आपल्या संघाला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी भरपूर कौशल्य आणि चारित्र्य दाखवले. तिने कर्णधारासोबत पाचव्या गड्यासाठी ६९ धावांची भागीदारी केली, त्यामुळे सुरुवातीला जलद विकेट गमावल्यानंतर भारताला चांगली स्थिरता मिळाली.बांगलादेश अ संघाची कर्णधार फहीम खातूनने चार बळी टिपले.

प्रत्युत्तरादाखल, दुसऱ्या सत्रात भारतीय गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले. बांगलादेश अ संघातील केवळ एक फलंदाज- शमीमा सुलताना २० धावांपर्यंत पोहोचू शकली, तर इतर फलंदाज फार कमी वेळ खेळपट्टीवर थांबले. भारत अ संघाकडून प्रेमाने १२ धावांत ३ बळी टिपले. सोनिया मेंधिया व तनुजा कंवरने प्रत्येकी २ बळी घेतले. बांगलादेश अ संघाने २०२३ मध्ये पहिल्या आवृत्तीत भारत अ संघाकडून ३१ धावांनी पराभव पत्करला होता आणि ही सलग दुसरी वेळ आहे जेव्हा ती उपविजेती ठरली. (वृत्तसंस्था)

## महत्त्वपूर्ण गुण मिळविण्यासाठी झिम्बाब्वे, वेस्ट इंडीज सज्ज



शाय होप



सिकंदर रझा

**आजचा सामना**

**झिम्बाब्वे वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

♦ **मुंबई, २२ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सोमवारी येथे झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडीज यांच्यादरम्यान सुपर एट फेरीचा सामना खेळला जाणार आहे. या दुसऱ्या टप्प्यात दोन्ही संघ महत्वाच्या गुणांसाठी शर्थीचे प्रयत्न करणार आहे.

झिम्बाब्वेने गट ब गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर स्थान मिळवले व वेस्ट इंडीजनेही गट क गुणतालिकेत अव्वल स्थान मिळविले आहे. आता उभ य संघांचा पहिला सुपर ८ सामना सोमवारी येथे होणार आहे.

झिम्बाब्वेची भिस्त ब्रायन बेनेट व ब्लेसिंग मुझाराबानीवर असेल. झिम्बाब्वेचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ब्रायन बेनेट असून त्याने १७५ धावा केल्या आहेत, तर सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ब्लेसिंग मुझाराबानी असून त्याने ९ बळी घेतले आहेत.

झिम्बाब्वेने श्रीलंकेविरुद्धचा गत सामना ६ गड्यांनी जिंकला आहे. लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करताना ब्रायन बेनेट व तादिवानाशे मारुमानीने झिम्बाब्वेला अपेक्षेनुसार सुरुवात करून दिली. बेनेटने अँकरची भूमिका बजावली. मधल्या फळीतील सिकंदर रझाने अप्रतिम खेळ केला. त्याने केवळ ४५ चेंडूत ४५ धावा केल्या व सामन्याचा कल झिम्बाब्वेच्या बाजूने वळविला. वेस्ट इंडीजसाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज शाय होप असून त्याने १५५ धावा केल्या आहेत. तसेच सर्वाधिक बळी टिपणारा गोलंदाज शमार जोसेफ असून त्याने ७ बळी घेतले आहेत. वेस्ट इंडीजने इटलीविरुद्धचा गत सामना ४२ धावांनी जिंकला आहे. वेस्ट इंडीजने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १६५ धावा केल्या.

ब्रँडन किंग व शिमरॉन हेटमायर लवकरच बाद झाले, परंतु त्यानंतर शाय होप व रोस्टन चेसने चांगली फलंदाजी केली व तिसऱ्या गड्यासाठी ६४ धावांची भागीदारी केली. होपने ४६ चेंडूत ७५ धावा केल्या, यात ६ चौकार व ४ षट्कारांचा समावेश होता. शेर्फन रदरफोर्ड व मॅथ्यू फोर्डनेही चांगले योगदान दिले. (वृत्तसंस्था)

## महाराष्ट्राच्या ४७७ धावा; झारखंड ३ बाद १२६

### २३ वर्षाखालील मुलांची कर्नल सी.के नायुडू क्रिकेट स्पर्धा, सचिन धसचे दिमाखदार द्विशतक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र विरुद्ध झारखंड ह्या उपांत्यपूर्व सामन्यात महाराष्ट्राने दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात ३ गडी गमावत ७१ धावांची भर घालत पहिल्या डावात ४७७ धावा केल्या. कर्णधार सचिन धस याने त्याचे स्पर्धेतले पहिले दिमाखदार असे द्विशतक झळकावले.

कालच्या ७ बाद ४०६ वरून पुढे खेळ सुरू झाल्यावर सचिनच्या २००ची उत्सुकता होती ती चौथ्या षटकात चौकार लगावत पूर्ण केली, तत्पूर्वी दोन षटके त्याने धीर ठेवत संयमाने निर्धाव खेळून काढली. सचिन द्विशतक होण्याच्या आधी अजय बोरुडे याने देखील ३ चौकार लगावले आणि ५० धावांची भागीदारी पूर्ण केल्यानंतर दोघांनी धावांचा वेग वाढवायचा प्रयत्न केला. परंतु मोहम्मद अफ्सारने अजयला (२०) बाद करत स्थिरावलेली जोडी फोडली. त्यानंतर २० धावांच्या फरकात सचिन धस २२२ धावावर स्वीप मारण्याच्या प्रयत्नात अमितकुमार कडून त्रिफळाचित झाला. पहिल्या दिवशी दिवसभर आणि दुसऱ्या दिवशी १८ षटके खेळताना तब्बल ३१४ चेंडूचा सामना करत



सचिन धस अभिवादन करताना

२३ चौकार व ४ षटकार सचिनने लगावले. शेवटची जोडी वैभव दारकुंडे व अभिषेक निषद यांनी देखील टिच्चून फलंदाजी १२ षटके खेळून काढत धावसंख्या ४७७ पर्यंत नेली. १२०व्या षटकात वैयक्तिक २७ धावांवर असताना मनिषी ने वैभवला आर्यन हुडा करवी झेल बाद करत महाराष्ट्राचा पहिला डाव थांबविला. २६ चेंडू खेळत २ धावा काढून निषद नाबाद राहिला. झारखंड कडून (८७ धावांत) ५ बळी घेणाऱ्या अमितकुमारला मनीषी (२) बळी, मोहम्मद अफ्सार, शुभ शर्मा आणि कौनैन कुरेशी यांनी प्रत्येकी १ बळी घेत साथ दिली.

झारखंडकडून डावाची सुरुवात बिसेष दत्ता, आर्यन हुडा यांनी केली. जेवणाला खेळ थांबला तेव्हा ५ षटकात दोघांनी १७ केल्या होत्या. महाराष्ट्रकडून तिसरेच षटक विकी ओस्तवाल याने टाकत फिरकीच्या जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न केला. जेवणानंतर सलामीची जोडीने एकेरी दुहेरी तसेच प्रसंगी चौकार मारत धावफलक हलता ठेवला. ४४ धावांची भागीदारी झाली असताना १८वे षटक टाकताना अभिषेक निषदने आर्यन हुडा (१६) याला पायचीत करत जोडी फोडली. त्यानंतर आलेल्या नकुल यादव सोबत बिसेश दत्ता संथ पण संयमी फलंदाजी करत ७ चौकारानिशी अर्धशतक लगावले. चहापानाला अगदी काही मिनिटे शिल्लक असताना गोलंदाजीत बदल म्हणून नीरज जोशी याला पाचारण केले आणि त्याने ११२ चेंडू खेळलेल्या दत्ताला (५२) फिरकीच्या जाळ्यात पकडत पायचीत बाद केले त्यावेळी २ बाद ७८ (३२.५) अशी धावसंख्या झाली होती आणि महाराष्ट्राकडे ३९९ धावांची आघाडी होती.

शेवटच्या सत्रात १५ धावांची भर घातल्यानंतर नकुल यादव (२१) अभिषेक निषदच्या फिरकीमुळे त्रिफळाचित झाला. पण त्यानंतर आलेल्या कर्णधार राजन दीप याने सत्या सेतू सोबत दिवसाखेर अतिशय संथ फलंदाजी केली. त्यामुळे खेळ थांबला तेंव्हा ५८ षटकात ३ बाद १२६ धावाच झाल्या. तेंव्हा राजनदीप २४ (५८ चेंडू) वर तर सत्या ११ (५९ चेंडू) वर नाबाद असून अद्यापि ३५१ धावांनी पिछाडीवर आहेत.

## अव्वल आठ चकमक पहिली

तर मंडळी २० विश्वचषक स्पर्धा आता आपल्या बिझिनेस एंडला आलेली आहे. २० संघांपासून सुरू झालेली ही स्पर्धा आता आठ संघांपर्यंत मर्यादित झालेली आहे. हे संघ दोन गटात विभागलेले आहेत. पहिल्या गटात भारत, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडीज आणि झिंबाब्वे हे संघ आहेत तर दुसऱ्या गटात न्युझीलँड, इंग्लंड, श्रीलंका आणि पाकिस्तान. दोन्ही गटातले अव्वल दोन संघ सेमी फायनलला पोहोचतील. काल न्युझीलंड पाकिस्तान सामना पावसाने वाहून गेला. त्या गटातील दुसरा सामना इंग्लंड श्रीलंका यांच्यात होत आहे. इंग्लंडने हा सामना आरामात जिंकला आहे.

आपल्या गटाचा आणि आपला पहिला सामना दक्षिण आफ्रिके बरोबर नरेंद्र मोदी स्टेडियम अहमदाबाद येथे होणार आहे. दक्षिण आफ्रिका संघ तुल्यबळ संघ आहे त्यामुळे सामना चुरशीचा होईल. पण टी ट्रेंटी या प्रकारावर भारताचं प्रभुत्व लक्षात घेतलं तर हा सामना आपण नक्कीच जिंकणार. सुपरएटची सुरुवातच काय, ही स्पर्धाच आपण विश्वचषक उंचावून साजरी करणार आहोत हे नि:संशय. हा सामना आपण कसा जिंकला हे आपण पुढच्या वार्ताकनात नक्की वाचूया.

भारतीय संघ हा निर्विवाद सर्वश्रेष्ठ संघ आहे. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण तिन्ही बाजूंनी विचार केला तरी आपली कामगिरी निश्चित सरस





आहे. फलंदाजीच्या क्रमवारीत आठव्या क्रमांकावर खेळणाऱ्या फलंदाजापर्यंत प्रत्येक फलंदाज हा मॅच विनर आहे. हार्दिक पांड्या सारखा सर्वश्रेष्ठ अष्टपैलू खेळाडू आहे त्याला साथ द्यायला अक्षर आहे शिवम दुबे आहे, वॉशिंग्टन सुद्धा आहे. बुमरा, हार्दिक, अर्शदीप मिस्टरी स्पिनर वरूण, कुलदीप अक्षर पटेल हा प्रत्येक गोलंदाज मॅच विनर आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ ही मजबूत आहे दक्षिण आफ्रिकेकडे मार्करम, क्विंटन डी कॉक, डेव्हिड मिलर, ब्रेव्हिस असे चांगले फलंदाज आहेत. रबाडा एंगिडी मार्को यानसेन हे जलद गती गोलंदाज आहेत. मार्को यानसेन तर आपल्याला फलंदाजीत सुद्धा नेहमीच सतावतो. किसन महाराज च्या रूपात एक चांगला फिरकी गोलंदाज आहे. दक्षिण आफ्रिके बरोबरचा सामना तसा सोपा नाही. अहमदाबादची ख्याती अशी आहे की, इथले सामने हाय स्कोअरिंगचे होतात. यास या सामन्यातही फलंदाजीची आतिषबाजी पाहायला मिळेल. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून फलंदाजी स्वीकारली आहे.

आपल्या फलंदाजी मध्ये अभिषेक सध्या बॅड पॅच मधून जातोय, पण एकदा का सूर सापडला तर त्याच्यासारखा जबरदस्त फलंदाज दुसरा कोणीही नाही. तो फॉर्म त्याला दक्षिण आफ्रिकेबरोबरच्या सामन्यात मिळेल ही सदिच्छा. सलग तीन डावात अभिषेक शून्यावर बाद झाला आहे. त्यापैकी दोन डावात ऑफ स्पिनवर बाद झाला आहे.

त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा कप्तान मार्करम सुरुवातीला चेंडू आपल्या हातात घेणार हे नक्की ही चकमक बघायला मजा येणार आहे. आजच्या सामन्यात भारताकडून अभिषेक, सूर्या, ईशान किशन, बुमरा, वरूण तसेच दक्षिण आफ्रिकेकडून मार्करम, डी कॉक, ब्रेव्हिस, रबाडा आणि किशन महाराज यांचा खेळ चांगला होईल. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातले सामने नेहमीच विलक्षण चुरशीने खेळले जातात. २०२४ च्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारत आणि दक्षिण आफ्रिका यांची गाठ पडली होती. दक्षिण आफ्रिका नक्की सामना जिंकणार अशा सुस्थितीत असताना बुमरा आणि हार्दिक यांच्या गोलंदाजीने त्यांच्याकडून तो सामना हिरावून घेतला. शेवटच्या चार षटकांमध्ये २४ धावा दक्षिण आफ्रिकेला करता आल्या नाहीत आणि या सर्वांवर कळस म्हणजे सूर्याचा सीमारेषेवरचा झेल. चोकर्स अशी दक्षिण आफ्रिकेची संभावना केली जाते, बघूया या विश्वचषकात ते चोकर्स अशी आपली ओळख पुसण्यात यशस्वी होतात का..

सामने दिवस रात्र आहेत. सामना जवळजवळ मध्यरात्री संपतो. इथून पुढे आपल्या प्रत्येक सामन्यात सामन्या दिवशी प्री व्ह्यू आणि साम न्यानंतर दुर्सय़ा दिवशी सविस्तर वृत्तांत आपल्याला सादर करता येईल. आशा वाटते आपल्या सर्वांना आवडेल. आपली मतं ही वाचायला आवडतील. Hopefully Happy Reading!....

● **मुकुंद कुलकर्णी**
**@ सोलापूर 9421464888**

## भारताचा ऑस्ट्रेलियाकडून निसटता पराभव



**होबार्ट, २२ फेब्रुवारी -**

रविवारी टास्मानिया हॉकी सेंटर येथे एफआयएच पुरुष प्रोलीग हॉकी स्पर्धेत होबार्ट लेगच्या दुसऱ्या सामन्यात भारतीय पुरुष हॉकी संघाचा यजमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध पेनॉल्टी शूटआऊटमध्ये ४-५ असा पराभव झाला. निर्धारित वेळेतील सामना २- २ ने बरोबरीत राहिला होता. अमित रोहिदासने १५ व्या व जुगराज सिंगने ४३ व्या मिनिटाला गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. तथापि, जोएल रिंटलाने ४७ व्या व ५६ व्या मिनिटाला असे दोनदा गोल करून ऑस्ट्रेलियाला बरोबरी साधण्यास मदत केली. पहिल्या चरणाच्या अखेरीस भारताला पेनॉल्टी कॉर्नर मिळाला आणि रोहिदासने त्याचा पुरेपूर फायदा घेत ड्रॅगफ्लिकमध्ये रूपांतर करून भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पूर्ण वेळेनंतर दोन्ही संघ २- २ अशा बरोबरीत असल्याने, विजेता ठरवण्यासाठी सामना पेनॉल्टी शूटआऊट नियमाचा अवलंब करण्यात आला. दोन्ही संघांनी आपले पहिले चार पेनॉल्टी गोलमध्ये रूपांतरित केले, परंतु शेवटच्या पेनॉल्टीमध्ये जेड स्नोडेनने आदित्य अर्जुन लालागेचा फटका बाहेर केला, त्यामुळे ऑस्ट्रेलियाला विजय मिळाला.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बार्शी-वैराग मार्ग बनतोय 'डेथ ट्रॅप'; 'बॅरिकेड्स'चा नुसताच फार्स

## 'तरुण भारत'च्या इम्पॅक्टनंतर लावलेले बॅरिकेड्स आता मात्र शेतात; प्रवाशांचा जीव टांगणीला

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२२ फेब्रुवारी-**

बार्शी-वैराग मार्गावर रक्ताचा सडा पडण्याचे सत्र थांबण्याचे नाव घेईना! प्रशासकीय सुस्तपणा आणि केवळ 'दिखाव्या'पुरती केलेली मलमपट्टी आता प्रवाशांच्या जीवावर बेतू लागली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ज्या ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत, तिथे काही दिवसांपूर्वी प्रशासनाने लावलेले बॅरिकेड्स आता रस्त्यावर नसून शेजारच्या ज्वारीच्या पिकात धूळ खात पडले आहेत. हा केवळ योगायोग नसून प्रशासकीय निष्काळजीपणामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात येत असल्याची भावना वैराग परिसरातून व्यक्त होत आहे.

**प्रशासनाचा 'टेंपररी' इम्पॅक्ट; बॅरिकेड्स गेले कुठे?**

काही दिवसांपूर्वी 'दै.तरुण भारत'ने या मार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणावर आवाज उठवला होता. त्यानंतर सोलापूर ग्रामीण पोलीस प्रशासनाने खडबडून जागे होत धाराशिव चौक, मानेगाव पेट्रोल पंप आणि काळेगाव फाटा या 'ब्लॅक स्पॉट'वर बॅरिकेड्स लावले होते. काही दिवस वाहनांच्या वेगावर नियंत्रण आले होते, पण आजची स्थिती संतापजनक आहे.

**शेतात फेकले बॅरिकेड्स :** सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या नावाने असलेले हे लोखंडी बॅरिकेड्स सध्या रस्त्यावरून गायब आहेत. धाराशिव चौक आणि मानेगाव फाटा परिसरातील हे बॅरिकेड्स चक्क जवळच्या शेतात आणि पिकांमध्ये फेकून दिलेल्या अवस्थेत पाहायला मिळत आहेत.

**प्रशासकीय डोळेझाक :** हे बॅरिकेड्स कुणी हटवले? महामार्ग पोलीस आणि स्थानिक वैराग पोलीस याकडे दुर्लक्ष का करत आहेत? बॅरिकेड्सची सुरक्षा करणे आणि ते योग्य ठिकाणी राहतील याची खातरजमा करण्यात यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरली आहे.

**वेगावर नियंत्रण नाही :** ग्रामस्थांच्या मते, जर हे बॅरिकेड्स जागेवर असते, तर वाहनांच्या वेगाला लगाम लागला असता. आता पुन्हा या मार्गावर बेदरकारपणे वाहने धावत असून मृत्यूचा सापळा अधिक गडद झाला आहे.





### आता 'दिखावा' नको, ठोस उपाययोजना हव्यात!

प्रशासनाने आता केवळ कागदी घोडे न नाचवता उपाययोजना तातडीने करणे गरजेचे आहे. शास्त्रीय गतिरोधक, केवळ बॅरिकेड्सवर अवलंबून न राहता, अपघातप्रवण क्षेत्रांत IRC मानकानुसार रॅम्बलर्स किंवा मोठे गतिरोधक बसवावेत. रिफ्लेक्टर व फलक, रात्रीच्या वेळी रस्ता दिसत नसल्याने 'ब्लॅक स्पॉट्स'वर हाय-क्वालिटी रिफ्लेक्टर्स आणि सूचना फलक लावावेत. कायमस्वरूपी गस्त, ड्रंक अँड ड्राइव्ह आणि वेगाने वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी वैराग पोलिसांनी भरारी पथके तैनात करावीत. आधुनिक तंत्रज्ञान, वाहनांच्या वेगावर मर्यादा आणण्यासाठी CCTV आणि स्पीड गनचा वापर करावा. प्रशासन आता तरी जागे होऊन कायमस्वरूपी तोडगा काढणार की पुन्हा एखाद्या भीषण अपघाताची वाट पाहणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण या गंभीर विषयात लक्ष घालून हे 'मृत्यूचे सापळे' बंद करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### प्रशासनाला जळजळीत सवाल; आणखी किती बळी हवेत?

केवळ बातमी प्रसिद्ध झाली म्हणून 'मलमपट्टी' करण्यासाठी बॅरिकेड्स लावले होते का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. बॅरिकेड्स लावले तेव्हा शिस्त लागली होती, वेग कमी झाला होता. पण प्रशासनाने त्यावर देखरेख ठेवली नाही. आज ते बॅरिकेड्स शेतात पडले आहेत आणि रस्ता पुन्हा 'मोकळा' झाला आहे. या बेजबाबदारपणाला जबाबदार कोण?

**- संतप्त नागरिक, वैराग.**

**पोलीस अधीक्षक आणि स्थानिक पोलिसांच्या भूमिकेकडे लक्ष**

या संपूर्ण प्रकरणात पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांची भूमिका अत्यंत कळीची ठरणार आहे. त्यांच्या नावाने लावलेले बॅरिकेड्स जर शेतात धूळ खात असतील, तर हा पोलिसांच्या धाकाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक वैराग पोलीस स्टेशनने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, बॅरिकेड्स हटवणाऱ्या प्रवृत्तींवर कारवाई करणे अपेक्षित आहे. केवळ कागदोपत्री 'ब्लॅक स्पॉट' घोषित करून भागणार नाही, तर तिथे प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

## महत्वाचे...

### हद्दपार इसम कोर्ट परिसरात सापडला, बार्शीत पोलिसांची कारवाई

**बार्शी, दि. २२ फेब्रुवारी -**

बार्शी शहर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये हद्दपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी इब्राहिम राजअहमद शेख (वय ३९ वर्षे, रा. मंगळवार पेठ, बार्शी) याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दि. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी बार्शी शहरात पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे अन्वेषण पथकातील पोलीस कर्मचारी सचिन भारत देशमुख, तसेच पोकॉ उदार व पोकॉ बहिरे यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हद्दपार करण्यात आलेला इसम इब्राहिम शेख हा बार्शी येथील कोर्ट परिसरात फिरत आहे. माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन खात्री केली असता सदर इसम तेथे आढळून आला. त्यास बार्शी येथे येण्याबाबत परवानगी विचारली असता त्याने कोणतीही पूर्वपरवानगी घेतली नसल्याचे सांगितले. सदर इसमास पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या आदेशाने संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून एक वर्षाकरिता हद्दपार करण्यात आलेले आहे. तरीदेखील कोणतीही पूर्वपरवानगी न घेता तो बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत आढळून आल्याने त्याने हद्दपार आदेशाचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद नोंदविण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.



### इतिहासाने नोंद घ्यावी असे कार्य करा : ॲड. भाकरे

**सांगोला, दि. २२ फेब्रुवारी -**

इतिहासाने ओळख घ्यावी असे कार्य आपल्या हातून घडले पाहिजे. विद्यार्थ्यांनी लोक काय म्हणतील याकडे न पाहता आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे असा संदेश ॲड.गजानन भाकरे यांनी दिला. ते सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सव कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष महादेव गायकवाड तसेच सचिव अंकुशराव गायकवाड, प्राचार्य डॉ. रणजित देशमुख उपस्थित होते. मृदुला पाटील, सुरेखा लिगाडे व तनुजा मोरे या विद्यार्थिनींनी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे सादर केली. महादेव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी महाराजांच्या धैर्य, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या गुणांचा आदर्श ठेवून जीवनात मोठी उद्दिष्टे साध्य करावीत असे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा.संदीप बावचे यांनी केले.



### सुयश विद्यालयात शिवजयंती साजरी

**बार्शी, दि. २२ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सुयश विद्यालय, बार्शी यांच्यावतीने शिवसृष्टी येथ शिवजयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास माजी आमदार राजाभाऊ राऊत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिवादन करुन करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक मर्दानी खेळांचे प्रभावी सादरीकरण करुन उपस्थितांना शिवकालीन शौर्याची अनुभूती करुन दिली. झांज पथकाच्या दम दार तालावर परिसर दणाणून गेला आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी बालमावळ्यांनी शिवगीतांवर सादर केलेले नृत्य विशेष आकर्षण ठरले.



### महात्मा फुले कॉलेजचे जेईई मेन्स परीक्षेत यश

**चार विद्यार्थी जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र**

**टेंभुर्णी, दि.२२ फेब्रुवारी-**

येथील महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जेईई मेन्सपरीक्षेत चमकदार कामगिरी करत कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून, विद्यार्थ्यांनी उच्चांकी गुण मिळवले आहेत. सुप्रिया अटकळे, प्रथमेश गवळी, दत्तात्रय भानवसे यांच्यासह चार विद्यार्थी जेईई अँडव्हान्स परीक्षेसाठी पात्र झाले आहेत. या सर्वांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सुप्रिया अटकळे हिला ९३.२१, प्रथमेश गवळी यास ९१.०१, दत्तात्रय भानवसे यास ९०.४९ पर्सेंटाईल मिळाले आहेत. या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, प्राचार्य विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान, मार्गदर्शक शिक्षक अक्षय लोंढे, सोनाली गवळी, संदीप लोंढे, शिक्षक पालक संघ, संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ यांचेकडून सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

### सुवर्णा वडनाल यांचे निधन



**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी -**

माधवनगर येथील सुवर्णा सत्यनारायण वडनाल (वय-६५) यांचे आज रविवारी दि. २२ फेब्रुवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी सकाळी दहा वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माधव नगर तरुण मंडळ लेझिम संघाचे कार्याध्यक्ष सुधाकर वडनाल यांच्या त्या मातोश्री होत.



### पंढरपूर तालुक्यास उत्कृष्ट आरोग्य सेवा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ फेब्रुवारी -**

आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाद्वारा भक्ती विठोबाची सेवा आरोग्याची अंतर्गत दिला जाणारा उत्कृष्ट आरोग्य सेवेचा पुरस्कार पंढरपूर तालुक्यास प्राप्त झाला आहे. या पुरस्काराने पंढरपूर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

हा पुरस्कार मुंबई येथे आरोग्यमंत्री प्रकाश अबीटकर यांच्या हस्ते जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, डॉ.महेश सुडके, डॉ.विजयकुमार सरडे यांनी स्विकारला. यावेळी आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त, संचालक व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

### निरोगी शरीर हे सर्व साधनांचे माध्यम : डॉ. इनामदार

**पत्रकारांची मोफत आरोग्य तपासणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२२ फेब्रुवारी-**

समाज मनाचा आरसा असणारे पत्रकार हे स्वतःच्या शरीराकडे लक्ष देत नाहीत. पत्रकार बंधुंनी आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. शरीर माध्यंम खलू धर्म साधनम् या ब्रिद वाक्याप्रमाणे निरोगी शरीर सर्व साधनांचे माध्यम आहे असे मत अकलूज येथील अश्विनी हॉस्पिटलचे हृदयरोग तज्ञ डॉ. एम.के.इनामदार यांनी व्यक्त केले.

अश्विनी हॉस्पिटल आणि माळशिरस तालुका मराठी पत्रकार संघाच्या विद्यमाने माळशिरस तालुक्यातील पत्रकारांची मोफत आरोग्य तपासणी डॉ. एम.के.इनामदार यांनी केली. त्यावेळी त्यांनी पत्रकारांना निरोगी आरोग्याचा कानमंत्र दिला.



ते म्हणाले, पूर्वी साठ वर्षांनंतर हृदय विकार व्हायचा मात्र सध्या २५-३० वर्षांचे तरुण ही त्या आजाराचे बळी पडताना दिसतात. याचे मुख्य कारण म्हणजे बदलेली जीवनशैली, दुषित अन्न, पाणी आणि नकारात्मक विचारसरणी असून आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे आहे. सध्या कोविड लसीमुळे हृदय विकार वाढल्याची चर्चा होतेय, मात्र लसीचा आणि हृदय विकारांचा काही संबंध नसल्याचे यावेळी डॉ. इनामदार यांनी स्पष्ट केले. सदर तपासणी शिबिरासाठी शैलेश कुलकर्णी, कोंडाजी (कुमार) म्हावरकर, विनोद देवकुळे, प्रतीक्षा खिलारे, वैभव खैरमोडे, विकास साठे, मयुरी काटे, राहुल बोडगे, संभाजी पाटोळे, साजिद शेख, रोहित इंगळे, जयसिंग थोरात, दिलीप नवगन यांचे सहकार्य लाभले. यावेळी मुद्रित, विविध समाज माध्यमे व युट्यूब पोर्टलचे पत्रकार उपस्थित होते. पत्रकार रामचंद्र मगर यांनी प्रास्ताविक केले. जेष्ठ पत्रकार चंद्रकांत कुंभार यांनी आभार मानले.



### सुशीला नांगरे-पाटील यांच्या सत्त्व संचित काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ फेब्रुवारी -**

सांगोला शहरातील सुशीला नांगरे-पाटील यांच्या सत्त्व संचित या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्कर्ष विद्यालयाच्या सभागृहात डॉ. संजीवनी केळकर यांच्या हस्ते व डॉ. कृष्णा इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ.सयाजीराजे मोकाशी, प्रा.पी. सी.झपके, संस्था अध्यक्ष नीलिमा कुलकर्णी, सुनील जवंजाळ, शालिनी कुलकर्णी, कवी इंद्रजीत घुले, प्राचार्य सुनील कुलकर्णी, पुष्पलता मिसाळ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

मनोगतात डॉ.सयाजीराजे मोकाशी यांनी सांगोला हे कवितेचे गाव व्हावे असे विचार व्यक्त केले. डॉ. कृष्णा इंगोले यांनी सांगोला गाव जरी सोन्याचं असेल तरी सांगोल्याला सांस्कृतिक चेहरा मोहरा नाही जसा मंगळवेढ्याला आहे असे साहित्यिक आव्हानात्मक विचार मांडले. डॉ. संजीवनी केळकर यांनी सुशीला नांगरे पाटील यांच्या सेवेतील अध्यापन कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांनी प्रास्ताविक, शिक्षिका शुभांगी कवठेकर यांनी मान्यवरांचा परिचय, सूत्रसंचालन शिक्षिका लिंगे यांनी केले.

आभार शिक्षिका बनसोडे यांनी मानले. या प्रकाशन सोहळ्यासाठी सांगोला पंचक्रोशीतून लेखक, कवी बंधू व भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

### शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक सुस्थितीत

**अफवांवर विश्वास ठेवू नका : चेअरमन डॉ. बुरगुटे**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ फेब्रुवारी-**

बार्शी शहरात सन १९९९ मध्ये स्थापन झालेली शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक लि., बार्शी ही सर्वसामान्य नागरिकांची विश्वासार्ह बँक म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. स्वमालकीची सुसज्ज इमारत, ग्राहकाभिमुख सेवा, त्वरित कर्जपुरवठा आणि पारदर्शक व्यवहार पद्धतीमुळे बँकेने शहरात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

मागील दोन वर्षांपूर्वी बँकेच्या एन.पी.ए. प्रमाणात किरकोळ वाढ झाली होती. मात्र त्या पार्श्वभूमीवर काही विघ्नसंतोषी व्यक्तींनी समाजमाध्यमे व डिजिटल माध्यमांद्वारे चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित करून बँकेची नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न केला असल्याचे बँकेच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे. संबंधितांनी कोणतीही माहिती प्रसारित करण्यापूर्वी बँकेकडून अधिकृत माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बँकेचे कामकाज रिजर्व्ह बँक आणि सहकार खात्याच्या नियमांनुसार नियंत्रित व नियमित तपासणीखाली असते. जानेवारी २०२६ अखेर बँकेचे एन.पी.ए. प्रमाण ९.७० टक्के इतके नियंत्रित स्तरावर आले असून चालू आर्थिक वर्षात बँकेला २ कोटी रुपयांचा नफा झालेला आहे. मार्च २०२६ अखेर ए.पी.ए. प्रमाण शून्य टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

सध्या बँकेचे सर्व व्यवहार सुस्थितीत असून ग्राहकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता बँकेवरचा विश्वास कायम ठेवावा, असे आवाहन चेअरमन यांनी केले आहे. दरम्यान, बँकेबाबत चुकीची व बदनामीकारक माहिती पसरविणाऱ्यांविरुद्ध तातडीने फौजदारी व अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्यात येत असून भविष्यातही अशा प्रकारे बदनामी केल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे यांनी दिला आहे.

### पंढरपुरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये विकास कामांना गती

**मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते भुयारी गटार योजनेचे भूमिपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ फेब्रुवारी -**

शहरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकास कामांचा मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी आढावा घेऊन मागील काही दिवसांपासून प्रभागात विकास कामांचा धडाका लावल्याचे दिसून येत आहे. रविवार (दि.२२) प्रभाग क्रमांक १७ संतपेठ परिसरातील भुयारी गटार योजनेच्या कामाचे भूमिपूजन मनसे नेते दिलीप धोत्रे, नगराध्यक्षा प्रणिता भालके, समाजसेवक नागेश यादव यांच्या हस्ते पार पडले.



यावेळी नगरसेवक लोकेश यादव, समाजसेवक बाबा चव्हाण, मनसे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, शहर संघटक गणेश पिंपळनेरकर, दत्ता थोरात, संतोष वाघमारे, लक्ष्मण रणदिवे, तेजस जाधव, योगेश रणदिवे, तुषार करजीगीकर यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते. नुकत्याच पार पडलेल्या पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत संतपेठ परिसरातील बहुचर्चित असलेला प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून नगरसेविका माधुरी धोत्रे यांना मताधिक्याने निवडून दिले.

अनेक वर्षांपासून नागरी सुविधांपासून वंचित असलेल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन विकास कामांचा धडाका सुरू केला आहे. याचबरोबर महापुरुषांच्या जयंतीनिमित्त राज्यातील नावाजलेल्या कलाकारांच्या उपस्थितीत विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून लोककलेच्या माध्यमातून मराठी संस्कृतीचे दर्शन घडवून दिल्याबद्दल परिसरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले आहे.



### नूतन पं.स.सदस्या ज्योती पांढरे यांचा आमदार आवताडे यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २२ फेब्रुवारी -**

पुळुज गणातून निवडून आलेल्या पंचायत समिती सदस्या ज्योती पांढरे यांचा बहुमताने निवडून आल्याबद्दल आमदार समाधान अवताडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याने स्थानिक राजकारण्यांमध्ये उत्साह आणि एकजुटीचे वातावरण निर्माण झाले. ज्योती पांढरे यांनी प्रचंड बहुमत मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यांच्या विजयाची पंढरपूर तालुक्यात चर्चा होती. सत्कार सोहळ्याला जिल्हा परिषद सदस्य नंदकुमार वाघमारे, सरपंच औदुंबर ढोणे, उपसरपंच समाधान देठे, सरपंच बापूसाहेब कदम, उपसरपंच सचिन वाळके, मा. उपसरपंच सागर कारंडे, मा. उपसरपंच सागर सोनवणे, मा. उपसरपंच महादेव पवार, भाऊसाहेब ढोणे उपस्थित होते. आमदार अवताडे यांनी ज्योती पांढरे यांच्या कामगिरीचे कौतुक केले.

## महत्वाचे...



### स्वीकृत नगरसेवक श्रीनिवास दायमा यांचा शिंगवी ज्वेलर्सतर्फे सन्मान

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ज्यांची ओळख आहे. आणि ज्यांनी अनेक सामाजिक कामे निष्काम भावनेने केले अशा श्रीनिवास दायमा यांचे स्वीकृत नगरसेवक म्हणून सोलापूर महानगरपालिकेत निवड झाल्या निमित्त शिंगवी ज्वेलर्सचे प्रमुख प्रदीपकुमार शिंगवी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.अशा निस्सिम कार्यकर्त्यांचे पश्चिम मंगळवार पेठ येथील सुप्रसिद्ध अशा शिंगवी ज्वेलर्स परिवारातर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत तापडिया, विनय शिंगवी, गोपाल दायमा,अविनाश म्हमाणे उपस्थित होते.कार्यक्रमाची प्रस्तावना श्रीनिवास मालपुरी यांनी केले तर आभार श्रीकांत दायमा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश कांदीकटला, गणेश नादरगी, दिनेश वेदपाठक तसेच सर्व स्टाफ यांनी प्रयत्न केले.

### डॉ. रायते, प्रा. माने, डोंबे, मोरे यांना कथामालेचे पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

अ.भा. साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती सोलापूर तर्फे, पुष्पा भातंब्रेकर स्मृति- आदर्श माता पुरस्कार डॉ. माधवी वासुदेव रायते, डॉ.वीणाताई सुराणा स्मृति-आदर्श समाजसेविका पुरस्कार रेश्मा कृष्णा माने,साने गुरुजी गौरव पुरस्कार अरविंद तुकाराम डोंबे व स्व.आप्पासाहेब गुंडोजी पाटील व सुमनताई अप्पासाहेब पाटील स्मृति- आदर्श समाजसेवक पुरस्कार ग्रंथ मित्र कुंडलिक बापू मोरे यांना जाहीर झाला आहे. सामान्य ज्ञान स्पर्धेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रत्येक शाळेतील शिक्षकास उपक्रमशील शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे. २०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी केलेल्या शाळेला साने गुरुजींचे आकर्षक छायाचित्र भेट देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.श्रुती वडगबाळकर, प्रमुख अतिथी प्रसिद्ध उद्योजक किशोर चंडक व अ.भा. साने गुरुजी कथामालेचे कोषाध्यक्ष ग्रंथ मित्र गुलाबराव पाटील यांच्या हस्ते,हे पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान केले जातील. हा कार्यक्रम रविवार १ मार्च २०२६ रोजी शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, सोलापूर येथे दुपारी ३.०० वा. संपन्न होईल, तरी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष अशोक खानापुरे व कार्यवाह डॉ. रामचंद्र धर्मसाले यांनी केले आहे.

### जी.डी.सी.अॅन्ड ए व सी.एच.एम. परीक्षा ऑनलाईन अर्जाची मुदत १० मार्चपर्यंत

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी.डी.सी.अॅन्ड ए बोर्ड) यांच्यामार्फत घेण्यात येणारी शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी.अॅन्ड ए) तसेच सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) परीक्षा दि.२६ २७ व २८ मे रोजी आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेसाठी इच्छुक उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या तारखेत बदल करून आता उमेदवारांना१० मार्च रोजी रात्री ८.०० वाजेपर्यंत अधिकृत संकेतस्थळ वर ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. त्यामुळे अद्याप अर्ज न केलेल्या उमेदवारांना दिलासा मिळाला असून तयारीसाठी अधिक वेळ उपलब्ध झाला आहे. तसेच परीक्षेचे शुल्क बँकेत चलनाद्वारे भरण्याची मुदतही वाढविण्यात आली आहे. उमेदवारांना दि.१३ मार्च रोजी संबंधित बँकेच्या कामकाजाच्या वेळेपर्यंत शुल्क भरता येणार आहे. अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर कार्यालय (मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ई-ब्लॉक, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर) येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा. जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सर्व पात्र उमेदवारांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# मोहोळ बसस्थानकाजवळ अचानक उभारला संभाजीराजांचा पुतळा

- पोलिस बंदोबस्तात वाढ
- परवानगी नसल्याने तणाव

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२२ फेब्रुवारी-**

मोहोळ शहराच्या बस स्थानकाजवळ नॅशनल हायवेच्या जागेमध्ये रात्री अचानक पणे गनिमी कावा करून छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी केली. या घटनेमुळे मोहोळ शहरांमध्ये अचानक पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला. शहरामध्ये काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

मोहोळ शहरामध्ये नॅशनल हायवे महामार्गालगत बस स्थानकाजवळ छत्रपती संभाजी महाराज प्रेमी आणि सकल मराठा समाजातील तरुणांनी रात्रीच्यावेळी नॅशनल हायवेच्या सुशोभीकरणाच्या राखीव जागेत कोणतीही पुर्व परवानगी न घेता छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी केली. रविवारी सकाळी ही बाब प्रशासनाच्या लक्षात आल्यानंतर म ोठा पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला. छत्रपती शंभू प्रेमींनी या ठिकाणी गर्दी केली होती. येथील पुतळा काढण्यात येऊ नये अन्यथा कायदा व सुव्यवस्था निर्माण होऊ शकते अशी भूमिका सर्वांनी घेतली. त्यामुळे मोहोळ शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. पोलिस निरिक्षक बाजीराव पोवार यांचेकडून माहिती घेतली अणि पोलीस उपाधीक्षक संकेत देवळेकर यांनी नॅशनल हायवे अधिकारी, मोहोळ तहसीलदार, तसेच नागरिकांना बोलावून बैठक घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. याबाबत पोलीस प्रशासनाने नॅशनल हायवे प्रशासनाला या जागेसंदर्भात माहिती म ागवली व या ठिकाणी पुतळा बसवण्यास परवानगी दिली आहे काय? याबाबत विचारणा केली आहे. याबाबतची माहिती आल्यानंतर प्रशासनाची पुढील कारवाई होणार आहे असे समजते. मात्र पुतळा परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.






सोलापूर : रेल्वे स्टेशन परिसरातील शहरातील मुख्य पोस्ट ऑफिसची जागा वर्षानुवर्षे रिकामी आहे. या जागेचे सदुपयोग पोस्ट खाते कधी करणार? (छायाचित्र : केवल तिवारी)

## बार्शीत प्लायवूड कारखान्यास भीषण आग

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ फेब्रुवारी-**

शहराजवळील गाताचीवाडी हद्दीतील औद्योगिक वसाहत क्रमांक ३ मध्ये शनिवारी सकाळच्या सुमारास प्लायवूडचे दरवाजे तयार करणाऱ्या कारखान्यास शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत चार लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



अग्निशमन दलास सकाळी माहिती मिळताच बार्शी नगरपरिषदेचे सहा अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले. संबंधित कारखाना शारदा पाईप्स अँड प्रोफाईल या नावाने ओळखला जात असून येथे प्लायवूड दरवाजे तयार करण्याचे काम केले जाते. या कारखान्यात टाकाऊ लाकडापासून प्लायवूड दरवाजे तयार करुन लाकडी दरवाजास लागणारे सन्माईक, पीव्हीसी फोम शीट व तयार केलेले पी.व्ही.सी. डोअर, वूड कटर मशीन इतर साहित्य जळून खाक झाले. या कारखान्याचे मालक संतोष शिराळ हे आहेत. परिसरात मोठ्या प्रमाणात लाकूड साठवलेले असल्याने आगीच्या ज्वाळा प्रचंड स्वरुपात उसळल्या होत्या. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करत दुपारी आग पूर्णतः आटोक्यात आणली.

या कारखान्यात बिहार राज्यातील कामगार कार्यरत होते. आग लागली तेंव्हा सर्व कामगार सुरक्षित बाहेर पडल्याने जीवितहानी टळली, अशी माहिती अग्निशमन दलाचे प्रमुख वसंत पिचारे यांनी दिली. आग विझविण्याच्या कार्यात अजय कांबळे, गोरक्षनाथ राऊत, सुरज राऊत, भैरव राऊत, सुरज कांबळे, मयूर बोकेफोडे, विशाल गरड आणि कालीचरण वस्ताद यांनी मोलाची भूमिका बजावली.

## नूमवि शाळेत शिक्षकांसाठी कार्यशाळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

नु. म. वि. शिशु शाळेत नू. म.वि.शिशु शाळा व श्री शुभराय मठ यांच्या संयुक्त विद्यमाने शिशु शिक्षकांसाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यक्रमाची सुरुवात अलका ओक यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली.

शुभांगी बुवा यांनी प्रास्ताविक केले. चांगला समाज घडविण्याची जबाबदारी ही शिशु शिक्षिकेची असल्यामुळे शिशु शिक्षिकानी फक्त शिकवणेच नाही तर त्याबरोबर चांगले संस्कार देण्याची जबाबदारी तुमची आहे असे त्या म्हणाल्या.

प्रथम सत्रात, पीपीटी द्वारे बाल शिक्षणाची सुरुवाती पासून नवीन नवीन शैक्षणिक धोरण या पर्यंतचा इतिहास वैशाली पाटील यांनी दिल.यासाठी कविता बडगिरी यांनी तंत्रज्ञानाची बाजू सांभाळली.

द्वितीय सत्रामध्ये मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांचे शिशु शिक्षिकेचे व्यक्तिमत्व कसे असावे, हे त्यांनी आपल्या व्याख्यानातून विविध पैलू द्वारे व उदाहरणाद्वारे सांगितले त्या म्हणाल्या शिशु शिक्षिकेने स्वतःला कधी कमी लेखू नये, सतत नव नवीन शिकणारी आणि प्रयोगशील शिशु शिक्षिका असावी, मेंदू पूरक शिक्षण आणि आणि हसत खेळत शिक्षण देणे गरजेचे आहे असे त्या म्हणाल्या. तिसऱ्या सत्रात भाषा आणि गणित शिशु शाळेत कसे शिकवले जाते याची संपूर्ण माहिती शाळेच्या शिक्षिका माधुरी फंड यांनी दिली. त्यानंतर शाळेमध्ये इंग्लिश हा विषय शिशू शाळेत कसा असावा हे सायली देशमुख यांनी सांगितले.

विज्ञानातून मुलांची कल्पना शक्ती आणि विचार करण्याची प्रेरणा मिळते हे विज्ञानाच्या काही प्रयोगाद्वारे मृणाल देशपांडे यांनी दाखवून दिले. शिशु शाळेमध्ये सुशोभन कोपरा कसा व का असावा हे आरती मराठे यांनी सांगितले त्याचबरोबर त्यांनी सुशोभन कोपराही तयार केला.

शेवटी शिक्षण तज्ञ गिजुभाई बधेका यांची बालदेवो भव या प्रार्थनेने सांगता झाली. सविता कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना काळे यांनी केले.

## भीमानगरमध्ये ४१ रूग्णांची मोफत तपासणी



### हिंद द चादर अंतर्गत महापालिकेतर्फे शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या जुळे सोलापूर येथील नागरी अरोग्यवर्धिऩी केंद्राच्या वतीने भीमानगरच्या मारूती मंदीरात घेण्यात आलेल्या अरोग्य तपासणी शिबिरात ४१ रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

राष्ट्रीय नागरी अरोग्य अभियानातून हिंद द चादर गुरू तेगबहादूर यांच्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वैद्यकिय अधिकारी डॉ. गीता ढोपरे यांनी रूग्णांची तपासणी करून त्यांना औषधे दिली. अरोग्यसेविका आशियाना शेख, अरोग्यसेवक अविष्कार गायकवाड, आशावर्कर अविंदा भोसले यांनी सहकार्य केले. या शिबिरात सुमारे ४१ रूग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये बीपी, शुगर ची तपासणी करून रूग्णांना आवश्यकतेनुसार औषधे देण्यात आली. तपासणी आलेल्या महिलांना डॉ.ढोपरे यांनी सर्व प्रकारच्या कर्करोगाबाबत मार्गदर्शन करीत जनजागृती केली.

## राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा; खरीपासाठी १ हजार ३२८ कोटींचा निधी वितरित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य म ूल्य मिळावे आणि बाजारभावातील चढ-उतारांपासून संरक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान व भरडधान्य खरेदी योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासनाने एकूण १३२८.३० कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे.



दरम्यान, यामध्ये धान खरेदीसाठी १३०६.४६ कोटी रुपये तर भरडधान्य खरेदीसाठी २१.८४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. राज्यभर जिल्हास्तरीय सहकारी संस्थांमार्फत अधिकृत खरेदी केंद्रे सुरू करण्यआली आहेत. या केंद्रांवर निर्धारित गुणवत्ता निकषांनुसार भात, मका आणि ज्वारीची खरेदी केली जात आहे.खुल्या बाजारातील दरातील चढ-उतार टाळण्यासाठी जास्तीत जास्त नोंदणीकृत शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल अधिकृत खरेदी केंद्रांवरच विक्री करावा, असे आवाहन शासनाकडून करण्यात आले आहे.

### खरेदी प्रक्रियेला वेग

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ आणि आदिवासी विकास महासंघ यांच्या माध्यमातून जिल्हानिहाय खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.शेतकऱ्यांची नोंदणी, मालाची गुणवत्ता तपासणी व वजन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हमीभावानुसार रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.या निर्णयामुळे शासकीय खरेदी प्रक्रियेला मोठा वेग मिळणार असून राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## गुरुवारी सोलापूर बाजार समितीत सुरु होणार बेदाण्याचे सौदे

- आवक वाढली, मागणी घटली
- बेदाणा दरात प्रतिकिलो ५० रुपयांची घसरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

चालू हंगामातील बेदाणा सौद्याला सांगली आणि तासगाव बाजार समितीत सुरुवात झाली असून, वाढती आवक आणि मागणीअभावी दरात प्रतिकिलो तब्बल ५० रुपयांची घट झाली आहे. दरम्यान, गुरुवार (दि. २६) पासून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतही बेदाणा सौदे सुरू होणार आहेत. हंगामाच्या पहिल्याच दिवशी उत्कृष्ट प्रतीच्या हिरव्या बेदाण्यास प्रतिकिलो ४०१ रुपये असा उच्चांकी दर मिळाला होता. किमान दर ३३१ रुपये होता. २१ दुकानांतून सुमारे १०० टन नवीन मालाची आवक झाली होती. त्यामुळे उत्पादकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. मात्र, दुसऱ्याच



सौद्यात दर ३०० ते ३४० रुपयांपर्यंत खाली आले. उत्कृष्ट प्रतीलाही केवळ ३५१ रुपये दर मिळाला. वाढत्या आवकेमुळे बाजारावर दबाव वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

गत हंगामाच्या अखेरीस बेदाण्याला प्रतिकिलो ४०० रुपये दर मिळाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्याम ुळे अनेक उत्पादक दर वाढीच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, सध्याच्या परिस्थितीत वाढती आवक, व्यापाऱ्यांकडून मर्यादित मागणी आणि अफगाणिस्तानच्या नावाखाली कमी दरात येणारा माल यामुळे बाजारात मंदीचे वातावरण आहे. महाराष्ट्रात अतिवृष्टीचा काही भागात परिणाम झाला असला, तरी सोलापूर जिल्ह्यात द्राक्षबागांना मोठा फटका बसलेला नाही. उलट शेजारच्या विजयपूर जिल्हा येथे द्राक्ष क्षेत्र वाढले असून उत्पादनही चांगले आहे. त्यामुळे यंदा आवक भरपूर राहण्याचा अंदाज आहे. व्यापाऱ्यांच्या मते, सुरुवातीला दर घसरले असले तरी प्रतिकिलो २५० ते ३०० रुपयांदरम्यान दर स्थिर राहू शकतात.

दरम्यान, खाण्यासाठीच्या द्राक्षांच्या दरातही घसरण झाली आहे. सध्या हे दर प्रतिकिलो ६० ते ७० रुपयांच्या दरम्यान आहेत. म हाशिवरात्रीनंतर काही दिवस ते ८०-८५ रुपयांपर्यंत गेले होते. आंबा हंगाम लांबणीवर पडल्याने बाजारातील मागणीचे चित्र स्पष्ट होण्यासाठी आणखी पंधरा दिवस लागतील, असे आडत व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.एकूणच, वाढती आवक आणि अनिश्चित मागणी यामुळे बेदाणा बाजार सध्या दबावात आहे. सोलापूर बाजार समितीतील सौदे सुरू झाल्यानंतर दराचे चित्र अधिक स्पष्ट होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जीवातून जीवोत्पत्ती: फ्रान्सिस्को रेडी आणि एका भ्रमाचा अंत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात फ्रान्सिस्को रेडी यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष वैज्ञानिक सेमिनार आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

सेमिनारची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते फ्रान्सिस्को रेडी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थी रोहित साबळे यांनी रेडी यांच्या जीवनप्रवास आणि वैज्ञानिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. फ्रान्सिस्को रेडी यांचे वैज्ञानिक योगदान: रेडी यांनी प्रायोगिक जीवशास्त्र क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांनी सिद्ध केले की कुजलेल्या मांसावर तयार होणाऱ्या अळ्या ही बाहेरून आलेल्या माश्यांच्या अंड्यांमधून निर्माण होतात.प्रयोग: काही मांस उघड्या भांड्यात ठेवले, काही बंद भांड्यात, तर काही जाळीदार कापडाने झाकलेल्या भांड्यात ठेवले. परिणाम: केवळ उघड्या भांड्यातील मांसावर माश्या बसल्या आणि अळ्या तयार झाल्या.

या प्रयोगामुळे जीवशास्त्रात नियंत्रित प्रयोग पद्धतीची संकल्पना रुजू झाली.रेडी यांनी विषारी सापांच्या विषावरही संशोधन केले आणि परजीवीशास्त्र क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. रेडी यांनी पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची पद्धत विकसित केली, ज्यामुळे त्यांना आधुनिक जीवशास्त्राचे पायाभूत शास्त्रज्ञ मानले जाते.



## विविध वृत्त...

### दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या ओद्योगिक रसायनशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल

**लातूर :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील औद्योगिक रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नॅचरल शुगर व अलाईड प्रॉडक्ट रांजणी,जिल्हा धाराशिव येथील साखर कारखाना व नॅचरल दुध डेअरीला शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी भेट दिली.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिध्देश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल आयोजित करण्यात आलेली होती. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी ऊसापासून साखर निर्मिती व इतर घटक जसे की, विजनिर्मिती, सी. एन. जी, बायोगॅस, इथेनोल निर्मिती कश्या प्रकारे होते ते पाहिले व तसेच तेथील वेगवेगळ्या युनिटला भेट दिल्ली. त्यामध्ये बॉयलर, क्रीस्टलायझेशन प्रोसेस,इवॅपोरेशन आणि अल्कोहोल निर्मिती कशाप्रकारे होते, बायोगॅसचा वापर करुन प्रदुषणावर नियंत्रण व त्याच्या बायप्रॉडक्टचा वापर करुन गंधकयुक्त खते निर्मिती यामुळे इतर रासायनिक खताचा वापर व त्यावर होणारा पैशाचा अपवय टाळता येतो. ही खते शेतकऱ्यांना खुप कमी दरामध्ये देऊन शेतकऱ्यांचा विकास करता येऊ शकतो,त्याचेही महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या सहलीसाठी नॅचरल शुगरचे संचालक बी.बी.ठोंबरे तसेच औद्यौगिक रसायनशास्त्र विद्यार्थी मंडळाचे सर्व पदाधिकारी, सांळुके भक्ती, सायली क्षीरसागर, अंकिता जाधव, जाधव बळवंत, काळे प्रेरणा, दाताळ साक्षी, पाटील प्रांजली, बाचपल्ले ऋशिकेष,व शिंदे मॅडम, रवी बाजपाई यांनी परिश्रम घेतले.

### तुळजाभवानी प्राथमिक विद्या मंदिरला मूल्यांकनात अ+ श्रेणी

**लातूर :** महाराष्ट्र शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची 'एसक्यूएएएफ'ची निर्मिती करण्यात आली होती. या मूल्यांकनात राज्यातून अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळ, रोहिणा द्वारा संचलित लातूरच्या तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला अ+ श्रेणी प्राप्त झाली आहे. तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरने या मूल्यांकनात लातूर जिल्ह्यात पहिला मान मिळविला आहे. २०२४-२५ मध्ये राज्यातील १०२६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. यानुसार राज्य शैक्षणिक मूल्यांकन पथकाद्वारे शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी व पडताळणी करण्यात आली होती. यानुसार स्वयंमूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांपैकी २०२५ व २६ या वर्षात १०७१२ शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात येऊन त्यापैकी १०६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र शासन निर्णयातील क प्राधिकरणाची कार्यपध्दती व कार्य यामध्ये बाह्य मूल्यांकनासाठी त्रयस्थ पक्षाद्वारे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यांच्या मूल्यांकनानंतर मिळालेल्या श्रेणीमध्ये लातूर जिल्ह्यातून प्रथम अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळ, रोहिणा द्वारा संचलित लातूरच्या तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला अ+ श्रेणी प्राप्त झाली आहे. तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिराचे शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याचे काम मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी

**लातूर:** महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने दरवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. याप्रसंगी शिवशाहीर निशिगंधा संतोष साळुंके यांचा आम्ही जिजाऊंच्या लेकी हा शिवचरीत्र पांवाडे व स्फुर्ती गितांचा कार्यक्रम साजरा झाला. तत्पुर्वी परिमंडल कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते शासकीय इतमामात शिवजयंती साजरी करण्यात आली. विद्युतभवन येथे संपन्न झालेल्या शिवजन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी उपस्थित राहिलेले मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, कार्यकारी अभियंता सर्वश्री अनिरूध्द घाटगे, सुबोध डोंगरे, नागेश देशमूख, रविंद्र महाव्दार, सतिश कुलकर्णी, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष सुनिल कापसे यांच्या प्रमूख उपस्थितीत संपन्न झालेल्या शिवजयंती उत्सवात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून तमाम भारतीयांना आत्मभान दिले. गुलामीचे जीवन जगणाऱ्या मराठी माणसांच्या मना-मनात स्वराज्याचे स्वप्न धगधगत ठेवून स्वाभिमान जागवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. सर्वगुणसंपन्न अशा या कल्याणकारी राजाचे नाव घ्यायचे असेल तर त्यांच्यासारखे गुण अंगी बाळगून दैनंदिन आचरणात आणावे असे विचारही मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले.

### व्हर्व्ह २०२५-२६ : 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ट्रॉफीचे अनावरण उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'व्हर्व्ह २०२५-२६' अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ट्रॉफीचे अनावरण उत्साहात पार पडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम. मान्नीकर यांच्या हस्ते या ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सहा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्विझ, ॲप्टिट्यूड ॲबिलिटी, टॅली टॅलेंट हंट, ॲड-ओ-मेनिया आणि बेस्ट आऊट ऑफ वेस्ट या स्पर्धांचा समावेश आहे.

## श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त
# २६ आणि २७ फेब्रुवारीला पशुपक्षी, अश्व-श्वान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त यात्रा समिती, जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व लातूर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय परिसरात २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पशुपक्षी प्रदर्शन आणि २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अश्व व श्वान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यासाठीची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत करण्यात येणार असून त्यानंतर निवड प्रक्रीया करण्यात येईल, असे लातूर पंचायत समितीमार्फत कळविण्यात आले आहे.



पशु प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांचे स्वास्थ दाखला प्रमाणपत्र घ्यावे. पशुप्रदर्शनातील सहभागी पशुधनांच्या कानात १२ अंकी पशु आधार नंबर असणे बंधनकारक राहील. पशुधन व श्वान, अश्व गटांची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंतच केली जाईल. कुठल्याही परिस्थितीत सकाळी ११ वाजल्यानंतर पशुधनाची नाव नोंदणी केली जाणार नाही. सकाळी ११ ते दुपारी ३ वा.पर्यंतची वेळ पशुधन निवडीसाठी राखीव राहील. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम, द्वितीय, तृतीय व ग्रेड नुसार अ, ब, क, ड अशा प्रकारे बक्षिस वितरीत करण्यात येईल. प्रत्येक गटात १० पशुधनाचा सहभाग बंधनकारक राहिल अन्यथा तो गट होणार नाही व त्या गटातील पशुधनास ग्रेड प्रमाणे अ, ब, क, ड या प्रमाणे बक्षिस वाटप करण्यात येईल.

सहभागी पशुपालकांना बक्षिसाची रक्कम संगणक प्रणाली आरटीजीएसद्वारे अदा करण्यात येईल. त्यासाठी नोंदणी करताना आधार कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत बक्षिसाची रक्कम रोख स्वरुपात दिली जाणार नाही. पशुपालकांनी आपले बहुमुल्य पशुधन व्यवस्थित दोरखंडाने बांधून आपल्या जबाबदारीने ठेवावे. निवड प्रक्रिया पारदर्शक असून निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. निवड समिती अधिकारी, कर्मचारी यांच्याशी हुज्जत अथवा वाद घालणे, यासारखा अनुचित प्रकार आढळल्यास संबंधित पशुपालकाची नोंदणी रद्द करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत सर्वोत्तम पशुधन (चॅम्पियन) निवडला जाणार नाही, असे लातूर पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. जे. पी. वाघमारे यांनी कळविले आहे.

### प्रशु प्रदर्शनामध्ये खालील प्रमाणे गट स्थापन करण्यात येतील

देवणी नर गट- देवणीनर १ वर्षाखालील वासरे, देवणीनर १ वर्षावरील वासरे, देवणीनर २ दात वळू, देवणीनर ४ दात वळू, देवणीनर ६ दात वळू.

देवणी मादी गट- देवणी मादी १ वर्षाखालील वासरे, देवणी कालवड १ वर्षावरील, देवणी गाभण कालवड, देवणी गाभण गाय, देवणी दुधाळ गाय.

लाल कंधारी नर गट- लालकंधारी नर १ वर्षाखालील वासरे, लालकंधारी नर १ वर्षावरील वासरे, लालकंधारी नर २ दात वळू, लालकंधारी नर ४ दात वळू, लालकंधरी नर ६ दात वळू.

लाल कंधारी मादी गट- लालकंधारी मादी १ वर्षाखालील वासरे, लालकंधारी कालवड १ वर्षावरील, लालकंधरी गाभण कालवड, लालकंधारी गाभण गाय, लालकंधारी दुधाळ गाय.

संकरीत मादी गट- संकरीत मादी १ वर्षाखालील वासरे, संकरीत कालवड १ वर्षावरील, संकरीत गाभण गाय, संकरीत दुधाळ गाय.

म्हैस गट- नर, मादी, अश्व गट नर अदात, २ दातावरील. अश्व मादी गट- अदात, २ दातावरील. श्वान गट- प्रजातनिहाय कुक्कुट गट- देशी कोंबडी विदेशी कोंबडी उस्मानाबादी शेळी गट- तीन पिल्ले व त्यावरील पिल्लांची उस्मानाबादी शेळी.

### शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थाध्यक्ष डॉ.एम.आर. पाटील सर व उपाध्यक्ष श्री एल.एम. पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळेचे प्राचार्य श्री एल. टी. पुरी सर यांच्या नियोजनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे, पोवाडे व पाळणा गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य श्री लक्ष्मण पुरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती शौर्य आणि स्वाभिमानाची भावना जागृत झाली. कार्यक्रमास माध्यमिक,प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयीका मानसी पाटील, अश्विनी पवारव वर्षा कांबळे, श्री.रोहित जाधव व मीनाक्षी सूर्यवंशी, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी शिवरायांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला. अशा प्रकारे शिवजयंती उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

### दयानंद विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** दयानंद विधी महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचा शुभारंभ मौजे भोईसमूद्रा येथे उत्साहात करण्यात आला.

''शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास'' या ब्रिदवाक्याखाली २५ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या शिबिरात विविध सामाजिक, कायदेविषयक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते हणमंत गायकवाड व तंटामुक्ती अध्यक्ष रावसाहेब गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच महाविद्यालयातील प्रा. शितल घुटे व प्रा. अतिश तिवारी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सात दिवसीय शिबिरातील उपक्रमांची रूपरेषा सादर करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. पुनम नाथानी आणि प्रा. उमेश काटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत शिबिर यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

शिबिरातील प्रमुख उपक्रम : अग्निशमन व आणीबाणी सेवा मार्गदर्शन, पर्यावरण संरक्षण, मानवी हक्क जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी शिबीर, डिजिटल साक्षरता अभियान, करिअर मार्गदर्शन, समाज प्रबोधनपर कीर्तन, मतदान जनजागृती, वृक्षारोपण तसेच पशुवैद्यकीय शिबीर यांसारखे विविध उपक्रम सात दिवसांत राबविण्यात येणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून गावकऱ्यांना शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळणार असून ग्रामस्थांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

## अभ्यासपूर्वक गुंतवणूक केल्यास फायदेशीर : डॉ. रूपा गिल्डा

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शेअर बाजार गुंतवणुकीवर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बँकिंग अँड इन्शुरन्स समितीच्या वतीने स्टॉक मार्केट बेसिक्स टू लाईव्ह ट्रेडिंग : अ हँड्स-ऑन वर्कशॉप या विषयावर बुधवारी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने होते.

साधन व्यक्ती म्हणून डॉ. रूपा गिल्डा यांनी विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बँकिंग अँड इन्शुरन्स समितीचे



समन्वयक डॉ. निखिल व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. गिल्डा यांनी सांगितले की, अभ्यासपूर्वक आणि संयमाने गुंतवणूक केल्यास शेअर बाजार अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विविध कंपन्यांवर होणारा परिणाम समजून घेणे गरजेचे असून, कंपन्यांचे ताळेबंद आणि आर्थिक अहवाल तंत्रशुद्ध पद्धतीने अभ्यासणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्यक्ष व्यवहार (लाईव्ह ट्रेडिंग) करताना जोखीम व्यवस्थापनाचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंका उपस्थित केल्या. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील मूलभूत संकल्पना आणि प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळाले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. निखिल व्यास, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी तसेच प्रशासकीय कर्मचारी राजकुमार माने यांनी परिश्रम घेतले.

# शिवजयंती निमित्त शिऊरकरांना दिले 'जीवन'

### ➤ गावाला दिली विंधन विहिर भेट ➤ शिवप्रतिष्ठानच्या तरुणांचा स्तुत्य उपक्रम ➤ संगमेश्वर शिक्षण मंडळ व युवा उद्योजकाने केले अन्नदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** शिवजयंती म्हटले की जल्लोष, डीजेचा आवाज, मिरवणूका, मोटारसायकल रॅली पण निलंगा तालुक्यातील शिऊर गावात शिऊर गावात एक आगळा वेगळा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवविण्यात आला आहे. पाणी प्रश्न लातूर जिल्ह्यात सातत्याने गंभीर असतो. पाणी हे जीवन आहे.. याचे सामाजिक भान ठेवून शिवप्रतिष्ठानने शिवजयंती निमित्त शिऊर गावात विंधन विहीर घेऊन ती गावाकऱ्यांना गिफ्ट केली. विशेष म्हणजे या विंधन विहिरीला चक्क ४ इंच इतके पाणी लागले आहे. त्यामुळे शिऊरकरांना ' जीवन' मिळाले आहे. उन्हाळ्यातल्या पाणी टंचाईवर त्यांना आता मात करता येणार आहे.

यावेळी संगमेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे आशिष शिवराज आष्टुरे आणि युवा उद्योजक गोपाळ पाटील यांनी गावकऱ्यांना अन्नदान करून छत्रपती



शिवरायांचा जयघोष करीत शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला. विंधन विहिरीतून येणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्यामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. निलंगा तालुक्यातील शेवटचे टोक म्हणजे शिऊर गाव. येथील शिवप्रतिष्ठान नव-तरुण मंडळाने' यंदा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मिरवणुकीवर होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळून मंडळाने गावात पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर खोदून गावाची तहान भागवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे.

शिवजयंतीच्या या अनोख्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. शिवप्रतिष्ठानच्या तरुणांनी कुठलाही बडेजाव टाळून समाजहिताला प्राधान्य दिले आणि सामाजिक बांधिलकी जोपासली.- दरवर्षी मंडळाच्या वतीने मिरवणुकीवर मोठा खर्च केला जायचा. मात्र, यंदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत 'डीजे'च्या तालावर नाचण्यापेक्षा ग्रामस्थांची तहान भागवायचा निर्णय घेतला. शिवजयंती उत्सवाचा निधी गोळा करून गावात एका मोक्याच्या ठिकाणी विंधन विहीर खोदण्यात आली. या विंधन विहीरीचे भूमिपूजन भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त ले.कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. शोर्य चक्र व सेना पदक मिळा-लेले ले. कर्नल सचिन रांडळे आणि कीर्ती चक्र पदक विजेते सुभेदार संतोष राळे यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दोन्हीही लष्कर अधिकाऱ्यांनी शिऊरच्या तरुणाचे सदर उपक्रमाबद्दल कौतुक केले.

सुभेदार संतोष राळे यांनी सैन्यातील आपले अनुभव कथन करून त्यांनी व



त्यांच्या टीमने १८ अतिरेक्यांचा कसा खात्मा केला ते विशद केले. त्यांचे प्रेरणादायी असे भाषण झाले. केवळ एक दिवसाचा उत्सव न करता गाव-ाला कायमस्वरूपी पाण्याची सोय करून दिली. ध्वनी आणि वायू प्रदूषणाला पूर्णपणे फाटा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित जपले, तोच वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न या गावचा तरुण वर्ग करत आहे.

# अंबुलगा साखर कारखान्याचा विस्तार; गाळप क्षमता दुप्पट अन् १५० केएलपीडी डिस्टिलरीला मंजुरी

## निलंगा विधानसभेचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रयत्नांना यश; केंद्र सरकारचा हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा/श्रीशैल्य बिराजदार**
**निलंगा, दि. २२ फेब्रुवारी :** निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. येथील डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार साखर कारखाना प्रा. लि. च्या विस्तारीकरणाला केंद्र सरकारकडून अधिकृत मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे कारखान्याची गाळप क्षमता आता दुप्पट होणार असून, नवीन १५० केएलपीडी डिस्टिलरी प्रकल्पालाही मंजुरी मिळाल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला या निमित्ताने यश आले आहे.

**पर्यावरण मंत्रालयाकडून 'ईसी' प्राप्त**

कारखान्याने सादर केलेल्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावावर पर्यावरण तज्ज्ञ मूल्यमापन समिती (ईएसी) आणि केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने सकारात्मक निर्णय घेतला आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी या प्रकल्पाला पर्यावरणीय मंजुरी (ईसी) प्रदान करण्यात आली आहे.

विस्तार योजनेनंतर कारखान्याचे स्वरूप पूर्णतः बदलणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.दैनंदिन २५०० मे. टनावरून आता ४८०० मे. टन ऊस गाळप होणार.




१५० किलोलीटर प्रति दिन (केएलपीडी) क्षमतेचा बहुखाद्य आसवनी डिस्टलेरी प्रकल्प उभारला जाणार. यात सी-मोलॅसिस, बी-हेवी मोलॅसिस, उसाचा रस आणि धान्याचा वापर करून इथेनॉल निर्मिती करता येईल.

सह-वीजनिर्मिती: १८ मेगावॅट क्षमतेचा नवीन को-जनरेशन प्रकल्पही कार्यान्वित होणार आहे.

**शेतकऱ्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार!**

निलंगा विधानसभा मतदारसंघातील उसाचा प्रश्न गेल्या काही काळापासून गंभीर होता. मात्र, आता कारखान्याची क्षमता दुपटीने वाढल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर गाळपाची खात्री मिळणार आहे. कारखाना पूर्ण क्षमतेने चालणार असल्याने शेतकऱ्यांनी आता उसाच्या गाळपाबाबत चिंता करण्याची गरज नाही, असे कारखाना प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या विस्तारीकरणामुळे केवळ गाळप वाढणार नाही, तर उपपदार्थांच्या निर्मितीतून कारखान्याची आर्थिक स्थिती भक्कम होईल. याचा थेट फायदा सभासद आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे.

# एसटी महामंडळाच्या मनमानीमुळे प्रवाशांना त्रास

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. २२ फेब्रुवारी :** लातूर मधील अंतर अवघे वीस किलोमीटर मुळे औशातील ऐंशी टक्के लोक लातूरला विविध कामासाठी, कॉलेजसाठी, खरेदीसाठी आणि नोकरी साठी लातूरला येत असतात.

बसचा विचार केलातर सकाळी औशावरून दहा पर्यंत बस आहेत त्यानंतर बसचा ओघ कमी कमी होत जातो. बसस्थानक वाले सरळ सांगतात की, नवीन बससॅन्डवर जावा. नवीन बसस्थानकावर सुद्धा बस मिळत नाही नाईलाजाने मोडवर जावे लागते. तेथेही बस जेमतेमच असतात. त्यात निलंगा, सोलापूर आणि उमरगा येथून येणाऱ्या यांचा समावेश होतो. कधीकधी चा बस मोडवर थांबत नाहीत. अशावेळी खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. हा प्रकार औशावरून लातूरला येण्यासाठी करावा लागतो.लातूरवरून औशाला जाण्यासाठी कसरतच करावी लागते कारण साधारणपणे साडेसात वाजताची किनगाव औसा ही बस सोडली तर औसा आगाराची बस नाही. ज्या चुकारू किंवा लांब पल्ल्याच्या बस मिळतात पण दररोज नाही. त्यामुळे औशाच्या प्रवाशां वर अन्याय होतो आहे.



औसा आगाराची बस लातूर सोलापूर धावते पण या बसमध्ये औशाचे प्रवाशी घेतले जात नाहीत. कारण विचारले असता ही जादा बस असल्याने औसा मोडवर सुद्धा थांबत नाही . निलंगा आणि उमरगा ह्या बस औसा मोड वर थांबतात. तेथून रिक्षा ने खाली जावे लागते. हा आर्थिक नुकसान प्रवाशांना सहन करावे लागत आहे.

आगार प्रमुखानी औसा ते लातूर या दरम्यान किमान चार बसची व्यवस्था केली तर दर पंधरा मिनिटानी एक बस सोडली तर प्रवाशांचा सोय होईल आणि लातूर वरून औशाला जाण्यासाठी रात्री किमान नऊ वाजेपर्यंत सोय होईल. त्यामुळेऔसा आगार प्रमुखानी यावर उपाय योजना करावी असे प्रवाशांचे मत आहे.

## जि. प. अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २२ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीची जिल्ह्यातील नागरिकांना उत्सुकता लागून राहिली असून, जिल्हाधिकारी कधी निवडणूक लढविलेल्या राजकीय पक्षांना अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीचे निमंत्रण देतात, याकडे लक्ष लागले आहे. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी झाली. मतमोजणीनंतर आठ दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांनी निवडून आलेल्या मोठ्या पक्षास अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीचे निमंत्रण द्यायला हवे होते.

सध्या जिल्हा परिषदेतील अधिकारी-कर्मचारी पदाधिकारी निवडीची तारीख कधी येते, याची वाट पाहात आहेत. सध्या काँग्रेस मोठा पक्ष असला तरी बहुमताचा आकडा गाठणे अवघड आहे. भाजप आणि राष्ट्रवादी (अ. प.) पक्षांनी मैत्रीची भूमिका पार पाडली तर अध्यक्ष, उपाध्यक्ष या दोनी पक्षाचा होऊ शकतो. सध्या फारशा हालचालीही दिसत नाहीत. मात्र, काही तरी फॉर्मूला ठरला असणार; परंतु, अजून बाहेर आलेला नाही. लवकर काही तरी भाजप-राष्ट्रवादी मैत्रीचा धर्म पाळतील, अशी चर्चा आहे.

# शिवनेरी महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूरअनंतपाळ, दि. २२ फेब्रुवारी :** १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिरूरअनंतपाळ येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राजनारायण बिरादार उपस्थित होते, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धालगडे सर यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रभावी भाषणे केली. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या शौर्य, स्वराज्य स्थापनेतील कार्य आणि लोककल्याणकारी धोरणांचा गौरवपूर्ण आढावा घेतला.




प्रा. डॉ. नारायण सूर्यवंशी यांनी आपल्या मनोगतातून शिवाजी महाराजांचे चरित्र उलगडून सांगितले. तरुणांनी महाराजांच्या विचारांचा आणि आचाराचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. शिवाजी महाराजांमुळेच मला इतिहासाची आवड निर्माण झाली आणि पुढे मी इतिहासाचा प्राध्यापक झालो. इतिहास हा सत्याच्या शोधासाठी अभ्यासला पाहिजे, इतिहासातील सत्याचा शोध घेत असताना. माझ्याकडून डॉक्टरेट कधी झाली हे माझ्या लक्षात सुद्धा आले नाही. असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचा किमान एक तरी गुण आपल्या अंगी बाणवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. अमोल लाटे यांनी शिवाजी महाराजांच्या पर्यावरण विषयक धोरणांवर सविस्तर माहिती देत त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचा परामर्श घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हालसे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अभिषेक घुमरे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच तिन्ही शाखांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी इतिहास विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले.

# वलांडीत महिलांना उद्योग उभारणीचे धडे; ब्युटी पार्लर क्षेत्रात करिअरच्या संधी

## आत्मनिर्भर व्हा, कुटुंबाचा आधार बना : सरपंच राणीताई भंडारे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी , दि. २२ फेब्रुवारी :** ग्रामीण भागातील महिलांनी केवळ चूल आणि मूल यात मर्यादित न राहता स्वतः चा लघुउद्योग सुरू करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे. विशेषतः ब्युटी पार्लरसारख्या क्षेत्रातून महिलांना उत्तम करिअर करण्याची संधी उपलब्ध असून, वलांडीतील महिलांनी या संधीचा लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हावे, असे आवाहन सरपंच राणीताई भंडारे यांनी केले.

वलांडी येथे आशाराणी मेक ओव्हर ब्युटी पार्लरच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. ग्रामीण भागातील महिलांमध्ये कौशल्य असूनही मार्गदर्शनाअभावी त्या मागे राहतात, ही बाब लक्षात घेऊन या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

ब्युटी पार्लर: एक शाश्वत व्यवसाय

कार्यक्रमात बोलताना सरपंच भंडारे म्हणाल्या की, बदलत्या काळानुसार सौंदर्य प्रसाधने आणि ब्युटी पार्लर व्यवसायाला मोठी मागणी आहे. हा व्यवसाय कमी भांडवलात घरबसल्या सुरू करता येतो. महिलांनी केवळ प्रशिक्षण घेऊन थांबू नये, तर त्याचे व्यावसायिक रूपांतर करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावावा. ग्रामपंचायत स्तरावरूनही महिला उद्योजकांना आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन: शिबिरात अनुभवी प्रशिक्षकांनी ब्युटी पार्लरमधील विविध बारकावे, स्किन केअर, हेअर स्टाईल आणि मेकअप याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

शासकीय योजना: महिलांना उद्योग उभारण्यासाठी बँकांकडून मिळणारे कर्ज आणि शासकीय सबसिडी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सुलोचना बोडके, महादेवी नागलगावे,गंगा पांडे, शिल्पा टवानी, श्र्वेता बिरादार, मीनाताई सोनकवडे, आयोजक अशा राणी नागलगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सहभाग: वलांडी व परिसरातील गरजू महिला आणि युवतींनी या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला बचत गटाच्या प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# विकासकामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही- आ. अभिमन्यू पवार

## - विकासाचा ॲक्शन प्लॅन'- ३ वर्षांत १००% शेतरस्त्यांचे मजबुतीकरण - शहर कामांना वेग देण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. २२ फेब्रुवारी :** औसा मतदारसंघातील प्रलंबित शेतरस्ते, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा तसेच शहरातील विकासकामांचा वेग वाढवण्यासाठी औसा तालुका व कासार सिरसी मंडळाशी संबंधित विभागप्रमुखांची व्यापक प्रशासकीय बैठक झाली. या बैठकीत विविध विभागांच्या मंजूर व प्रलंबित कामांचा सखोल आढावा घेत ठोस कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले. विकासकामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही,असा स्पष्ट इशारा आ.अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिला असून दर्जेदार व वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

औसा येथे विकासकामांना गती देण्यासाठी बैठक झाली.उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसिलदार घनशाम अडसुळ, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील चौधरी, पोलिस निरिक्षक रेवनाथ ढमाळे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत,पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. सुनिश्रि्चत कार्यप्रणालीनुसार अडवलेली किंवा अपूर्ण राहिलेली कामे तातडीने मार्गी लावावीत, तांत्रिक व प्रशासकीय अडचणी तत्काळ दूर कराव्यात, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले. मंडळनिहाय २५-२५ किलोमीटरचे क्लस्टर तयार करून प्रस्ताव सादर करावेत. ज्या रस्त्यांचे मातीकाम पूर्ण झाले आहे. अशा रस्त्यांना प्राधान्यक्रम द्यावा. असे स्पष्ट करण्यात आले.

पुढील तीन वर्षांच्या कालावधीत नकाशावरील व संमतीतील १०० टक्के शेत,पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करुन १०० टक्के शिवरस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक व टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणारा विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामीण भागातील शेतीमाल वाहतूक सुलभ होणे, शेतकऱ्यांचा खर्च कमी होणे आणि गावोगाव संपर्क सुधारणा होणे या उद्देशाने हे नियोजन प्रभावीपणे राबवावे.अशा सुचना संबंधितांना यावेळी देण्यात आल्या आहेत.



जिल्हा परिषद शाळांबाबतही बैठकीत विशेष चर्चा झाली. शाळांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवीन इमारतींचे बांधकाम, स्वच्छतागृहांची उभारणी, संरक्षण भिंती, किचन शेड उभारणीसाठी तातडीने प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सौरऊर्जा सुविधा, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आदी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे. अशी सूचना करण्यात आली.प्रशासकीय दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेत १ मे पासून किल्लारी अपर तहसीलदार कार्यालय तात्पुरत्या जागेवरून नियमितपणे कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. नागरिकांना शासकीय सेवा वेळेत व सुलभतेने मिळाव्यात, हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

औसा शहरातील प्रलंबित कामांचाही आढावा घेण्यात आला. औसा-उंबाडगा रस्ता तसेच औसा टी-पॉइंटपासून शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यालगतच्या नालीकामास तातडीने सुरुवात करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे.असे स्पष्ट करण्यात आले. शहरातील वाहतूक सुलभता, पाणी निचरा व्यवस्था आणि नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात आला.या बैठकीदरम्यान कृषी, महसूल, वन, मृद व जलसंधारण, महिला व बालकल्याण, आरोग्य, जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मंजूर विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागाने आपापल्या कामांची सद्यस्थिती, निधी उपलब्धता, तांत्रिक बाबी आणि पूर्णत्वाची कालमर्यादा यांची माहिती सादर केली. आवश्यक त्या ठिकाणी समन्वय वाढवून कामे गतीमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### प्रशासनाने जबाबदारीने काम करावे- आ. अभिमन्यू पवार

नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करावे, असे निर्देश आमदार पवार यांनी दिले.औसा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# संक्षिप्त...

## एकाच वेळी दोन पेटंट्स प्राप्त करत डॉ. बालाजी कळंबे यांची दुहेरी कामगिरी

**लातूर :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. बालाजी गुरुनाथ कळंबे यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत सलग दोन डिझाइन नोंदणी प्रमाणपत्रे मिळवली आहेत. भारत सरकारच्या द पेटंट ऑफिस, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कडून त्यांच्या नावावर दोन स्वतंत्र डिझाइन्सची नोंदणी करण्यात आली आहे.



बँकिंग ऑपेरेशन्स मल्टि-अकाउंट मॅनेजमेंट डिव्हाईस आणि डिव्हाईस फॉर ऑटोमॅटेड डिटेक्शन ऑफ फ्राऊडलेंट फायनान्सिल ट्रांज्यशन यांचा समावेश आहे. ही दोन्ही डिझाइन्स बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील तांत्रिक कार्यक्षमता वाढविणे, बहुखाती व्यवस्थापन सुलभ करणे आणि फसवणूक व्यवहारांचे स्वयंचलित निदान करण्यास उपयुक्त ठरणाऱ्या संकल्पनांवर आधारित आहेत. डिजाईन्स ॲक्ट २००० व नियम २००१ अंतर्गत ही नोंदणी मान्य करण्यात आली आहे.

डॉ. कळंबे हे दयानंद वाणिज्य महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून त्यांच्या नावावर आता एकूण १० पेटंट्स नोंदणीकृत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी संशोधन निबंध सादर केले असून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचा कार्याचा आलेख सातत्याने उंचावत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी पीएचडीचे संशोधन पूर्ण करत आहेत, ही बाबही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

बँकिंग क्षेत्रातील डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि फसवणूक प्रतिबंध यांसारख्या संवेदनशील विषयांवर केंद्रित ही कामगिरी लातूर जिल्ह्यासह मराठवाडा विभागासाठी प्रेरणादायी ठरली आहे. उद्योगशिक्षण क्षेत्रातील दुवा मजबूत करण्यासाठी अशा संशोधनाची मोठी गरज असताना डॉ. कळंबे यांनी केलेले योगदान उल्लेखनीय मानले जात आहे. महाविद्यालय प्रशासन, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले असून, भविष्यातही अशाच नावीन्यपूर्ण संशोधनातून राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचा गौरव वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## शिव जयंतीनिमित्त शिवव्याख्यान संपन्न

**अहमदपूर :** सावरगाव थोट येथे शिवाई प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त दि. १९ फेब्रुवारी रोजी हनुमान मंदिर येथे शिवव्याख्यान घेण्यात आले. या कार्यक्रमात व्याख्याते प्रा. डॉ. प्रशांत बिरादार यांनी 'शिवाजी महाराजांचे शिवविचार आजच्या काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी रावसाहेब पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून विजयकुमार किलचे, साहित्यिक रमेश भालेराव, विजय पवार व संगम पवार उपस्थित होते.



विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धांचे आयोजन करून विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमास गावातील शिवप्रेमी, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सूर्यकांत कोणाले तर सूत्रसंचालन बंडू शेळके यांनी केले. आभार दिनकर बडूरे यांनी मानले.

## सकल धनगर समाजाच्या वतीने नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. २२ फेब्रुवारी :** नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत धनगर समाजाचे निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा निलंगा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

निलंगा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्काराचा कार्यक्रम निलंगा येथील शासकीय विश्रामग्रहावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी निलंगा नगरपरिषद सदस्य सौ. राधिका मल्हारी पेठकर, स्वीकृत न.प. सदस्य प्रा. डॉ. गजेंद्र मधुकर तरंगे, कोकळगाव गणाचे पं. स. सदस्य सौ. जयश्री रत्नादीप घोडके, चिंचोली (स.) गणाचे पं.स. सदस्य सौ.सिंधू ग्यानबा हजारे, कासार सिरसी गणाचे पं. स. सदस्य विवेक भाऊराव कोकणे या नवनिर्वाचित सदस्यांचा सकल धनगर समाजाच्या वतीने सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच नगरपरिषद निवडणुकीत सौ. संगीता म्हेत्रे व वलांडी जि.प. गटातून निवडणुकीत सूर्यकांत भोसले यांनी निवडणूक रिंगणात उतरून रनांग गाजवले पण त्यांना प्रभावाचा सामना करावा लागला पुढील काळात पुन्हा जोमाने व उत्साहाने काम करावे यासाठी प्रोत्साहन म्हणून त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ. गिरीधर सूर्यवंशी तर प्रमुख म्हणून समाजाचे समाज भूषण ॲड गुंडेराव बनसोडे, व प्रमुख पाहुणे म्हणून चंदर मामा गोजरटे, सूर्यकांत भोसले, लक्ष्मण होळकर, दिनकर बिरादार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून नवनिर्वाचित सदस्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याच व्यासपीठावर नियोजित असलेल्या कासार सिरसी तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने मदनसुरी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी यांनी नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश सराटे यांनी केले, तर सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक झाटिंग अण्णा म्हेत्रे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी डॉ. सचिन अभंगे, नामदेव काळे, डॉ. बापूराव काळे यांच्यासहसकळ धनगर समाज बाधवांनी परिश्रम घेतले या वेळी तालुक्यातील समाज बांधवामोठ्या संख्याने उपस्थित होते.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## एनडीआरएफ-एसडीआरएफ पथकाकडून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ फेब्रुवारी -**

तालुक्यातील बारूळ येथे दि.१८ बुधवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर एनडीआरएफ व एसडीआरएफ पथकाच्या पुणे टीमतर्फे विविध आपत्ती व्यवस्थापन विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

अतिवृष्टीमुळे नदीला पूर आल्यास अडकलेल्या शेतकऱ्यांना दोरी, रस्सी, थर्माकोल, लाईफ जॅकेट आदी उपलब्ध साहित्याच्या साहाय्याने सुरक्षित बाहेर कसे काढावे, याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच साप चावल्यास घ्यावयाची खबरदारी, सीपीआर कसे द्यावे, आगीच्या प्रसंगी काय करावे तसेच आपत्कालीन व नॉन-इमर्जन्सी परिस्थितीत जखमींना सुरक्षित हलविण्याच्या पद्धती यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

कार्यक्रमात इन्स्पेक्टर राहुलकुमार रघुवंशी, हवालदार कदम सुरेश, बोराटे अर्जुन, इथापे महेश, मनोज कुंभार, सोमनाथ खामकर, तसेच भुरे महेश, पाटील दीपक, काटकर आदित्य, आवताडे गणेश, गायकवाड मिथुन, वाईंगडे रणजीत, डगले केशव, पावशे विश्वजीत, देविका मोरे, जुनमोनी कुर्मी, सुनील सैईद, खेडकर संदीप, रसोईया वासेकर नामदेव आदी उपस्थित होते.

# तुळजापूर तीर्थक्षेत्राचा कायापालट : ४३८ कोटींची निविदा जाहीर

### स्वप्नपूर्तीच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल : मार्च २०२८ पर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ फेब्रुवारी -**

कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी जगभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना आता जागतिक दर्जाच्या सुविधा मिळणार आहेत. तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत ४३८ कोटी ६९ लाख रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. हा प्रकल्प म्हणजे तुळजापूरला जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र बनवण्याच्या दिशेने पडलेले एक भक्कम पाऊल आहे. हा निर्णय म्हणजे स्वप्नपूर्तीच्या दिशेने पडलेले आणखी एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

महायुती सरकारने तुळजापूरच्या विकासासाठी एकूण १८६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यानुसार या निविदेतील कामात प्रामुख्याने भाविकांच्या मूलभूत गरजा आणि आधुनिक सोयीसुविधांवर भर देण्यात आला आहे.

हुडको एसटी स्टँड, आराधवाडी आणि घाटशीळ परिसरात मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात येणार आहेत. यामध्ये अत्याधुनिक भाविक सुविधा केंद्र, भव्य भक्त निवास, व्यावसायिक संकुल, मल्टीपर्पज हॉल आणि सुसज्ज पार्किंग व्यवस्थेचा समावेश असणार आहे. ही सर्व कामे पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, इच्छुक कंत्राटदारांना २ मार्च २०२६ पर्यंत निविदा सादर करता येणार आहे.

हा विकास आराखडा राबवताना स्थानिक नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेण्यात आले आहे.

भूसंपादनासाठी प्रचलित दरापेक्षा कितीतरी पटीने अधिक मोबदला दिला जाणार असून, एकूण निधीतील ३० टक्के रक्कम केवळ भूसंपादनासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे केवळ पर्यटनालाच नव्हे, तर स्थानिक तरुणांना शाश्वत रोजगार मिळण्यासही मोठी मदत होणार आहे.

### पुढील दोन वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दीष्ट : आ. राणादादा



येणाऱ्या काळात तुळजापूरच्या वैभवात भर टाकणारे काही विशेष प्रकल्प साकारले जाणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना देवी आशीर्वाद देत असतानाचे भव्य १०८ फूट उंचीचे शिवभवानी शिल्प, रामदरा तलाव परिसरात भव्य उद्यान, साऊंड अँड लाईट शो आणि वॉटरफ्रंटची कामे हाती घेण्यात येणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तुळजापूरचा कायापालट करण्याचे आपण पाहिलेले स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत आहे. मार्च २०२८ पर्यंत हा संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दर १५ दिवसांनी या कामाचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, प्रशासकीय स्तरावरही या कामाला आता मोठी गती मिळाली आहे.




# कळंबमध्ये कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर; बेकायदेशीर धंदे, छेडछाडीच्या घटनांत वाढ !

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२२ फेब्रुवारी -**

शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून बेकायदेशीर धंदे उघडपणे सुरू असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. रात्री आठनंतर महिला व मुलींना बाहेर फिरणे अवघड होत असल्याचे सांगितले जात असून रोडरोमिओंचा त्रास वाढल्याची तक्रार आहे.

अलीकडेच पोलिसांच्या उपस्थितीत दोन गटांत तुंबळ हाणामारी झाल्याची घटना ताजी असतानाच, कोणतेही ठोस कारण नसताना एका गायकाला पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या दोन्ही घटनांमुळे पोलिसांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात काही लॉजिंग आदी ठिकाणी अवैध धंदे सुरू असून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याची कुजबुज आहे.

जिल्ह्यात इतर ठिकाणी आवाज करणाऱ्या वाहनांवर व मालकांवर कारवाई झाली असताना कळंबमध्ये अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. शहरात भुरट्या चोऱ्या, मोबाईल चोरी, छेडछाड व साखळी चोरीच्या घटनांत वाढ झाल्याचे सांगितले जाते. मात्र तपास सुरू आहे या उत्तरामुळे अनेक नागरिक तक्रार देण्यास पुढे येत नसल्याचे चित्र आहे.

शहरातील काही चौकांमध्ये आणि पानटपऱ्यांवर मटका घेतला जात असल्याची चर्चा आहे. तसेच काही लॉजवर अवैध धंदे सुरू असल्याचीही माहिती पुढे येत आहे. काही दिवसांपूर्वी बसस्थानकासमोर एका पत्रकाराला पोलिसांनी दमदाटी केल्याचा तसेच दोन जणांना काठीने मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



दरम्यान, छेडछाडीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी नगराध्यक्ष सुनंदा कापसे यांनी पुढाकार घेतला होता. मात्र पुन्हा पूर्वीप्रमाणेच परिस्थिती निर्माण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही झिरो पोलिसांकडून वसुली होत असल्याची तक्रार वाहनधारकांकडून केली जात आहे.

शहरातील वाढती गुन्हेगारी, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि बेकायदेशीर धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवात नगरसेवकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ फेब्रुवारी -**

नळदुर्ग शहराच्या विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून काम सुरू असून मराठा गल्ली येथील डोम उभारणीसह विविध विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न असल्याचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले. ते शिवशाही तरुण मंडळाच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात बोलत होते.

दि.१७ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत शिवशाही तरुण मंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून दमयंती महिला शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुभद्रा मुळे व सुरेश हजारे उपस्थित होते.



प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

यावेळी काँग्रेस गटनेते मारुती खारवे, भाजप उपगटनेते तानाजी जाधव, नगरसेवक सुधीर पोतदार, प्रविण गायकवाड, किशोर नळदुर्गकर, ॲड. अरविंद बेडगे, स्वप्नील काळे तसेच नगरसेविका मिनाक्षी काळे, अपर्णा बेडगे, राणी सुरवसे, कमलबाई गायकवाड, सुमनबाई ठाकुर, मन्नाबी कुरेशी यांच्यासह सर्व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभद्रा मुळे यांनी केले. सूत्रसंचालन तानाजी जाधव यांनी, तर आभार प्रदर्शन प्रमोद जाधव यांनी मानले.

रात्री १० ते १२ या वेळेत शिवजन्मोत्सव पाळण्याचा कार्यक्रम पार पडला. मराठा गल्लीतील महिलांनी शिवजन्माचे पारंपरिक गीत सादर करून वातावरण भक्तिमय केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाचे अध्यक्ष शाम शिंदे, नवनाथ पवार, संतोष मुळे, युवराज जगताप यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# बारूळ महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगतदार मेजवानी

### राज्यभरातील कलाकारांचा सहभाग...

**तुळजापूर, दि.२२ फेब्रुवारी -**

तालुक्यातील बारूळ येथे महाशिवरात्रीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बारूळ महोत्सवात यंदा सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगतदार मेजवानी पाहायला मिळाली. ग्रामीण संस्कृतीचा ठेवा जपत आधुनिक सादरीकरणाची सांगड घालणारा हा महोत्सव परिसरातील नागरिकांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा सोहळा ठरला.

बारूळ प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १४ वर्षांपासून सातत्याने हा महोत्सव साजरा केला जात आहे. धार्मिक परंपरा आणि सांस्कृतिक जतन यांचा सुंदर मिलाफ येथे अनुभवायला मिळतो. यंदाचा दोन दिवसीय महोत्सव राज्यभरातील कलाकारांच्या दमदार सहभागामुळे विशेष ठरला.



नृत्यरात्रीच्या कार्यक्रमात मराठी व हिंदी गीते, भक्तिगीते, भावगीते तसेच पारंपरिक लावणीच्या ठेक्यावर सादर झालेल्या नृत्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तालबद्ध सादरीकरण, आकर्षक वेशभूषा आणि सुसंगत संगीत यामुळे प्रत्येक कलावंताने रंगमंचावर आपली वेगळी छाप उमटवली. प्रत्येक सादरीकरणानंतर टाळ्यांच्या कडकडाटाने परिसर दणाणून गेला.



पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, रायगड, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर आदी भागांतून आलेल्या स्पर्धकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. विविध जिल्ह्यांतील कलाकारांमुळे महोत्सवाला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त झाले. ग्रामीण भागातील मंचावर राज्याच्या कानाकोपऱ्यातील प्रतिभावंत एकत्र येणे, हीच या महोत्सवाची खरी ओळख असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

शिस्तबद्ध नियोजनामुळे कार्यक्रम वेळेत आणि सुरळीत पार पडला. महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना दाद दिली. स्थानिक तरुणांनी स्वयंसेवक म्हणून काम करत कार्यक्रमाच्या यशात मोलाची भूमिका बजावली.

बारूळ महोत्सवातील ही नृत्यरात्र गावाच्या सांस्कृतिक परंपरेचा अभिमान ठरली असून पुढील वर्षी अधिक भव्य आणि विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे.

> हा महोत्सव ग्रामीण भागातील नवोदित कलाकारांना त्यांच्या कला सादर करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून देतो आणि स्थानिक सांस्कृतिक परंपरा जपण्यास व पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यास मदत करतो. यामुळे समाजातील कला आणि संस्कृतीची जाणीव वाढेल तसेच ग्रामीण युवकांना त्यांच्या प्रतिभा विकसित करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.
>
> **- संयोजक, बारूळ प्रतिष्ठान**

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा ध्रुवताऱ्यासारखा अढळ आदर्श : डॉ. बिराजदार

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२२ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज हे उत्तम प्रशासक व प्रजाहितदक्ष राजा होते. महाराष्ट्राच्या प्रजेमध्ये श्रीमंती पाहणारा 'श्रीमंत योगी' म्हणून त्यांचे स्थान ध्रुवताऱ्यासारखे अढळ आहे. त्रैलोक्याला पुरून उरणारा तीन अक्षरी मंत्र म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, असे गौरवोद्गार जवाहर महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी काढले.

ते उमरगा तालुक्यातील चिवरी येथे शिवजयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, शिवाजी महाराज प्रजेची इतकी काळजी घेत की अगदी छोट्या गोष्टींकडेही त्यांचे बारकाईने लक्ष असे. दिवे मालवून, चुल विझवून झोपा; ठिणगी उडून गवत, कडबा जळून जनावरांचा चारा नष्ट होईल, दुधाविना लेकरं कशी वाढतील? अशा सूचनांतून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. राजाचे बळ साधेपणा, नैतिकता आणि शिस्त यात होते. ते निर्व्यसनी, परिमित आहार घेणारे होते. सर्वधर्मसमभाव, स्त्रीसन्मान, शेती व जलनीती, दुष्काळ निवारण आणि निर्यातीवरील नियंत्रण यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण कार्यांनी त्यांनी हिंदवी स्वराज्याची भक्कम पायाभरणी केली.

या व्याख्यानमालेचे आयोजन शिवजन्मोत्सव समिती, उमरगा चिवरी यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.एम.बी. बिराजदार व बसवेश्वर निसरगुंडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप. आप्पाराव जाधव होते. पोलीस पाटील महेश पाटील व विजयकुमार सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

## चोराखळी येथील जिल्हा परिषद शाळेत 'रोजनिशी लेखन' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ फेब्रुवारी -**

कळंब तालुक्यातील चोराखळी येथील सातवीपर्यंत १४४ पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांमध्ये लेखनकौशल्य विकसित व्हावे आणि विचार मांडण्याची सवय लागावी या उद्देशाने 'रोजनिशी लेखन' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

दररोज शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना दिवसभरातील अनुभव, शालेय घडामोडी, घरातील प्रसंग तसेच स्वतःच्या भावना रोजनिशीत लिहिण्यास प्रोत्साहन दिले जाते. सुरुवातीला काही विद्यार्थ्यांना लेखन करताना अडचणी येत होत्या; मात्र शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे आता विद्यार्थ्यांची लेखनशैली अधिक स्पष्ट आणि प्रभावी होत असल्याचे दिसून येत आहे. पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले असून मुलांच्या लेखनात झालेला सकारात्मक बदल जाणवत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

तसेच शिक्षक गाढवे जि. आर., भंडारे आर.बी., धडके डी.आर., गायकवाड ए.व्ही., ढगारे के.पी. यांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी मोलाचे ठरत आहे.

# सरपंच परिषदेच्या प्रयत्नांना यश; राज्य सरकारचा अध्यादेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ फेब्रुवारी -**

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीवरून सुरू असलेल्या वादाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. सरपंच परिषदेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर राज्य सरकारने सरपंच, उपसरपंच आणि सर्व सदस्यांच्या कार्यकारी समितीसंदर्भात अध्यादेश जारी केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून मुदत संपलेल्या अनेक ग्रामपंचायतींवर शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र राज्यातील सुमारे १४ हजार ग्राम पंचायतींसाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रशासक उपलब्ध करणे शक्य नसल्याचे सरपंच परिषदेचे म्हणणे होते.



सरकारचा हा निर्णय चुकीचा असल्याचा आरोपही परिषदेने केला होता.

सरपंच परिषदेच्या बैठकीत उपाध्यक्ष अरविंद दळवी (बुलढाणा) यांना नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर न्यायालयाने प्रशासक नियुक्ती रद्द करण्याचा निर्णय दिला.

पुढे सर्व पदाधिकाऱ्यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन १९९४ पासूनच्या सरपंच प्रशासक नियुक्तीबाबतचे पुरावे सादर केले. न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान मंत्री यांनीही सरपंच प्रशासक नियुक्तीची आवश्यकता स्पष्ट केली. न्यायालयाच्या सूचनेनुसार राज्य सरकारने अखेर सरपंच, उपसरपंच आणि सदस्य कार्यकारी समितीबाबत अध्यादेश जारी केला. या निर्णयामुळे राज्यातील सरपंचांना त्यांच्या गावात काम करण्याचा अधिकार पुन्हा मिळाला आहे.

या लढ्यात अरविंद दळवी, प्रदेशाध्यक्ष जितेंद्रराजे भोसले, प्रदेश कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर वायाळ, महिला प्रदेशाध्यक्ष जीनत सय्यद, प्रदेश सरचिटणीस प्रवीण रनबागुल, प्रदेश संघटक कोहिनूर सय्यद आदी पदाधिकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले.

सरपंच परिषदेने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांचे आभार मानले आहेत.

### गावांतील सामान्य जनतेला न्याय मिळणार!

सरपंच हा गावात राहणारा स्थानिक प्रतिनिधी असल्यामुळे तो गोरगरीब नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडविण्यासाठी सहज उपलब्ध असतो. स्थानिक विकासकामांना गती देण्यासाठी सरपंचांचे अस्तित्व महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. सरपंच परिषदेच्या सातत्यपूर्ण आणि संघटित संघर्षामुळे हा निर्णय शक्य झाला असून, गावपातळीवरील लोकशाही अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. हा विजय सर्व सरपंच परिषदेच्या सदस्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याचेही सांगण्यात आले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री तुळजाभवानी देवीस ७०.२५० ग्रॅम सोन्याचा हार अर्पण

### मंदिर संस्थानतर्फे रमेश पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ फेब्रुवारी -**

मुंबई येथील भाविक रमेश बाबुराव पाटील हे आपल्या कुटुंबासमवेत बुधवार, दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आले होते.

देवीवरील अपार श्रद्धा आणि भक्तिभावातून त्यांनी श्री तुळजाभवानी देवीस ७०.२५० ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार अर्पण केला.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने पाटील यांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा भेट देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, पुजारी तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.





## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. कानडे, रणवीर चव्हाण यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२२ फेब्रुवारी -**

अणदूर गणातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे व अणदूर गटातील पंचायत समिती सदस्य रणवीर चव्हाण यांचा ८-फार्मा ग्रुप च्या सदस्यांनी सत्कार केला. औषध क्षेत्रातील कार्यरत संघटना ८ फार्मा ग्रुपच्या वतीने, नूतन जि.प. सदस्य डॉ. जितेंद्र कानडे व पं.स. सदस्य रणवीर चव्हाण यांचा त्यांच्या निवडी प्रित्यर्थ सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शुभेच्छा देऊन अणदूर चा सर्वांगीण विकासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी फार्मा ग्रुपचे सदस्य अजय अणदूरकर, संजय जाधव, जीवन मोजगे, गोविंद शिंदे, सचिन कासार, हिराजी पाटील, महेश कार्ले, गुणवंत मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.



### स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहात आरोग्य साहित्य व फळवाटप

**धाराशिव, दि.२२ फेब्रुवारी -**

महाराज जयंतीनिमित्त आळणी, धाराशिव येथील निवासी स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहात मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती २०२६, धाराशिव आणि राजमाता जिजाऊ अखंड महिला मंडळ यांच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. समाजाचे आपणही काही देणे आहोत या भावनेतून बालगृहातील मुलींना आरोग्यपर संदेश देत टूथपेस्ट व फळांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन बालगृहातील शिक्षिका रेणुका कुदळे यांनी केले. यावेळी समितीच्या अध्यक्षा प्रणिता पाटील, सचिव डॉ. अस्मिता बुरुटे, तसेच राजमाता जिजाऊ अखंड महिला मंडळाच्या अध्यक्षा आनंदी पाटील व शशिकला गुंजकर उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी तारा मोरे, संध्या हवालदार, मीरा गपाट, अश्विनी शिंदे, सोनाली कोल्हे, वर्षा मोकासे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालगृहातील शिक्षिका रूपाली कांबळे यांनी केले.

# सोलापूर-धुळे महामार्गावर भीषण अपघात; तरुण-तरुणीचा जागीच मृत्यु

**चार दिवसांपूर्वी साखरपुडा... परीक्षेसाठी निघाले आणि दुर्घटना घडली... नव्या नात्यावर काळाने घातला घाला...**



मयत : अक्षय व अक्षया

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील चार दिवसांपूर्वीच साखरपुडा झालेल्या तरुण-तरुणीचा सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी पहाटे घडली. रत्नापूर पाटीजवळील वळणावर भरधाव कार येडशी टोल कमानीला धडकल्याने हा अपघात झाला. या दुर्दैवी घटनेमुळे वाशी तालुक्यासह परिसरात शोककळा पसरली आहे.

वाशी तालुक्यातील पारा येथील नामदेव शिनगारे यांचा मुलगा अक्षय नामदेव शिनगारे (वय २५) आणि इजोरा येथील सुनील चव्हाण यांची मुलगी अक्षया सुनील चव्हाण (वय २३, सध्या मुक्काम वाशी) यांचा रविवारी (दि.१५) मांजरसुंबा येथील कन्हेया मंगल कार्यालयात साखरपुडा पार पडला होता. दोन्ही कुटुंबांत आनंदाचे वातावरण असताना अवघ्या चार दिवसांतच या नव्या नात्यावर काळाने घाला घातला. मिळालेल्या माहितीनुसार, अक्षया हिला रविवारी लातूर येथे महापारेषणची परीक्षा होती. परीक्षेसाठी ती आणि अक्षय पहाटे वाशी येथून टाटा नेक्सॉन (क्र. एमएच २५/बीएफ ५०६४) या कारमधून लातूरकडे रवाना झाले होते. पहाटे सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास रत्नापूर पाटीजवळील वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.

भरधाव वेगात असलेली कार थेट येडशी टोलवेच्या कमानीला जाऊन जोरात धडकली. धडक इतकी भीषण होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाला. अपघाताची तीव्रता लक्षात घेता दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातात कारचा चालक अक्षय यादव सिरसट (वय २२) हा गंभीर जखमी झाला असून त्याला तत्काळ १०८ रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच



रत्नापूर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

चार दिवसांपूर्वी साखरपुडा झालेल्या या तरुण जोडप्याच्या अकाली मृत्यूमुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वाशी तालुक्यासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

आनंदाच्या उंबरठ्यावर असलेले हे नाते क्षणार्धात संपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## एसटी प्रवाशीही 'स्मार्ट'; आजपासून मिळणार 'एनसीएमसी' कार्ड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ फेब्रुवारी -**

२० फेब्रुवारी २०२६ रोजी तुळजापूर आगारात प्रवासी सेवेच्या आधुनिकीकरणाचा नवा टप्पा गाठण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि 'एबिक्स कॅश' यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड प्रोजेक्ट अंतर्गत स्मार्ट कार्ड नोंदणीचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला विभाग नियंत्रक अजय पाटील तसेच विभागीय वाहतूक अधिकारी संतोष कोष्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आगार व्यवस्थापक रामचंद्र शिंदे, आगार लेखाकार सुधीर बामणकर, वरिष्ठ लिपीक सागर सूर्यवंशी




व कर्मचारी नागू मसुते, जी.एम. घुगे, अमोल जाधव, विलास राठोड, बाळासाहेब मुगुटराव, एम.व्ही. सुरवसे उपस्थित होते. योजनांची वैशिष्ट्ये आणि प्रथम कार्डांची नोंदणी या कार्यक्रमात महामंडळाच्या दोन महत्त्वाच्या योजनांतर्गत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.

या सुविधेमुळे तुळजापूर तालुक्यातील प्रवाशांना आता डिजिटल पेमेंट आणि स्मार्ट कार्डचा वापर करून प्रवास करणे अधिक सोपे होणार आहे.

## तुळजापूर तालुक्यातील ५३ ग्रा.पं.च्या निवडणुका लांबणीवर

### विद्यमान सरपंचच प्रशासक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ फेब्रुवारी -**

नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर तात्काळ तुळजापूर तालुक्यातील ५३ मुदत संपलेल्या ग्राम पंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होईल, अशी अपेक्षा होती. मात्र सध्या सुरू असलेल्या परीक्षांमुळे निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकत नसल्याने या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर शासनाने २१ फेब्रुवारी रोजी महत्त्वाचे आदेश जारी करत मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींचे विद्यमान सरपंच पुढील सहा महिन्यांसाठी प्रशासक म्हणून कारभार पाहणार आहेत.

तुळजापूर तालुक्यातील जवळपास ५३ ग्रामपंचायतींची पंचवार्षिक मुदत नुकतीच संपली आहे. सुरुवातीला या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून ग्रामविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. मात्र शासनाच्या नव्या निर्णयामुळे विद्यमान लोकप्रतिनिधींनाच कारभाराची जबाबदारी देण्यात आली आहे.




स्थानिक स्वराज्य संस्थांवर शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती झाल्यास विकासकामांवर परिणाम होऊन कामे रखडण्याची शक्यता असते, असा अनुभव नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या बाबतीत यापूर्वी पाहायला मिळाला आहे.

त्यामुळेच शासनाने विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

या निर्णयामुळे तुळजापूर तालुक्यातील ५३ ग्रामपंचायतींच्या सरपंचांना एक प्रकारे संधीच मिळाली असून स्थानिक पातळीवरील विकासकामे सुरू ठेवण्यास गती मिळणार आहे.

## नरेंद्र मोदीचा 'मन की बात'चा १३१ वा भाग उत्साहात श्रवण

### पंतप्रधानांच्या संदेशाला सकारात्मक प्रतिसाद...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ फेब्रुवारी -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय संवादात्मक कार्यक्रम 'मन की बात'चा १३१ वा भाग दि.२२ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथे शहर भाजप कार्यालयात नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकारांनी एकत्रितपणे लाईव्ह ऐकला.




'मन की बात'च्या माध्यमातून पंतप्रधानांनी देशवासीयांशी विविध विषयांवर संवाद साधला. यावेळी नुकत्याच यशस्वीपणे पार पडलेल्या एआय परिषदेसंदर्भात गौरवोद्गार काढत देशाची जागतिक पातळीवर वाढत असलेली प्रतिमा अधोरेखित केली. तसेच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे आणि राष्ट्रहिताच्या विषयांवर मार्गदर्शन केले. येणाऱ्या सण-उत्सव काळात स्वदेशी वस्तूंचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. पवित्र रमजान महिन्याच्या प्रारंभाबद्दल तसेच होळी सणाच्या शुभेच्छा त्यांनी देशवासीयांना दिल्या.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, नगरसेवक दत्तात्रय दासकर, सुशांत भुमकर, बबन चौधरी, प्रविण गायकवाड, स्वप्नील काळे, पद्माकर घोडके, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, सुधीर हजारे, शिवाजी सुरवसे, अक्षय भोई, अनिल पाटील, उमेश नाईक यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोनेगाव येथे आमदार निधीतून 'स्वामी विवेकानंद अभ्यासिका'चे उद्घाटन



### ग्रामीण विद्यार्थ्यांना नवे व्यासपीठ...

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ फेब्रुवारी -**

कैलास बाळासाहेब घाडगे-पाटील यांनी विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान प्रत्येक गावात मंदिरांऐवजी अभ्यासिका उभारण्याचा संकल्प व्यक्त केला होता. त्या संकल्पाची पूर्तता करत सोनेगाव येथे आमदार निधीतून पहिली 'स्वामी विवेकानंद अभ्यासिका' उभारण्यात आली असून तिचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

स्पर्धा परीक्षांचे वाढते आव्हान आणि शहरांमध्ये जाऊन अभ्यास करण्याची गरज लक्षात घेता ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची मागणी होत होती. शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक मर्यादांमुळे शहरात राहून तयारी करणे कठीण जात होते. या पार्श्वभूमीवर गावातच सुसज्ज अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

अभ्यासिकेत प्रशस्त व स्वच्छ बसण्याची व्यवस्था, पुरेशी प्रकाशयोजना, वाचनासाठी अनुकूल वातावरण तसेच सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. नियमित देखभाल व स्वच्छतेची जबाबदारी स्थानिक स्तरावर निश्चित करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

गावातच अभ्यासाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा शहराकडे जाण्याचा वेळ व खर्च वाचणार आहे. त्यामुळे अधिक वेळ अभ्यासासाठी देता येऊन स्पर्धा परीक्षांमध्ये यशाची संधी वाढणार आहे. आमदार निधीतून सुमारे दहा लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेली ही अभ्यासिका ग्रामीण शैक्षणिक उन्नतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. अभ्यासिकेमुळे



**अभ्यासिकेची प्रेरणा येरमाळा पत्रकार संघामुळे : आ. कैलास पाटील...**

येरमाळा पत्रकार संघाने गावात अभ्यासिका उभारण्यासाठी निधी मिळावा, अशी मागणी केली होती. ग्रामविकास मंत्रालयाच्या मंजूर पन्नास लाख निधीतून दोन मजली अभ्यासिका व व्यायामशाळेचे काम अंतिम टप्प्यात आहे. येरमाळा पत्रकार संघाच्या प्रेरणेने मतदारसंघातील प्रत्येक गावात आमदार निधीतून अभ्यासिका उभारण्याचा माझा संकल्प आहे. जिल्हा नियोजन समिती व वित्त विभागाच्या सहकार्याने दरवर्षी एका गावात अभ्यासिका उभारली जाईल, असे ते म्हणाले.

सोनेगाव परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

कार्यक्रमास प्रवीण लाला पवार, नगरसेवक नाना घाडगे, उमेश सातपुते, आदित्य पवार, लक्ष्मण मुंडे, दयानंद थोरात, निलेश शिंदे, क्षीरसागर, अक्षय नाईकवाडी, अमोल जाधव, आबा वायकर यांच्यासह विद्यार्थी, युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## रमजानच्या पार्श्वभूमीवर कळंब फळबाजारात उलाढाल वाढली; रसदार फळांना मागणी

**कलिंगड दिसेना, द्राक्षे, आंबे, सफरचंद, डाळींबांचे दर वाढले...**


**परवेज मुल्ला**
**कळंब, दि.२२ फेब्रुवारी -**

मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना गुरुवारपासून सुरू झाल्याने शहरातील फळबाजारात चैतन्य संचारले आहे. इफ्तारसाठी रसदार फळांची खरेदी करण्यासाठी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने बाजारात गर्दी करू लागले असून बाजार बहरला आहे.

सध्या कलिंगड, खरबूज, पपई, सफरचंद, चिक्कू यांना विशेष मागणी आहे. द्राक्षे बाजारात दाखल होऊ लागली असली तरी टरबूजाची आवक अद्याप कमी असल्याने खरबूजाचे दर वाढले आहेत. फळांचा राजा आंबाही बाजारात दिसू लागला आहे.

बाजारात विविध फळांची आवक वाढली असली तरी मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी असल्याने दरात सुमारे दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. यंदा चार महिने गारठा अधिक जाणवत होता. सध्या वातावरणात गारवा व उष्णता दोन्ही जाणवत असल्याने आतापर्यंत रसदार फळांना अपेक्षित मागणी नव्हती. मात्र फेब्रुवारीपासून उन्हाचा चटका वाढू लागल्याने आणि रमजान महिन्याची सुरुवात झाल्याने फळांची मागणी वाढली आहे.

फळ विक्रेते शारूख बागवान यांनी सांगितले की, सध्या बाजारात कलिंगड, खरबूज, सफरचंद आणि मोसंबी यांची आवक मागणीच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे दर वाढले आहेत. सफरचंद व डाळिंबाचे दर अनेक दिवसांपासून वाढले असून ते २०० रुपयांच्या पुढे गेले आहेत.



इफ्तार पाट्यांचे आयोजन करणारे आयोजक मोठ्या प्रमाणात फळे खरेदी करत असल्याने बाजारातील उलाढाल वाढली आहे. केळीचे दर मात्र स्थिर असून ३०, ४० आणि ५० रुपये डझन या दराने विक्री होत आहे.

रमजान महिन्यात पेंड खजूराला विशेष महत्त्व असून महाशिवरात्रीपासून रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. सध्याच्या गार-गरम वातावरणामुळे विक्री अपेक्षेइतकी होत नसली तरी येत्या दिवसांत मागणीत हळूहळू वाढ होईल, असा विश्वास शारूख बागवान यांनी व्यक्त केला.

## शंकर दुपारगुडे यांना द पिलर्स ऑफ हिंदुस्तानी सोसायटी अवॉर्ड्स २०२६ जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२२ फेब्रुवारी -**

अणदूरचे सुपुत्र तथा कोपरगाव येथे वास्तव्यास असलेले पत्रकार शंकर दुपारगुडे यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि इंडो-मंगोलियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना द पिलर्स ऑफ हिंदुस्तानी सोसायटी अवॉर्ड्स २०२६ हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



ग्रामीण भागातील जनमाणसांच्या विविध समस्या प्रभावीपणे मांडून समाजप्रबोधनाचे कार्य केल्याबद्दल दुपारगुडे यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार सोहळा मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ६.३० वाजता मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया परिसरातील रॉयल मुंबई यॉट क्लबच्या सभागृहात पार पडणार असून, जगातील १४ हून अधिक देशांतील मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.